सोलापूर तरुण भारत

आसमंत



देशातील
पिचलेल्या सर्वसामान्य भारतीय
जनतेला २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या रुपाने एक
अश्वासक चेहरा दिसला. या चेहऱ्याने कोणत्याही परिस्थितीत
जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही अशी शपथ घेत,
गेले एक दशक जनतेची सेवा केली. आणि अजूनही करत आहे.
अशा उत्तुंग व्यक्तिमत्वाचा अलिकडेच वाढदिवस झाला.
त्यानिमीत्त त्यांच्या कार्याचा मांडलेला आढावा...

# महासत्तेचा पथदर्शक!

गौरव

दत्ता पंचवाघ

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस नुकताच झाला. १७ सप्टेंबर १९५० या दिवशी गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यात, सर्वसामान्य परिवारात जन्मलेल्या नरेंद्र मोदी यांनी, स्वकर्तृत्व आणि त्यांच्यावर झालेल्या राष्ट्रीय विचारांच्या संस्कारांच्या बळावर, सलग तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान होण्याचा बहुमान प्राप्त केला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, त्यानंतर संघाचे प्रचारक, आणीबाणीच्या काळात भूमिगत राहून केलेले कार्य, असे कार्य करणाऱ्या नरेंद्र मोदी यांची ओझरती गाठ पडली ती मुंबईत आणीबाणीवर त्यांनी लिहिलेल्या एका पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने ते मुंबईत आले होते. ८० च्या दशकातील ही घटना. संघ प्रचारक म्हणून कार्य करीत असलेली ही व्यक्ती काही वर्षांनी, देशाचा पंतप्रधान बनेल, असे त्यावेळी वाटणे अशक्यप्राय होते. नंतरच्या काळात संघ प्रचारक मोदी, गुजरात भाजपचे एक प्रमुख नेते बनले. गुजरात भाजपमध्ये त्यांनी आपले महत्त्वाचे स्थान निर्माण केले. २००१ मध्ये ते गुजरातचे मुख्यमंत्री बनले, आणि २०१४ सालापर्यंत ते या पदावर कायम राहिले. त्या काळात घडलेले गोध्रा प्रकरण आणि नंतर संपूर्ण गुजरातमध्ये उसळलेल्या दंगलीचे निमित्त करून, नरेंद्र मोदी यांची प्रतिमा डागाळण्याचा खूप प्रयत्न विरोधकांनी केला. पण त्या सर्वांमधून ते तावून सुलाखून बाहेर पडले.

राम जन्मभूमी आंदोलन, भाजप नेते लालकृष्ण अडवाणी यांनी काढलेली सोमनाथ ते अयोध्या रथयात्रा या सर्वांमुळे भारतीय राजकारण ढवळून निघाले होते. रामजन्मभूमी आंदोलनास वाढता प्रतिसाद मिळत होता. भाजप आणि संघ परिवारातील संघटना, या आंदोलनात सक्रिय सहभागी झाल्या होत्या. पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कारकिर्दीत, कारसेवकांनी बाबरी ढांचा पाडला. राम जन्मभूमी आंदोलनामुळे निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षास मोठ्या प्रमाणात जनसमर्थन मिळत गेले. त्याचे प्रत्यंतर २०१४ साली आले. मतदारांनी भाजपच्या पारड्यात घसघशीत दान टाकले, आणि नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान बनले. मोदी पंतप्रधान होता कामा नयेत, म्हणून विरोधकांनी त्यांच्याविरुद्ध मोठ्या प्रमाणात अपप्रचार केला. पण भाजपच्या या वादळात तो अपप्रचार कोठच्या कोठे विरून गेला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रारंभीची अनेक वर्षे देशाचे पंतप्रधानपद हे काँग्रेसकडेच होते. किंबहुना काही अपवाद वगळता, केंद्रातील सत्ता एकाच घराण्याच्या ताब्यात होती. आपल्याकडे असलेल्या बहुमताच्या जोरावर, देशाचा कारभार त्या सरकारकडून चालविला जायचा, पण त्यामध्ये लोककल्याणापेक्षा स्वतःचे कल्याण कसे साधता येईल, यास अधिक महत्त्व दिले जायचे! विरोधकांची ताकद कमी असल्याने, आणि त्यांच्यात एकवाक्यता नसल्याने, सत्ताधारी विरोधकांची उपेक्षा करीत असल्याचे दिसून येत असे. काँग्रेसच्या शासनकाळात देशाची प्रगती झालीच नाही, असे म्हणता येणार नाही, पण सत्ताधाऱ्यांनी राजकीय स्वार्थ बाजूला ठेवला असता, आणि आपल्या तुंबड्या न भरता जनतेची सेवा करण्याचे कार्य केले असते, तर देश त्यावेळेसच आणखी पुढे गेला असता! पण काँग्रेस राजवटीत असे घडणे अशक्य होते. काँग्रेस सत्तेवरून दूर गेली, तरच देशातील भ्रष्टाचार, अनागोंदी कारभार नष्ट होईल, अशी चर्चा होत असायची. पण त्या चर्चेस बळ मिळाले, ते इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लादून देशातील लोकशाहीचा गळा घोटण्याची कृती केल्यानंतर! त्याआधी संयुक्त विधायक दलाच्या रूपाने काँग्रेसविरुद्ध एकत्र येऊन, काही राज्यांत सत्ता प्राप्त करण्याचा यशस्वी प्रयोग विरोधी पक्षांनी केला होताच. आणीबाणीच्या काळानंतर खऱ्या अर्थाने काँग्रेसचा किल्ला ढासळला. जनता पक्षाचा प्रयोग फसल्यानंतर इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्या काळात त्या पक्षाकडे अनिर्बंध सत्ता होती. पण गरीबांचे कल्याण करण्याच्या गप्पा मारणार्या काँग्रेसने, त्यांच्यासाठी ठोस असे काहीच केले नाही.

पण २०१४ मध्ये आणि त्यानंतर २०१९ आणि २०२४ केंद्रात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, भाजपचे सरकार सत्तेवर आल्यानंतर त्या सरकारने देशातील जनतेच्या दृष्टीने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. देश स्वतंत्र झाल्यानंतर देशात सर्वत्र शौचालये असायलाच हवी, असा विचार एकाही काँग्रेसच्या नेत्याच्या मनात कसा काय आला नाही? भारतातील जनता मोठ्या संख्येने खेड्यांमधून राहत असताना, या जनतेच्या आरोग्यासाठी देशभर सर्वत्र शौचालये उभारली जायला हवीत, असा विचार केला तो नरेंद्र मोदी यांच्या सरकारने. विषय लहानसा वाटत असला, तरी तो अत्यंत महत्त्वाचा होता. मोदी सरकारने त्यास महत्त्व दिले, आणि देशात घरोघर शौचालये उभारली गेली. आधीच्या सरकारांना असे करणे शक्य नव्हते का? मोदी सरकारने घेतलेला आणखी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे, ज्यांच्या घरी स्वयंपाकाचा गॅस नाही अशा गरीब कुटुंबांना गॅस मोफत देण्याची योजना. या योजनेचा लाभ देशातील लक्षावधी जनतेने घेतला.


'पंतप्रधान जनधन योजने'खाली, देशातील बँकांमध्ये आतापर्यंत ५१.५० कोटी खाती उघडली गेली. अशा खात्यांमध्ये विविध योजनांखाली मिळणारी रक्कम थेटपणे पडू लागली. लाल फीत, भ्रष्टाचार, दिरंगाई हे प्रकार त्यामुळे बंद झाले. आधार कार्डचा वापर करून, लाभधारी व्यक्तीस त्याचा थेट फायदा होऊ लागला. मोदी सरकारच्या दहा वर्षांच्या कारकिर्दीत, देशात डिजिटल क्रांती झाली. ग्रामीण, शहरी भागातील जनता डिजिटल व्यवहार करू लागली. याच काळात देशात मोबाईल फोनचे जाळे प्रचंड प्रमाणात पसरले.

पंतप्रधान मोदी यांच्या काळात, देशाने आर्थिक क्षेत्रात प्रचंड झेप घेतली. आर्थिक सुधारणा करण्याबरोबरच देशभर पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण झाले. देशाचे दरडोई सकल राष्ट्रीय उत्पन्न २०१४ मध्ये पाच हजार डॉलर होते. ते २०२४ मध्ये सात हजार डॉलरवर पोहोचले. परकीय चलन गंगाजळी या कालावधीत दुप्पटीहून अधिक झाली. त्यामुळे साहजिकच आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताची पत वाढली. भारताने या दहा वर्षांमध्ये सर्वच क्षेत्रांत जी प्रचंड प्रगती केली. त्यामुळे विकसित देश भारतास आदराने वागवू लागले. आता तर भारतीय अर्थव्यवस्थेने जागतिक पातळीवर, पाचवे स्थान प्राप्त केले आहे. भारत काही काळातच जगातील तिसरी अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वरचेवर व्यक्त केला आहे. त्या दिशेने मोदी सरकारचे पाऊले पडत आहेत. २०१४च्या पूर्वी, देशात वंदे भारत, बुलेट ट्रेन आदींचा विचार तरी केला जात होता का? हवाई चप्पल घालणाऱ्या नागरिकास, विमानाने प्रवास करणे शक्य झाले पाहिजे, असा विचार कोणाच्या तरी मनात आला होता का? पण मोदी सरकने तो विचार कृतीत आणला. मोदी सरकारच्या काळात घेतला गेलेला एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे नोटबंदी. त्यामुळे काळ्या पैशास मोठ्या प्रमाणात आळा घातला गेला. ही नोटबंदी योग्य होती किंवा नाही, याबद्दल अजूनही चर्चा होत असली तरी, त्यामुळे काळा पैसा वापरून व्यवहार करणार्यांना पायबंद बसला असे म्हणता येईल. मोदी सरकारने घेतलेला एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे सर्व देशभर वस्तू आणि सेवा कराची अंमलबजावणी. काही राजकीय पक्ष आणि नेते वगळता तो करही जनतेच्या अंगवळणी पडला आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताने स्वतःचा दबदबा निर्माण केला आहे. मुस्लीम देशामध्येही भारताकडे आदराने पहिले जात आहे. अमेरिका, रशिया, फ्रान्स आदी प्रगत देश, भारतासमवेत समान पातळीवर व्यवहार करीत आहेत. रशिया आणि युक्रेन यांच्यात सुरु असलेल्या युद्धामध्ये भारताने मध्यस्थी करण्याची बड्या राष्ट्रांनी केलेली विनंती हे कशाचे द्योतक आहे? संयुक्त राष्ट्रांनी दि. २१ जून हा जागतिक योग दिन म्हणून स्वीकारला, आणि जगातील देशांनी त्याचा स्वीकार केला, हे भारताची प्रतिष्ठा वाढल्याचेच द्योतक नव्हे काय? (पान ४ वर)

राष्ट्रनिष्ठ म्हणजे सार्वत्रिक बंधुभावना, सामाजिक ऐक्य, धार्मिक सलोखा बिघडेल, असे कोणतेही काम न करणे. या वृत्तीपासून शेकडो हात दूर राहणे, याचे दुसरे नाव राज्यघटनेशी एकनिष्ठ राहणे होय.

# व्रत राष्ट्रनिष्ठेचे



वेधक

रमेश पतंगे

मंत्री, खासदार, आमदार, न्यायमूर्ती, राष्ट्रपती, राज्यपाल यांच्यापासून ते पोलीस निरीक्षकापर्यंत प्रत्येकाला राज्यघटनेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागते. शपथ घेणे सोपे असते, शपथेचे पालन करणे कठीण असते. काहीजण अत्यंत प्रामाणिकपणे घेतलेल्या शपथेचे पालन करतात आणि काहीजण शपथ घेणे हा उपचार आहे, असे समजून त्यांना जे करायचे आहे ते करीत राहतात. आपले अनेक हिंदी चित्रपट पोलीस अधिकारी, मंत्री, आमदार-खासदार यांच्यावर आधारित आहेत, ते आपण आवडीने पाहतोही. तुम्ही एखादा संवाद असाही ऐकला असेल, जिथे नायक खलनायकी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला किंवा राजनेत्याला त्याने घेतलेल्या शपथेची आठवण करून देतो. पण, राज्यघटनेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ म्हणजे काय? त्याचा अर्थ 'मी राजनिष्ठ राहीन आणि राष्ट्रनिष्ठ राहीन' असा करावा लागतो. राजनिष्ठ म्हणजे राज्याच्या हितसंबंधाला हानी पोहोचेल, असे कोणतेही काम मी करणार नाही आणि राष्ट्रनिष्ठ म्हणजे सार्वत्रिक बंधुभावना, ॐसामाजिक ऐक्य, धार्मिक सलोखा बिघडेल, असे कोणतेही काम मी करणार नाही. यापासून शेकडो हात दूर राहणे, याचे दुसरे नाव 'राज्यघटनेशी एकनिष्ठतेची शपथ' असे आहे.

आपल्याला सतत याचे भान ठेवावे लागते की, आपल्याला प्रबळ राज्याकडून भावनिक ऐक्याने बांधलेल्या एका अजेय राष्ट्राकडे जायचे आहे. केवळ राष्ट्राचा विचार केला, तर आपले राष्ट्र अतिशय प्राचीन आहे. ते वेदकाळापासून आहे. या राष्ट्राच्या हजारो वर्षांच्या इतिहासात शेकडो राज्ये (स्टेट) निर्माण झाली आणि लयाला गेली. साम्राज्ये उभी राहिली आणि ती संपली. राजघराणी उभी राहिली, त्यांचाही अंत झाला. राम, कृष्णही आले गेले. यामुळे आपले राष्ट्रजीवन कधीही खंडित झाले नाही. गंगेचा प्रवाह ज्याप्रमाणे अविरतपणे हजारो वर्षे वाहत आहे, तसे आपले राष्ट्रजीवन अखंडितपणे वाहत आहे.

या राष्ट्रजीवनाने काही मूल्ये जपली आहेत. आपण अस्तित्ववादी आहोत. अनेकवेळा लोक शब्दांचे खेळ खेळतात. त्या वादात आपल्याला शिरायचे नाही. अस्तित्ववादाचा अर्थ असा होतो की, हे ब्रह्मांड ज्यात आपली पृथ्वी आली, ज्यात आपला भारत देश आला, त्याचे अस्तित्व अनंत काळापासून स्वयंभू आहे, त्याचा कोणी निर्माता नाही. विश्व हा चैतन्य आणि अक्षय उर्जेचा पसारा आहे. या विश्वरचनेतील मनुष्य ही सर्वोत्कृष्ट कृती आहे. जे विश्वात आहे, ते मानवात आहे आणि जे मानवात आहे, तेच विश्वात आहे. मनुष्यरूपाने आपण सर्व समान आहोत. त्याला आपला शब्द आहे 'समत्व'. ही समत्वदृष्टी हे आपल्या राष्ट्रजीवनाचे सर्वश्रेष्ठ वैशिष्ट्य आहे. सत्य, अहिंसा, अपरिग्रह, दया, क्षमा, शांती इत्यादी मूल्ये आपल्या राष्ट्रजीवनाची स्वतंत्र ओळख सांगणारी आहेत. 'सत्यमेव जयते' हे आपल्या राज्याचे ब्रीदवाक्य आहे. राष्ट्रीय मूल्यातून ते स्वीकारलेले आहे. 'अहिंसा परमो धर्मः' हेदेखील आपचे जीवनमूल्य आहे. तो आपला स्वभाव आहे. आपले राज्य शेजारील छोट्या देशांवर आक्रमण करीत नाही. छोट्या देशाचा युक्रेन करणे, सीरिया करणे किंवा इराक करणे, हे आपल्या राष्ट्रीय मूल्यांत बसत नाही. आपले राज्य त्याचे पालन करते. आपली राज्यघटना ही आपल्या राष्ट्रीय मूल्यांवर आधारित आहे. हे विस्ताराने समजून घेण्यासाठी संविधान सभेच्या चर्चेचे बारा खंड वाचावे लागतात.

आपल्या सनातन, प्राचीन, राष्ट्रीय मूल्यांत आपल्या संविधानाने काही मूल्यांची भर घातली आहे. म्हटले तर ती नवीन मूल्ये आहेत, म्हटले तर त्याला प्राचीन संदर्भ आहेत. आपल्या घटनेचे 'कलम २१' असे आहे, 'जीवित संरक्षण आणि व्यक्तिस्वातंत्र्यः- कोणत्याही व्यक्तीचे जीवित अथवा व्यक्तिस्वातंत्र्य, विधीनुसार संस्थापित प्रक्रियेस अनुसरून असलेले अपवाद सोडता, हिरावले जाऊ शकणार नाही.' नुसते हे कलम वाचून त्याचा अर्थ समजणे अवघड आहे. हे कायद्याचे कलम आहे. हा कायदा सर्वोच्च आहे. हा कायदा हे सांगतो की, कोणत्याही व्यक्तीचे जीवन कायद्याची प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय समाप्त करता येणार नाही. साध्या भाषेत सांगायचे तर, प्रत्येक व्यक्तीचे जीवन अमूल्य आहे. प्रत्येकाला जीवन जगण्याचा अधिकार आहे. प्रत्येकाला स्वतःच्या आवडीप्रमाणे आणि क्षमतेप्रमाणे स्वतःचा विकास करून घेण्याचे अमर्याद स्वातंत्र्य आहे. हा सर्वाधिक मौलिक अधिकार आहे आणि त्याचा उगम भारतीय तत्त्वदर्शनात आहे. वैदिक तत्त्वज्ञान, भगवान बुद्धांचे तत्त्वज्ञान, जैन तत्त्वज्ञान, मनुष्यजीवनाची पवित्रता आणि मौलिकता स्वीकारून पुढे जाते. इस्लाम आणि ईसाई धर्मांतदेखील मनुष्यजीवनाच्या मौलिकतेला मान्यता दिलेली आहे.

राज्यघटनेचा कायदा स्वातंत्र्य, समता, उपासना पंथाची विविधता, अभिव्यक्ती आणि विचारांची विविधिता अशी मूल्ये सांगतो. ही मूल्ये राज्यघटना कायद्याच्या भाषेत परिभाषित करते. या कायद्याची अंमलबजावणी राज्याच्या शासनयंत्रणेवर बंधनकारक असते. ही सर्व मूल्ये यापूर्वी आपल्या देशात नव्हती, असे कोणीही म्हणू शकत नाही.

विचारस्वातंत्र्याचा विषय घेऊ. आपल्या देशात सृष्टिनिर्माता कोणी ईश्वर आहे, असे मानणारा एक विचार आहे. या ब्रह्मांडाची निर्मिती करणारा कोणी ईश्वर नाही, असा दुसरा विचार आहे. ईश्वर अवतार घेतो, असा एक विचार आहे. ईश्वरच नसल्यामुळे अवतार घेण्याचा प्रश्नच नाही, असा दुसरा विचार आहे. विविध देवता या ब्रह्मांडनायकाच्या विविध शक्ती आहेत. त्यांची मूर्तिपूजा सांगणारा एक वर्ग आणि विचार आहे. (पान ४ वर)



# तापही भोगावा लागेल

डॉक्टरांच्या आंदोलनामुळे, संपामुळे त्रस्त जनतेची थोडी जरी काळजी ममता यांना असती, तर त्यांनी डॉक्टरांची मागणी मान्य केली असती. मात्र, ममता यांनी डॉक्टरांच्या मागणीला नकार दिला आणि बैठक फिसकटली. आता यावरून ममता म्हणत आहेत की, जनतेच्या हितासाठी मी राजीनामा द्यायला तयार आहे.

लक्ष्यवेध

प्रतिनिधी

काल-परवा डॉक्टरांनी आंदोलन मागे घ्यावे म्हणून प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासोबत ज्युनियर डॉक्टरांची बैठक होती. डॉक्टर म्हणाले की, बैठकीचे लाईव्ह प्रक्षेपण व्हावे. ममतांनी याला नकार दिला. ममता यांना कसली भीती वाटली? कर नाही तर डर कशाला? डॉक्टरांच्या आंदोलनामुळे, संपामुळे त्रस्त जनतेची थोडी जरी काळजी ममता यांना असती, तर त्यांनी डॉक्टरांची मागणी मान्य केली असती. मात्र, ममता यांनी डॉक्टरांच्या मागणीला नकार दिला आणि बैठक फिसकटली. आता यावरून ममता म्हणत आहेत की, जनतेच्या हितासाठी मी राजीनामा द्यायला तयार आहे. मात्र, प. बंगालची आणि त्यातही तृणमूल काँग्रेसची सध्याची परिस्थिती पाहाता, प. बंगालमधल्या त्या निष्पाप डॉक्टर युवतीच्या हत्येवरून जनतेचे लक्ष उडावे, यासाठीच त्या असे म्हणत असतील, असे वाटते. एक महिना प. बंगालमध्ये आंदोलन सुरू आहे. वैद्यकीय सेवेचे तीनतेरा वाजले आहेत.

महिला मुख्यमंत्री असताना एका डॉक्टर युवतीवर इतका भयंकर हल्ला, बलात्कार होतो, इतका निर्घृणपणे तिचा खून होऊ शकतो? यामुळे सगळीकडे उद्विग्नता पसरली होती. त्यामुळे प. बंगालची हिंदू जनता संविधानाची न्याय-हक्काची भाषा करू लागली. ममतांच्या दडपशाहीला न जुमानता, आवाज उठवू लागली. ममता यांची दडपशाही जनता सहन तरी किती करणार? मुस्लिमांची मते मिळवण्यासाठी कायम हिंदूविरोधी बोलणे भूमिका घेणे, हिंदूंच्या श्रद्धास्थानाचा अपमान करणे, कुणी रामनाम जरी घेतले तरी संतप्त व्हावे, नक्षलवादी परिसरात जाऊन मतांची भीक मागावी, एक ना अनेक. ममता यांच्या राज्यात हिंदूंची अवस्था दुय्यम नागरिकांसारखीच होती. मागे संदेशखाली प्रकरणात तर तृणमूलच्या गुंडानी मागासवर्गीय भगिनीवर अनन्वित अत्याचारही केले होते. पण ममता गप्पच. ममतांची दडपशाही किती तर भाजप अध्यक्ष दिलीप घोष म्हणाले होते की, प. बंगालचा दौरा करत असताना अनेक ठिकाणी त्यांना राहायला हॉटेल उपलब्ध झाले नाही, दीदीला समजले तर, हॉटेल बंद पाडेल. त्यापेक्षा कृपया तुम्ही इथून जा. असे सांगणारे हॉटेलवाले त्यांना राज्यभर भेटले. तर अशा मग्रूर ममता स्वतः हून राजीनामा द्यायचे म्हणत आहेत. तरीही निष्पाप डॉक्टरच्या खुनाची जबाबदारी तर घ्यावीच लागेल. मुख्यमंत्रिपद भोगले, आता जनता देऊ पाहणारा तापही भोगावा लागेल.

# चीनचे भारताविरुद्ध कॉग्निटिव्ह वॉर फेअर

विश्लेषण भाग-१

राष्ट्ररक्षा
ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३



### कॉग्निटिव्ह वॉर फेअर वापरून तैवानचे चीनमध्ये विलीनीकरण

अमेरिका आणि मित्रराष्ट्रे तैवानची लढण्याची क्षमता वाढवत आहे. ही क्षमता आता एवढी वाढली आहे की, चीनने तैवानवर समुद्रातून हल्ला करून तैवानवर कब्जा करण्याची शक्यता कमी होत आहे. चीनने तैवानवर हल्ला केला तर, त्यांना लढाईत खूप रक्त सांडावे लागेल, ज्याकरिता चिनी जनता कधीही तयार होणार नाही. म्हणून आता चीन वेगळ्या प्रकारच्या युद्ध पद्धतीने तैवानवर विजय मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. यामध्ये एक पद्धत आहे कॉग्निटिव्ह वॉर फेअर आजच्या युद्धक्षेत्रात, शस्त्रास्त्रांपेक्षा मनावर हल्ले करणारी शस्त्रे अधिक प्रभावी ठरत आहेत. या युद्धात, माहिती, विचार आणि भावना यांचा वापर करून समाजातील लोकांच्या विश्वासांवर, निर्णयांवर आणि कृतींवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला जातो. ज्यामध्ये एआयसारखे तंत्रज्ञान वापरून शत्रुराष्ट्राच्या मनावर कब्जा करायचा, ज्यामुळे ते असे निर्णय घेतील की जे चीनच्या बाजूने असतील. म्हणजेच तैवानच्या मनावर विजय मिळवून युद्ध न करता तैवानचे चीनमध्ये विलीनीकरण करायचे.

### कॉग्निटिव्ह वॉर फेअर

चीन आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजे एआयचा वापर करून २०३० पर्यंत जगातली महाशक्ती बनायचा प्रयत्न करत आहे. या कॉग्निटिव्ह युद्धामध्ये चीन त्यांचे मिलिटरी आणि सिव्हिल दोन्ही क्षेत्रांचा वापर करून ही लढाई जिंकणार आहे. याचा वापर युद्धभूमीच्या महत्त्वाच्या क्षेत्रामध्ये केला जाईल, ज्यामध्ये इन्फॉर्मेशन प्रोसेसिंग, अनमॅन्ड वेपन्स आणि डिजिजन मेकिंग क्षेत्रे असतील.

कॉग्निटिव्ह वॉर फेअरचा वापर करून चीन आधुनिक पद्धतीने लढाई लढेल. कॉग्निटिव्ह वॉर फेअर ही एक महत्त्वाची युद्ध पद्धती म्हणून पुढे येत आहे. पीपल्स लिबरेशन आर्मी याचा वापर लॅण्ड वॉर फेअर, मेरिटाईम वॉरफेअर, सायबर वॉरफेअर, स्पेशल वॉरफेअर युद्धात वापर करणार आहे.

### प्रचंड प्रमाणामध्ये शत्रुराष्ट्रांचा डेटा गोळा करायचा

हे युद्ध लढण्याकरिता चीन प्रचंड प्रमाणामध्ये शत्रुराष्ट्रांची माहिती, नेतृत्वाची पर्सनल इन्फॉर्मेशन, इतर डेटा हा साम, दंड, भेद याचा वापर करून गोळा करत आहे. नंतर डेटा मायनिंग केले जाईल. आणि मग त्यांचे विश्लेषण करून, नेमके कसे युद्ध लढायचे, हे ठरवले जाईल.

चीनने अमेरिकेचा डेटा मोठ्या प्रमाणामध्ये गोळा केला आहे. २०१५ मध्ये अमेरिकेला कळले की, त्यांच्या सरकारची वेगवेगळ्या क्षेत्रातली माहिती चोरीला गेली आहे आणि हे केवळ एकदाच झाले असे नाही, अनेक वेळा अमेरिकेच्या सरकारची माहिती चोरण्यात आली. आता ही माहिती एक शस्त्र (weaponization of data) म्हणून चीन येणाऱ्या काळामध्ये वापरू शकेल.

### वापर आपल्या सैनिकांवरसुद्धा

चीन कॉग्निटिव्ह वॉर फेअरचा वापर आपल्या सैनिकांवरसुद्धा करत आहे. चीन संशोधन करत आहे की त्यांचे सैनिक वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये कशाप्रकारे वागतात/काम करतात. म्हणून चीन पीपल्स लिबरेशन आर्मीच्या सैनिकांच्या मनगटावर स्मार्ट सेन्सर ब्रेसलेट लावून महत्त्वाच्या सैनिकी नेतृत्वाची माहिती गोळा करत राहील म्हणजे त्यांचे हावभाव, मानसिकता, मन:स्थिती वगैरे.

यामुळे त्या सैनिकांचे स्ट्राँग पॉईंट्स आणि वीक पॉईंट्स युद्ध परिस्थितीमध्ये कळतील. ज्यामुळे योग्य सैनिक, योग्य कामाकरिता वापरणे हे चीनला सोपे जाईल. कारण लढाईचे सर्वात महत्त्वाचे तत्त्व असते राईट मॅन, अॅट राईट प्लेस, अॅट राईट टाईम. हे कॉग्निटिव्ह वॉर फेअर किती यशस्वी होईल? सर्वांत महत्त्वाचे की तुम्ही कशाप्रकारे अल्गोरिदम तयार करता, जे माहितीचे विश्लेषण करतील. तुम्हाला मिळालेली माहिती ही कुठल्या दर्जाची आहे? कारण चांगली माहिती गोळा केली तर तुम्हाला चांगले विश्लेषण करता येईल.

### विश्लेषण करून उपाययोजना

आज चीन प्रचंड प्रमाणामध्ये कॉग्निटिव्ह वॉर फेअरचा वापर तैवान आणि हाँगकाँगच्या विरोधात करत आहे. हाँगकाँग आणि तैवान ही एक प्रयोगशाळा आहे, जिथे चीन कॉग्निटिव्ह वॉर फेअर वापरत आहे, याशिवाय कॉग्निटिव्ह वॉर फेअरचा वापर चीन अमेरिका आणि युरोपच्या विरोधात सुद्धा करत आहे. याचा अभ्यास करून भारताने, चीन ही युद्ध पद्धती भारताविरुद्ध कशी वापरेल किंवा वापरत आहे याचे विश्लेषण करून उपाययोजना करायला पाहिजे.

### चीन भारताविरुद्ध कॉग्निटिव्ह युद्धाचा वापर कसा करत आहे

चीन भारताविरुद्ध कॉग्निटिव्ह युद्ध (Cognitive Warfare) तंत्राचा वापर अत्यंत योजनाबद्ध पद्धतीने करत आहे. या तंत्राचा उद्देश भारत सरकारची, जनतेची, मानसिकता बदलणे, त्यांना गोंधळात टाकणे हा आहे.

चीन या युद्ध तंत्रामध्ये माहिती, प्रचार, मनोवैज्ञानिक तंत्रे, आणि सायबर ऑपरेशन्सचा समावेश करून भारताच्या धोरणांवर परिणाम करण्याचा प्रयत्न करत आहे. चीनच्या कॉग्निटिव्ह युद्धाच्या धोरणांमध्ये काही महत्त्वाचे मुद्दे खाली दिले आहेत

### माहितीचे शस्त्रीकरण (Weaponization of Information)

चीन भारताच्याविरुद्ध माहिती युद्ध (Information Warfare) तंत्राचा वापर करत आहे. भारताच्या जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी सोशल मीडियाचा आणि ऑनलाईन प्लॅटफॉर्म्सचा वापर केला जातो. चीन खोटी माहिती, प्रपोगंडा आणि खोट्या बातम्या पसरवून भारतीय समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करतो. जनमत बदलून चीन भारतीय समाजाचा देशावरील विश्वास कमी करण्याचे तंत्र वापरतो. काही दिवसांपूर्वी भारताचे परराष्ट्र मंत्री डॉ. जयशंकर यांनी विधान केले होते की, चीन भारताकरिता एक मोठी समस्या आहे. या विधानावर ९ सप्टेंबरला चीनचे मुखपत्र ग्लोबल टाईम्सने अग्रलेख लिहिला. डॉ. जयशंकर यांचे चीनच्या विरोधातील परराष्ट्र धोरण हे भारताकरिता धोकादायक आहे. त्याचा परिणाम भारताच्या राष्ट्रीय हितावर होईल. हे धोरण अनेक भारतीयांना मान्य नाही, जे पूर्ण असत्य आहे. म्हणजेच ग्लोबल टाईम्स भारत सरकारमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहे.

### सायबर हल्ले आणि तंत्रज्ञान चोरणे

चीन सायबर हल्ल्यांद्वारे भारताच्या सरकारी, सैनिकी आणि आर्थिक संस्थांवर हल्ला करून गुप्त माहिती गोळा करत आहे. सायबर हल्ल्यांमुळे भारताच्या सुरक्षिततेवर परिणाम होतो आणि त्यांच्या निर्णयक्षमतेला गोंधळात टाकले जाते.

तंत्रज्ञान चोरणे हे देखील कॉग्निटिव्ह युद्धाचे महत्त्वाचे अंग आहे, ज्याद्वारे चीन भारताच्या विकास धोरणांवर थेट परिणाम करतो.

### मनोवैज्ञानिक ऑपरेशन्स (Psychological Operations)

चीन भारतीय राजकीय आणि सामाजिक स्थैर्यावर परिणाम करण्यासाठी मनोवैज्ञानिक ऑपरेशन्सचा वापर करतो. चीनच्या प्रचारयंत्रणा भारताच्या समाजातील वांशिक, धार्मिक आणि सामाजिक संघर्षांना जसे की माओवादाला चालना देत आहे. अशाप्रकारे, भारतात अंतर्गत संघर्ष आणि असंतोष निर्माण करण्यासाठी चीन प्रयत्नशील आहे.

### संस्कृतीचे प्रभावशाली शस्त्र म्हणून वापर

चीन सॉफ्ट पॉवर धोरणाचा वापर करून भारतीय विचारांवर परिणाम करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांच्या सांस्कृतिक संस्थांचे (Ogo Hs Confucius Institutes) माध्यमातून, चीन भारताच्या शैक्षणिक संस्था आणि विचारसरणींवर प्रभाव टाकतो.

### प्रपोगंडा आणि माध्यमांवर नियंत्रण

चीन आपल्या प्रपोगंडा मशीनचा वापर भारताच्या विरोधात करत आहे. चीन आपले राष्ट्रहित सुरक्षित ठेवण्यासाठी जागतिक माध्यमांवर नियंत्रण ठेवतो आणि त्याद्वारे भारताच्याविरुद्ध चांगली आणि प्रभावी कथा मांडण्याचा प्रयत्न करतो. माध्यमांद्वारे चीनची बाजू अधिक सकारात्मक आणि भारताच्याची नकारात्मक दाखवली जाते.

### वैज्ञानिक सहकार्य आणि डेटा चोरी

चीन भारताच्याच्या वैज्ञानिक समुदायाशी सहकार्य वाढवून गुप्त माहिती मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. यामध्ये संशोधन संस्थांचा गोपनीय डेटा चोरणे, तंत्रज्ञान हस्तगत करणे आणि भारताच्या धोरणात्मक योजना धोक्यात आणणे यांचा समावेश होतो. चीनचे कॉग्निटिव्ह युद्ध धोरण हे भारतीय संस्थांवर, समाजावर आणि निर्णयक्षमतेवर एक व्यापक हल्ला आहे, ज्याचा उद्देश भारताला चीनचा प्रतिस्पर्धी म्हणून पुढे येऊ द्यायचे नाही. चीन प्रचंड वेगाने या विषयावर काम करत आहे आणि भारताने सुद्धा कॉग्निटिव्ह वॉर फेअर या क्षेत्रात संशोधन करून आपली लढण्याची क्षमता वाढवली पाहिजे. याकरिता आपल्याला आपले शास्त्रज्ञ, प्रायव्हेट सेक्टर, पब्लिक सेक्टर आणि सगळ्यांच्या ज्ञानाचा वापर करून या क्षेत्रामध्ये प्रगती करावी लागेल. लेखाच्या पुढच्या भागांमध्ये हे युद्ध जिंकण्याकरिता भारताने नेमके काय करायला पाहिजे, यावर आपण चर्चा करू.

(लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

---

# शुद्ध बीजा पोटी, फळे रसाळ गोमटी!

संत प्रबोधन
प्रा. डॉ. हरिदास आखरे

संतांनी त्यांच्या अभंगवाङ्मयात सर्व मनुष्यमात्रांना जो आचारसंहितेचा, कर्तव्याचा उपदेश केला आहे, तो आजही लक्षात घेण्यासारखा आहे. मनुष्यमात्रांनी वेदविहित धर्माचरण करावे, हे सर्व कर्तव्याचे मुख्य सूत्र आहे. त्यासोबतच कुणी कोणती कर्तव्ये कशा प्रकारे करावीत, याची आचारसंहिता संत आपल्या अभंगवाङ्मयातून वर्णन करतात.

**ब्रह्महचारी धर्म घोकावें अक्षर । आश्रमी विचार षटकर्मे ।। वानप्रस्थ तरी संयोगीं वियोग । संन्यास तो त्याग संकल्पाचा ।। परमहंस तरी जाणे सहज वर्म । तेथे याती धर्म कुळ नाही ।। बोले वर्म जो चाले या विरहित । तो जाणा पतित श्रुति बोले ।। तुका म्हणे कांही नाही नेमाविण । मोकळा तो सीण दुःख पावे ।।** (तु. गा.१४७९) १) ब्रह्मचाऱ्याने ब्रह्मचर्याश्रमात वेदाक्षरे घोकावीत. पाठांतर करावे. वेद जाणावा. २) गृहस्थाश्रमात षट्कर्मसंपन्न असावे. ३) वानप्रस्थाश्रमात परिग्रहात राहूनही वनात किंवा गावात अपरिग्रह वृत्तीने राहावे. ४) संन्याशाने अहमतेचा त्याग करावा. ५) परमहंसाला मात्र विधीचे बंधन नाही. याप्रमाणे चार आश्रमांची कर्तव्ये सांगितली आहेत. चार वर्ण एकाच हरीपासून झालेले आहेत, असेही ते सांगतात.

**चारी वर्ण झाले एकाचिये अंगी । पाप पुण्य भागी विभागिले** (तु.गा.१४६) एकाच हरीपासून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि क्षुद्र निर्माण झाले आहेत. संत तुकारामांनी सांगितलेला कर्तव्योपदेश, असा आहे, प्रत्येकाने सत्याचे आचरण करावे. भूतमात्राविषयी दया असावी. विषयासक्त नसावे. काम, क्रोध, लोभ यांचा त्याग करावा. संतसंगती धरावी. परोपकार करावा. सेवकाने स्वामिनिष्ठ सेवा करावी. सैनिकाने राजनिष्ठ असावे. पतिव्रतेने पतीची शुश्रूषा करावी. पुत्राने मातापित्यांची सेवा करावी. मुमुक्षूने गुरूची सेवा करावी. गायत्री, कन्या, गाय, हरिकथा यांचा विक्रय करू नये. एकादशी, सोमवार उपवास करावा व हरिनाम घ्यावे. अशा प्रकारचा कर्तव्योपदेश सर्वकाळात आदर्श ठरणारा, सर्व काळात लागू पडणारा, सर्वांचे कल्याण साधणारा त्यांनी आचरावयास सांगितला आहे. या कर्तव्योपदेशाचे पालन करणाऱ्या व्यक्ती नेहमी समाधानी जीवन जगताना दिसतात. त्याच्याकडे कदाचित भौतिक सुख नसेल, परंतु त्यांच्याकडे असणारे आत्मिक समाधान इतरांकडे आढळणार नाही. त्याचा आचारधर्म समाजासाठी एक आदर्श असतो. उदाहरणार्थ- संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांनी सांगितलेला वारकरी पंथाचा उपदेश आजही महाराष्ट्रातील लाखो वारकरी पाळताना दिसतात. त्यासाठी संत तुकारामांनी आपल्या अभंगगाथेत समाजातील सर्वांनाच जातिनिरपेक्ष, वयनिरपेक्ष, लिंगनिरपेक्ष आवाहन केले आहे.

जसे - **या रे या रे लहान थोर । याति भलत्या नारी नर ।। करावा विचार । न लगे चिंता कोणासी ।।** (तु.गा.५१९) स्पर्शाने नव्हे, तर संकुचित विचारांनी विटाळ अस्पृश्यांचा स्पर्श काही उच्चवर्णीय लोक टाळतात परंतु, संत तुकाराम महाराज म्हणतात, विटाळ अस्पृश्यांच्या स्पर्शामध्ये नाही तर, तसे मानणाऱ्या विचारांमध्ये आहे. जसे ज्याचे विचार असतील तशी त्याची जात ठरते. समत्वाचा, समब्रह्माचा विचार ते मांडतात. माणसातील समतेचा, सदाचाराचा, मांगल्याचा विचार मनात असेल तर, त्याची जात उच्च ठरते. इतरांना हीन लेखणारा, विषमता मानणारा असेल तर त्याची जात हलकी ठरते. अधिकाराच्या बाबतीत संत तुकारामांनी विशद केलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भागवत धर्माचा आचारधर्म पाळणारा सांप्रदायिक कसा असावा. त्याची आचारसंहिता संत तुकाराम पुढील अभंगातून सांगतात, **सदा सर्वकाळ अंतरी कुटिल । तेणे गळा माळ घालू नये ।। ज्यासी नाही दया क्षमा शांति । तेणे अंगी विभूती लावू नये ।। जयासी न कळे भक्तीचे महिमान । तेणे ब्रह्मज्ञान बोलो नये ।। ज्याचे मन नाही लागले हातासी । तेणे प्रपंचाशी टाकू नये ।। तुका म्हणे ज्यासी नाही हरिभक्ती तेणे भगवे हाती धरू नये ।।** (तु.गा.२७७९)

नित्य आणि नैमित्तिक कर्म केल्यानंतर फळाची अपेक्षा न करता विधिपूर्वक त्याचे आचरण आवश्यक आहे. स्वर्ग वा वैकुंठामध्ये मिळणार नाही, असे सुख पृथ्वीवरच भगवंताच्या नामस्मरणाने, हरिनामामुळे मिळू शकते. ते भगवतनाम, हरिनाम घेण्याचा अधिकार पृथ्वीतलावरील सर्व मनुष्यमात्राला आहे. ब्राह्मण, वैश्य, क्षुद्र, चांडाळ, मुले, कुलीन स्त्रिया यांनाच नव्हे तर, गणिकांनाही आहे. सर्व वर्णांच्या लोकांनी तृप्ती मिळवावी.

परिस ज्याप्रमाणे लोखंडाचे गुणदोष न पाहता त्याचा उद्धार करतो. त्याचप्रमाणे ईश्वर सर्वांचा उद्धार करतो. तुकारामांनी घेतलेली ही भूमिका सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची आहे. वैदिक परंपरेने क्षुद्रांची अनेक बाजूंनी कोंडी केली होती. नाना तऱ्हांनी त्यांना हिणवले होते. ज्याच्यामुळे प्रतिष्ठेचे व सुखाचे जीवन जगता येईल, अशा सर्व गोष्टींची दारे त्यांच्यासाठी बंद केली होती. अशा गोष्टींचा अधिकार त्यांना नाही. अशा प्रकारचे असंख्य नियम त्यांच्यासाठी बनविण्यात आले होते. वैदिक परंपरेने ज्यांना ज्यांना अधिकार नाकारला होता, त्यांना अधिकार असल्याचे संत तुकारामांनी निर्धाराने सांगगितले. त्यांनी कोणत्याही उच्चवर्णीयांचा अधिकार न नाकारता क्षुद्रासंह सर्व वर्णांच्या लोकांना अधिकार असल्याचे सांगितले. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना अधिकार देताना स्त्रियांमधील अतिशय हीन समजल्या मानल्या जाणाऱ्या वेश्या व्यवसायातील स्त्रियांनाही अधिकार असल्याचे त्यांनी सांगितले. म्हणूनच वारकरी संप्रदायात सर्वच जाती धर्मांचे आणि वर्गांचे संत पाहावयास मिळतात.



जसे गोरा कुंभार, सावता माळी, तुकाराम कुणबी, चोखा महार, सजन कसाई, संत कबीर, दासी जनाबाई, वेश्या असणारी कान्होपात्रा. संत ज्ञानेश्वरांनीही त्यांच्या मताला पुष्टी दिली आहे- **म्हणौनि कूळ जाति वर्ण । हे आघवेचि गा अकारण ।। एथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ।।** (ज्ञानेश्वरी ९/४५६) **शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी** संत तुकारामांनी आपल्या अभंगगाथेत आपल्या आचरणाशी संबंधित असंख्य अभंग मांडलेले आहेत. प्रस्तुतच्या अभंगात आपले कर्तव्य जेवढे शुद्ध असेल तेवढे त्याचे फळ गोड असते, असे संत तुकाराम महाराज सांगतात **शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ।। मुखी अमृताची वाणी । देह वेचावा कारणी ।। सर्वांगी निर्मळ । चित्त जैसे गंगाजळ ।। तुका म्हणे जाती । ताप दर्शने विश्रांती ।।** (तु.गा.६२)

संत तुकाराम म्हणतात, ज्याचे बीजच शुद्ध आहे, अशा बीजातून निर्माण होणारे प्रत्येक नवीन रोपटे हे अतिशय शुद्ध असणार आहे. त्याची फळेसुद्धा खूप रसाळ असतील. त्याचप्रमाणे ज्याच्या मुखामध्ये अमृतासारखी रसाळ वाणी आहे, ज्याचा देह निर्मळ आहे व देह देवाच्या कारणी सेवेत आहे, जो पुरुष सर्व अंगांनी पवित्र आहे व ज्याचे चित्त गंगाजलाप्रमाणे निर्मळ आहे, अशा सात्त्विक पुरुषाच्या दर्शनाने त्रिविध ताप जातात व जीवाला विश्रांती प्राप्त होते. परद्रव्य- परनारी हा खरा विटाळ संत तुकारामांनी सोवळ्या-ओवळ्याच्या व भेदभावाच्या संकल्पनेला मूठमाती दिली आहे. तथापि अशा प्रकारची भूमिका स्वीकारायचीच असल्यास त्यांनी एका महत्त्वाच्या विचाराने ती विशद केली आहे. ती म्हणजे, परद्रव्य व परनारी यांचा संग हाच खरा विटाळ होय. यापासून जो स्वतःला अलिप्त ठेवतो तोच खरा सोवळा व शुद्ध होय, अशी परखड भूमिका त्यांनी घेतलेली आहे.

---

# जिंदगी धूप, तुम घना साया..!

# हिंदी चित्रपटसृष्टीचे शॉ-शेक्सपिअर..!

सिनेजगत
देवेंद्र प्रभुणे

चित्रपट म्हणजे दृक्-श्राव्य कथाकथन. अर्थात, चित्रपटात कथा हा पाया व चित्रपट ही त्यावर आकारास आलेली इमारत. चित्रपटांचा अभ्यास करताना प्रकर्षाने लक्षात आलेली बाब म्हणजे मूळ कथा कितीही जोमदार असली तरीही चित्रपटाच्या जडण-घडणीत कळीची भूमिका निभवते ती पटकथा व संवाद. प्रत्येक कथेमध्ये विविधांगी प्रस्तुतीकरणाच्या अनेक शक्यता दडलेल्या असतात. अभिजात व कालातीत कथा-वाङ्मयास आधुनिक परिवेशात व परिप्रेक्ष्यात प्रस्तुत केल्याची बहुविध उदाहरणे हिंदी चित्रपटसृष्टीत विद्यमान आहेत.



चित्रपट ही मूलत: व्यावसायिक कला आहे व हे भान निर्मात्यांनी जपल्याखेरीज तरणोपाय नसतो. चित्रपट रसिकांना चित्रपटात नेमके काय भावेल व त्यायोगे चित्रपट तिकीट खिडकीवर यशस्वी होईल याचे काही ठाम गृहितक आजतागायत अस्तित्वात आलेले नाही. त्यामुळेच मागील अनुभवांच्या आधारे नवीन चित्रपटात यशस्वी होऊ शकणारी सकल गृहितके प्रयुक्त करणे, हा व्यावसायिक चित्रपट निर्मात्यांसाठी जोखीम टाळण्याचा हुकमी मार्ग सदोदित होता व आहे. सुरुवातीपासून ते साधारणत: १९६० च्या दशकापर्यंत हिंदी चित्रपटसृष्टीत पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक चित्रपटांचा वरचष्मा होता. बहुसंख्य कथा-कल्पना व त्यावर बनलेले चित्रपट हे सरधोपट व बहुतांश वेळेस बाळबोध असत. १९६० च्या दशकात, हिदी चित्रपटांना आधुनिक कलेचा व काळाचा स्पर्श झाला. 'हरवले-गवसले', 'शारीर-प्रणयकथा', 'महानगरातील बकाल जीवन', 'बेरोजगारी व गरिबी', 'गुन्हेगारी' अशा समाजाच्या वास्तवाला पडद्यावर आणणाऱ्या चित्रपटांची चलती सुरू झाली. याचा उपोद्घात केला शम्मीकपूर या बंडखोर नायकाने..! १९६९ साली हिंदी चित्रपटसृष्टीत नव्या मनूंनी जुन्या प्रस्थापितांना संपूर्णत: बाजूला सारून आपले साम्राज्य निर्माण केले. राजेश खन्ना हा या नव्या मनूंचा प्रतिनिधी चेहरा. १९७० चे दशक अमिताभ बच्चन या 'संतप्त तरुण नायक' प्रवृत्तीचे दशक होते. चित्रपटांचा बाज आमूलाग्र बदलावयास प्रारंभ झाला होता. या परिस्थितीत, काळानुरूप व चित्रपटांच्या बदलत्या परिपोषास साजेशा तडाखेबंद कथा लिहिणाऱ्या जोडीचा उदय होणे, ही एक इष्टापत्ती. सलीम-जावेद या कथा, पटकथा व संवाद लेखकांचा हिंदी चित्रपट प्रतलावर झालेला प्रवेश एका अर्थाने चित्रपटसृष्टीला व्यावसायिक व शिस्तबद्ध रूप देण्यास कारणीभूत ठरला.

२४ नोव्हेंबर १९३५ रोजी इंदूर (मध्यप्रदेश) येथे पोलिस अधिकाऱ्याच्या घरी जन्माला आलेल्या सलीम खान यांच्यावर इंदूर व माळवा विभागाच्या खुशालचेंडू व मौजमजा करण्याच्या वृत्तीचा गाढ प्रभाव होता. निसर्गत: देखणे रूप प्राप्त झालेल्या सलीम खान यांच्यावर चित्रपट दिग्दर्शक के. अमरनाथ यांची एका विवाह सोहळ्यादरम्यान नजर पडली व त्यांनी सलीम खान यांना मुंबईला येण्याचे निमंत्रण दिले. १९६० च्या दशकाच्या सुरुवातीच्या वर्षात सलीम खान यांनी चित्रपटसृष्टीत सहायक तंत्रज्ञ, सहायक दिग्दर्शक म्हणून वेगवेगळ्या निर्मिती संस्थांमध्ये काम केले. अर्थात, त्यांना पडद्यावर अभिनेते म्हणून चमकण्याची अतीव इच्छा होती. बचपन (१९६३), तिसरी मंजील (१९६६), दीवाना (१९६७) या चित्रपटात नगण्य भूमिका करून सलीम खान यांना आपण अभिनेता म्हणून यशस्वी होऊ शकत नाही, हे उमजले. आयुष्य ओढग्रस्त झाले असतानाच त्यांची भेट जावेद अख्तर या नवयुवकाशी 'सरहदी लुटेरा' या चित्रपटाच्या निर्मिती दरम्यान झाली.

प्रसिद्ध शायर जां निसार अख्तर यांच्या घरी १७ जानेवारी १९४५ रोजी जन्माला आलेल्या जावेद अख्तर यांच्यावर सुरुवातीपासून पुरोगामी व निधर्मी संस्कार झाले. घरातील साहित्यिक वातावरणात त्यांची नैसर्गिक गुणप्रभा बहरली. जावेद अख्तर यांच्यावर सुरुवातीपासून सुप्रसिद्ध उर्दू रहस्यकथा लेखक इब्ने सफी यांच्या लेखनशैलीचा प्रभाव होता. १९६५ च्या सुमारास वडिलांशी मतभेद झाल्यामुळे त्यांनी मुंबईस प्रस्थान केले. साहिर लुधियानवींकडे त्यांनी आश्रय घेतला. ते साहिर यांचे मानसपुत्र होते. त्यांच्यावर कैफी आझमी यांच्या काव्य व गीत लेखनाचाही प्रभाव होता. आपसूकच त्यांची पावले चित्रपटसृष्टीकडे वळली. त्यांच्यावर ख्वाजा अहमद अब्बास व बिमल रॉय यांच्या वास्तववादाचा पगडा होता. १९६९ साली प्रदर्शित झालेल्या 'यकीन' चित्रपटात त्यांना संवाद-लेखक म्हणून संधी मिळाली. परंतु चित्रपट अयशस्वी झाल्यामुळे त्यांच्या भवितव्याविषयी प्रश्नचिन्ह उभे राहिले. याच सुमारास जावेद अख्तर यांची भेट सलीम खान यांच्याशी अब्रार अल्वी यांच्या निवासस्थानी झाली. असे म्हणतात की जावेद अख्तर व सलीम खान यांनी एकत्र चित्रपटांच्या लेखन विभागात लक्ष केंद्रित करून एकत्र काम केल्यास दोघांचाही फायदा होईल व स्थैर्य मिळेल, अशी आदेशवजा सूचना खुद्द अब्रार अल्वी यांनी केली व त्यानुसार सलीम-जावेद ही लेखकांची जोडी जमली.

सलीम खान हे वयाने ज्येष्ठ असल्यामुळे त्यांचे नाव श्रेयनामावलीत पहिले येईल असा जावेद अख्तर यांचा आग्रह होता. या सर्व घटना घडल्या त्या १९७१ साली. अशोककुमार यांची निर्मिती असलेल्या 'अधिकार' (१९७१) या चित्रपटाची पटकथा लिहून त्यांनी आपल्या देदीप्यमान कारकीर्दीची शांत व फारशी लक्षणीय नसलेली सुरुवात केली. चित्रपटाचे संवाद जरी रमेश पंत यांनी लिहिले असले तरीही संवादात चमकदार कल्पना पेरून सलीम-जावेद यांनी चित्रपटास सृजनात्मक योगदान दिले. प्राण यांनी साकारलेली शिकारी बन्ने खाँ भोपाली ही व्यक्तिरेखा सलीम-जावेद यांना ठसठशीत ओळख मिळवून देती झाली. सलीम-जावेद यांना घवघवीत यश मिळवून देणारा चित्रपट म्हणजे 'अंदाज' (१९७१). रमेश सिप्पी यांचा यशस्वी दिग्दर्शक म्हणून प्रवास याच चित्रपटापासून सुरू झाला.

गमतीचा भाग म्हणजे या चित्रपटाची पटकथा सलीम-जावेद यांनी गुलजार यांच्या समवेत लिहिली होती. पण, सलीमजावेद यांना उत्तुंग यश प्रदान करणारा चित्रपट होता 'हाथी मेरे साथी' (१९७३). चिन्नाप्पा देवर निर्मित हा चित्रपट 'दैवा चेयल' या तामिळ चित्रपटाची पुनर्निमिती होता. पण सलीम-जावेद यांनी मोठ्या कुशलतेने त्यास मानव व प्राणी यांचे परस्परावलंबित्व, साहचर्य व जिव्हाळा याची जोड दिली. याच चित्रपटात त्यांना सर्वप्रथम पटकथा लेखक म्हणून श्रेय मिळाले. याचवर्षी आलेला 'सीता और गीता' चित्रपट त्यांना पटकथा-संवाद लेखक म्हणून यशोशिखराकडे घेऊन गेला. अर्थात, ही वादळपूर्वीची शांतता होती.

(पान ६ वर)

# संस्कृती सणांची : शिदोरी आरोग्याची, वैभवाची!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

एका २१ वर्षाच्या विवाहित तरुणाला घेऊन लोक हॉस्पिटलमध्ये आले. मासिव हार्टअटॅकमुळे त्याच्या हृदयाचे ठोके पूर्ण थांबले होते. ब्लडप्रेशर शून्य होते. वैद्यकीय दृष्टीने तो मृत्यू पावला होता. तरीही एक शेवटचा प्रयत्न करण्यासाठी ताबडतोब त्याला ऑपरेशन टेबलवर घेण्यात आले. आधी हार्टमसाज करून लगेच कृत्रिम जीवनआधार प्रणाली कार्यान्वित करण्यात आली. ऑपरेशन एक तास चालले. डॉक्टरांच्या कौशल्यामुळे व वेळेवर योग्य उपाय झाल्यामुळे त्याचे हृदय पुन्हा काम करू लागले. त्याचा जीव वाचला. नंतर त्याला आयसीयूमध्ये ठेवले.

थोड्यावेळाने तो पूर्ण शुद्धीवर आला. पण डॉक्टरांना प्रश्न पडला याला हार्टअटॅक आलाच कसा? कारण त्याला डायबेटिस नव्हता, हायब्लडप्रेशरचा त्रास नव्हता, तो लठ्ठ नव्हता. त्याला दारू किंवा सिगारेटचे व्यसन नव्हते. डॉक्टरांनी त्याच्या वडिलांना बोलावले व माहिती घेतली. तो खूप हुशार मुलगा असल्याने एकविसाव्या वर्षीच सीए झाला. लग्न झाले. त्याची बायको आयटी इंजिनीयर आहे. त्यांना चार महिन्यांची मुलगी सुद्धा आहे असे कळले. मग डॉक्टरांनी त्याच्या पत्नीला बोलवा असे म्हटल्यावर, मुलाचे वडील म्हणाले, त्यांचे पटत नाही. लवकरच त्याचा डायवोर्स होणार आहे. तरीही डॉक्टरांनी खूप आग्रह करून तिला भेटायला आणले. डॉक्टर तिच्याशी एकांतात बोलले व त्यांचे आपसात न पटण्याचे कारण जाणून घेतले. दोघांचाही अहंकार, छोटासा गैरसमज व अपुरा संवाद यामुळे त्यांच्यात बिनसले होते. डॉक्टरांनी तिला व पूर्ण कुटुंबाला नीट समजावून सांगितले की पुढचे तीन महिने प्रत्येक आठवड्याला नवऱ्याच्या हाताला धरून तिने त्यांच्या हॉस्पिटलमध्ये तपासणीला आणायचे आहे. डॉक्टरांच्या प्रभावी समुपदेशनाने ती तयार झाली. ३ महिन्यांनी दोघांनीही डायवोर्स घेणे रद्द केले. आता त्यांची चार वर्षांची मुलगी तिच्या आईला लवकरच होणाऱ्या बाळाची वाट पाहते



आहे. खरी कारणे कोणती? कालामनानुसार जीवनशैलीत बदल होणारच होते हे ठीक पण तरीही सध्याच्या जीवनशैलीत चांगले बदल जर लगेच केले नाहीत तर ते आरोग्याला घातक आहे. उदा. पूर्वी- जन्माष्टमीला घरोघरी हाताने गाय, कृष्ण, गोकुळ तयार करत असत. चैत्रगौरीचे हळदी-कुंकू व त्यात विविध देखावे तयार केले जायचे, तान्ह्या-पोळ्याला बोजाराची धूम, हरितालिकेला उत्सव-जागरण, दसऱ्याला ४०-५० घरी सोनं द्यायला जाणे, कोजागरीला भुलाबाईची गाणी, दिवाळीच्या दिवसात किल्ले व फराळासाठी घरोघरी मुलामुलींची धमाल! या सगळ्या सणांच्या काळात अनेक कला व विविध प्रकारचे कौशल्य जोपासले जायचे. मित्र-मैत्रिणी सोबत होळी खेळायचे. मनावरचा ताण हलका व्हायचा. पण टीव्ही, लॅपटॉप आणि आता मोबाईल-इंटरनेट आल्यावर लहान-मोठे सगळेच त्यात वाहवले आहेत.

आपसातील संवाद हरवलाय त्यामुळे आपसातील विचारांचे आदानप्रदान, ज्ञानवर्धन व तणावाचे व्यवस्थापन होत नाही. एकटेपण वाढले. मेहनतीची सवय कमी झाली. त्याच वेळी आज स्वयंपाक करायचा कंटाळा आला! आणि असा कंटाळा येण्याचे प्रमाण वाढले. फोनवर ऑर्डर करून काही मिनिटांत हवा तो पदार्थ घरपोच मिळतोय्. या प्रकारे डायलफॉर-फूड व पिझ्झा संस्कृतीमुळे अनारोग्य वाढले. घरात आईला मदत करून घरकाम शिकणे बंद झाले. पण याच सोबत वरवर न दिसणारा एक फार मोठा बदल झाला. तो म्हणजे मुलांचे आईवर अवलंबून राहणं तर कमी झालंच पण सोबत घरपणंच हरवलं! याचा परिणाम म्हणून १४ वर्षांच्यापेक्षा जास्त वयाच्या मुलांना घराची, पालकांची ओढ कमी नव्हे तर नाहीशीच झाली. त्यांचे घरात राहणे एखाद्या हॉटेलात राहतात तसे झाले. म्हणजे घरातीलच नव्हे तर स्वतःच्या बेडची, कपड्यांच्या कपाटाची, अभ्यासाच्या टेबलची स्वच्छता करीत नाहीत. सतत पूर्ण लक्ष मोबाईलमध्येच! अभ्यासात लक्ष नाही. व्यायाम नाही. कुणाशी बोलणे नाही. कुठलीही साधना किंवा उपासना नाही. आणि मग धर्माबद्दल काहीच ओढ नाही. कोणता सण केव्हा, त्याचे काय महत्त्व आहे ते माहीत नाही. सगळं लक्ष फक्त आणि फक्त मज्जा करण्याकडे! वय लहान असो वा मोठे, सर्वांची शारीरिक मेहनत कमी झाली, पोटाचा घेर वाढला. मग प्रत्येक कुटुंबाचा औषधांचा आणि एकूणच खर्च वाढला. अयोग्य जीवनशैलीमुळे गुणसूत्राच्या टेलोमेअरची लांबी कमी होऊन त्यामुळे तणाव, अकाली वृद्धत्व व मृत्यू वाढलेत. हॉटेलमधील अन्न तयार करणारे आचारी किंवा 'कूक' यांची राहणी कधी बघितली का? शिसारी येते! शिवाय ते आईसारखे आपलेपणाने प्रेमाने बनवत नाहीत. तामसी मनाने मालकाला शिव्याशाप देत, तोंडात बिडी, त्यांचे हात व शरीर अस्वच्छ असताना, प्रत्यक्ष ते किचनसुद्धा घाण असताना, त्यांचे घामाचे थेंब अन्नात पडत असताना ते ऑर्डर मागून ऑर्डर तयार करत राहतात. एवढे सर्व झाल्यावर ते गरम अन्न लगेच प्लॅस्टिकच्या डब्यात टाकून पॅक करतात व तुमच्या घरी पोहोचवतात. वेळोवेळी वैज्ञानिकांनी सांगितले आहे की, प्लॅस्टिकमधील गरम अन्न खाल्ल्यामुळे किंवा प्लॅस्टिकच्या कपात चहा-कॉफी घेतल्यामुळे कॅन्सरसारखे रोगी वाढत आहेत. प्लॅस्टिकच्या बाटलीतील पाणी पिण्याची सवय लागल्यामुळे अगदी तान्ह्या बाळाला मिळणाऱ्या आईच्या दुधातसुद्धा मायक्रोप्लास्टिकचे कण आढळलेत. त्यामुळे छोट्या बाळांची रोगप्रतिकारकशक्ती कमी होऊन, त्याचे आरोग्य धोक्यात आहे.


आयुर्वेदातील ऋतुचक्र आणि सणांचे शास्त्र आयुर्वेदानुसार बारा महिन्यांमध्ये प्रत्येकी दोन महिन्यांकरिता एक अशी शिशिर, वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत या सहा ऋतूंची गणना होते. आयुर्वेदात ऋतूची लक्षणे आणि त्यानुसार पाळावयाचे नियम आहेत. शिशिर, वसंत आणि ग्रीष्म या तीन ऋतुकाळामध्ये अग्नी-शक्तीचे प्राबल्य असते. या काळात सूर्याच्या उष्णतेने वातावरणातील व शरीरातील जलांश शोषून घेतला जातो, वायूचा रुक्ष आणि तीक्ष्ण गुण वाढतो. हे बदल शिशिर ऋतूत कमी, वसंत ऋतूत मध्यम आणि ग्रीष्मामध्ये सर्वांत जास्त जाणवतात. याच्याबरोबर उलट वर्षा, शरद, हेमंत ऋतू या काळात चंद्राची शक्ती वाढते व सूर्याची शक्ती कमी होते. पावसामुळे वातावरणातील व शरीरातील द्रव अंश वाढतो. स्निग्धता वाढते, विसर्ग कालामध्ये वर्षा ऋतूत अल्प, शरद ऋतूत मध्यम, हेमंत ऋतूत उत्तम बलवृद्धी होते.

**(१) शिशिर ऋतुचर्या (जानेवारी/फेब्रुवारी) :** यात उत्तरेकडून थंड वारे वाहतात. शारीर-रुक्षता काही प्रमाणात वाढते. याकाळात वात वाढवणारे तिखट, कडू, कषय चवीचे पदार्थ खाऊ नयेत. तसेच शीत आणि रुक्ष पदार्थ खाऊ नयेत. शिशिर ऋतुकाळात भूक चांगली लागते; म्हणून दूध, दुधाचे पदार्थ, गूळ, नवीन तांदूळ यांचे सेवन करावे. रोज डोके व संपूर्ण शरीराला तेल लावून गरम पाण्याने स्नान करावे.

**(२) वसंत ऋतुचर्या (मार्च/एप्रिल) :** या काळात वारे दक्षिण दिशेकडून वाहतात. सूर्याची प्रखरता वाढते, त्यामुळे शरद ऋतूत शरीरात साठलेला कफ प्रकुपित होतो. प्रकुपित झालेल्या कफाचे तीव्र वमन, नस्य, कफघ्न औषधे देऊन शमन करावे. हलके व रुक्ष अन्न सेवन करावे, जुने जव, गहू, मध इत्यादी अन्नपदार्थ सेवन करावेत.

**(३) ग्रीष्म ऋतुचर्या (मे/जून) :** यात सूर्यकिरण फार तीव्र असतात. वारा नैर्ऋत्य दिशेकडून वाहतो. तो पीडादायक असतो, शरीर कफ अतीव उष्म्यामुळे क्षीण होते, त्यामुळे वात वृद्धी होते. या ऋतूत शरीरात कफदोषाचा क्षय व वातदोषाचा संचय अशी परिस्थिती असल्याने डाळिंब, द्राक्षे अशा फळांचे रस, लिंबू सरबत, शहाळ्याचे पाणी, कोकमाचे सार असे तर्पण करणारे द्रव पदार्थ आहारात अधिक असावेत. थंड पाण्याने स्नान करावे. दूध, साखर, तांदूळ, आंबट पदार्थ, मुरंबे, सरबते यांचे सेवन करावे. मद्यासारखे तीक्ष्ण द्रव्याचे सेवन करू नये. दुपारचे वेळी उन्हात फिरणे टाळावे. जेथे झाडांमुळे गारवा आहे अशा जागी ठिकाणी झोपावे.


**(४) वर्षा ऋतुचर्या (जुलै/ऑगस्ट) :** यात ग्रीष्म ऋतूत तापलेल्या जमिनीवर पावसाचे थेंब पडल्याने जमिनीतून वाफा




येऊ लागतात, वारे जोराने वाहतात. या ऋतूत अम्ल विपकाने, पाणी गढूळ झाल्याने व अग्निमंद झाल्याने सर्व दोषांचा प्रकोप होतो. प्रकुपित दोषांना वमन, विरेचन, बस्ती इत्यादी उपक्रमांनी सम स्थितीत आणावे. वर्षा ऋतूत जुने धान्य, मसाला व फोडणी देऊन केलेल्या विविध सूप व सार, दह्याची निवळी, गरम पाणी इत्यादींचा आहारात समावेश करावा.

**(५) शरद ऋतुचर्या (सप्टेंबर/ऑक्टोबर) :** यात दिवसा सूर्यकिरणे तीव्र असतात व रात्री हवा थंड असते, या कारणाने वर्षा ऋतूत साठलेले शारीर पित्त प्रकुपित होते. या पित्ताचे शमन करण्यासाठी कडू रसाचे काढे, तूप इत्यादी विरेचनासाठी वापरावे. विरेचनाबरोबर रक्तमोक्षणाचाही उपयोग करावा. मधुर, तुरट, कडू रसाचे पदार्थ खावेत. तांदूळ, मूग, पडवळ, आवळा, मध, साखर, इत्यादी पदार्थांचा आहारात समावेश करावा. तीव्र ऊन, दिवसा झोपणे, मद्य, क्षार, दही, तेल इत्यादींचे सेवन करणे तसेच पोटभर जेवण करणे टाळावे.

**(६) हेमंत ऋतुचर्या (नोव्हेंबर/डिसेंबर) :** या काळात थंड वारे वाहू लागतात, अग्नी प्रदीप्त होतो व त्यामुळे भूक जास्त लागते. मधुर, अम्ल, लवण रसयुक्त आहाराचे सेवन भरपूर करावे, व्यायाम करावा. त्यानंतर अंगाला तेल व उटणे लावून गरम पाण्याने स्नान करावे. आहारात गूळ, रवा, कणिक, उडीद, ऊस, दूध यापासून बनवलेल्या पदार्थांचा वापर करावा. ताजे सकस अन्न, गरम पाणी, गरम वस्त्रे वापरावीत. भारतीय सण व आहार आपले सण म्हणजे शास्त्र व संस्कृती यांचा अनोखा समन्वयच आहे. त्यात स्वच्छतेसोबतच ठरावीक आहार व नियमानुसार वागणाऱ्यांचा तणाव नियंत्रणात राहून मानसिक व शारीरिक आरोग्याचा लाभ होतो. तेव्हा शास्त्रशुद्ध सनातन धर्माचे व सणांचे उत्साहाने व निष्ठेने पालन करा आणि दीर्घआयुष्य व वैभव प्राप्त करा. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत)



## विठुचा गजर । आत्मानंद ।।

ध्यानी मनी एक । करावा विचार ।।
जीवनाचे सार । शुद्ध कर्म ।।१।।

नको खेद कैसा । फुकाचा जीवाला ।।
आत्मरूप झाला । तोचि धन्य ।।२।।

दुःखाचे डोंगर । भोगने एकटे ।।
मौनापुढे थिटे । सत्य जाण ।।३।।

दिंडीत चालते । सुखाची पालखी ।।
प्रेम भाव मुखी । हरिनाम ।।४।।

आत्म्याच्या अंगणी । नामाचा जागर ।।
विठुचा गजर । परमानंद ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८


## शांतले मन शांतले मन

शांतले मन शांतले मन।
जिंकिले ज्यानेच हे मन ।।धृ।।
खेळ आशा,नी निराशा ।
तोच देई, प्रेरणा मन ।।१।।
धावते हे,सारखे रे ।
निर्मिले कां, रे असे मन ।।२।।
वेदना काया, मनाला ।
तोच जाणि रे प्रयोजन ।।३।।
रंग दिधले, मोद घ्याया।
थोर दृष्टी,मागते मन ।। ४।।
सारी, क्षुधाही ।
लाभताची रे कृपाधन ।।५ ।।



सुनील बर्दापूरकर

## ओढ



निघे गिरीतून धार
गमे निर्मल बालिका
तिच्या अवखळ लीला
जशी वाजते वंशिका...१
कशी खळखळ वाजे
नाद किती हा मधूर,
तिच्या जलातच आहे
संगीताचे सप्त सूर...२
झाली तरुण सरिता।
ओढ तिला मिलनाची
तिची लगबग वाढे
खळाळत्या प्रवाहाची...२
मिळे सरिता सागरा
झाले मिलन साजिरे
सागराचे नीळे जळ
झाले अधिक गहिरे...४

मंजुषा शिनखेडे

# सोने झळाळणार रोजगार वाढणार

अर्थोद्योग
महेश देशपांडे

अर्थनगरी सरत्या आठवड्यामध्ये नेहमीप्रमाणेच लगबगीत राहिली. सोन्याचे भाव नव्वद हजारांच्या पुढे जाण्याची शक्यता चर्चेत असताना वाहनांचा खप घसरल्याने उद्योग चिंतीत झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, 'फ्लिपकार्ट' नवीन एक लाख नोकऱ्या देण्याची तयारी करत असताना 'ॲमेझॉन'च्या माध्यमातून देशी उद्योजकांना निर्यातीची संधी मिळणार असल्याचे वृत्त समोर आले. याच सुमारास फिनटेक, स्टार्टअपमध्ये महिला संचालकांच्या संख्येत वाढ होत असल्याचे आढळून आले. सोन्यात गुंतवणूक करण्याचा विचार करणाऱ्यांनी येत्या काळात त्यातून किती परतावा मिळू शकतो हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. परताव्याच्या बाबतीत सोने इतर सर्व मालमत्ता वर्गांपेक्षा नेहमीच चांगले असल्याचे सिद्ध झाले आहे.

विशेष म्हणजे शेअर बाजार किंवा मालमत्तेच्या किमती घसरल्या, तरी सोन्याची चमक कायम राहते. यामुळेच अनेक वर्षांपासून सोने हा गुंतवणुकीसाठी लोकांचा आवडता पर्याय राहिला आहे. सध्या सोन्याचा भाव ७१ हजार रुपये प्रति तोळा आहे. काही रिपोर्टसनुसार सोन्याचा भाव लवकरच ७५ हजार ते ऐंशी हजार रुपये प्रति तोळा दरापर्यंत पोहोचू शकतो. एका अहवालात तर आगामी काही महिन्यांमध्ये सोने नव्वद हजार रुपये प्रति तोळा होण्याचा अंदाज आहे. 'बँक ऑफ अमेरिके'च्या अंदाजानुसार २०२५ पर्यंत आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याची किंमत तीन हजार डॉलर्स प्रति औंसपर्यंत पोहोचू शकेल. या वर्षी सोन्याच्या किमतीत २१ टक्क्यांनी वाढ झाली. सोन्याची किंमत तीन हजार प्रति औंसांवर तर भारतात २४ कॅरेट सोन्याच्या दहा ग्रॅमची किंमत ९० हजार रुपयांपर्यंत जाऊ शकते. 'गोल्डमन सॅक्स'चा अंदाज आहे की २०२५ च्या सुरुवातीपर्यंत सोन्याच्या किमती २,७०० डॉलर्स प्रति औंसपर्यंत पोहोचू शकतात. त्यामुळे भारतात सोन्याची किंमत प्रति तोळा ८१ हजार रुपये होऊ शकते. दरम्यान, देशातील वाहनविक्रीमध्ये घट झाल्याने ऑटोमोबाईल कंपन्यांची चिंता वाढल्याचे पाहायला मिळाले.

ऑगस्टमध्ये भारतातील प्रवासी वाहनांच्या किरकोळ विक्रीमध्ये वार्षिक पाच टक्क्यांनी



**सरत्या आठवड्यामध्ये सोन्याचे भाव नव्वद हजारांच्या पुढे जाण्याची शक्यता चर्चेत असताना वाहनांचा खप घसरल्याने उद्योग चिंतीत झाल्याचे पाहायला मिळाले. 'फ्लिपकार्ट' एक लाख नवीन नोकऱ्या देण्याची तयारी करत असताना 'ॲमेझॉन' देशी उद्योजकांना निर्यातीची संधी देणार असल्याचे वृत्त समोर आले. याच सुमारास फिनटेक, स्टार्टअपमध्ये महिला संचालकांच्या संख्येत वाढ होत असल्याचे स्पष्ट झाले.**

घट झाली आहे. 'एफएडीए' (फाडा) या उद्योग संघटनेने ही माहिती दिली. 'फाडा'ने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ऑगस्टमध्ये एकूण ३०९,०५३ प्रवासी वाहनांची नोंदणी झाली होती तर ऑगस्ट २०२३ मध्ये ही संख्या ३२३,७२० होती. ग्राहकांच्या खरेदीला होणारा विलंब आणि सततचा मुसळधार पाऊस यांसह खराब ग्राहक प्रतिसादामुळे ऑगस्टमध्ये देशातील कार विक्रीमध्ये घट झाली आहे. वाहने आता ७०-७५ दिवस गोदामांमध्ये ठेवली जातात. मूळ उत्पादक मासिक आधारावर डीलर्सना पाठवल्या जाणाऱ्या वस्तूंची संख्या वाढवत आहेत. त्यामुळे समस्या आणखी बिकट होत आहे. 'फाडा'ने सर्व बँका आणि बिगरवित्तीय संस्थांना विनंती केली आहे की त्यांनी जास्त स्टॉक ठेवलेल्या डीलर्सना दिलेले वित्त नियंत्रित करावे.

आता रोजगाराच्या आघाडीवरील लक्षवेधी बातम्यांची एक झलक. आघाडीची ई-कॉमर्स कंपनी 'फ्लिपकार्ट' आगामी सणासुदीच्या काळात आयोजित 'द बिग बिलियन डेज २०२४' या सेलदरम्यान देशभरात सुमारे एक लाख नवीन रोजगार निर्माण करेल, अशी अपेक्षा आहे. 'फ्लिपकार्ट'ने म्हटले आहे की या उत्सवाच्या विक्रीपूर्वी त्यांनी नऊ शहरांमध्ये ११ नवीन पूर्तता केंद्रे स्थापन केली आहेत. त्यामुळे देशभरात या केंद्रांची संख्या ८३ झाली आहे. 'वॉलमार्ट'ने सांगितले की 'फ्लिपकार्ट' देशभरात आपल्या पुरवठा साखळीमध्ये एक लाखाहून अधिक नवीन नोकऱ्या निर्माण करणार आहे. 'फ्लिपकार्ट'च्या मते, या नवीन नोकऱ्या पुरवठा साखळीच्या विविध क्षेत्रांमध्ये असतील. यात इन्व्हेंटरी मॅनेजर, वेअरहाऊस असोसिएट्स, लॉजिस्टिक कोऑर्डिनेटर, किराणा भागीदार आणि डिलिव्हरी ड्रायव्हर्स यांचा समावेश आहे. तथापि, सणासुदीच्या काळात ई-कॉमर्स कंपन्यांनी निर्माण केलेल्या नोकऱ्या अनेकदा हंगामी असतात. 'फ्लिपकार्ट'ने म्हटले आहे की ते सणासुदीच्या आधी नवीन कर्मचाऱ्यांसाठी विस्तृत कौशल्यविकास आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करेल. याच सुमारास 'ॲमेझॉन' आपल्या प्लॅटफॉर्मद्वारे भारतीय निर्यात कंपन्यांना अमेरिका आणि ब्रिटनमध्ये पाच अब्ज डॉलर्स किमतीच्या लहान वस्तू विकण्यास मदत करेल. 'ॲमेझॉन'च्या 'ग्लोबल सेलिंग प्रोग्राम'अंतर्गत भारतातील सुमारे दीड लाख छोटे निर्यातदार 'ॲमेझॉन'च्या 'ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म'द्वारे आपली उत्पादने थेट परदेशी ग्राहकांना विकू शकतील. 'ॲमेझॉन'ने २०१५ मध्ये ग्लोबल सेलिंग प्रोग्राम सुरू केला. 'ॲमेझॉन'च्या या निर्णयाचा सर्वात मोठा फटका चीनला बसणार आहे. कारण याआधी छोट्या-छोट्या बहुतांश वस्तू चीनमधून आणल्या जात होत्या; पण जागतिक पुरवठा साखळीत भारताच्या वाढत्या वर्चस्वाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या आता चीनमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत आहेत. 'ॲमेझॉन'चे 'ग्लोबल ट्रेड'चे संचालक भूपेन वाकणकर म्हणाले की आम्ही अशा साधनांमध्ये आणि तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करत आहोत, ज्यामुळे विक्रेत्यांना उत्पादनासह विक्री वाढवून आपल्या व्यवहारांचा आवाका वाढवता येईल.

'ॲमेझॉन' २०२४ च्या अखेरीस ई-कॉमर्स निर्यात १३ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्यासाठी भारतीय व्यवसायांना मदत करण्याच्या मार्गावर आहे. वाकणकर म्हणाले की 'ॲमेझॉन'ने कापड, दागिने, घरगुती वस्तू आणि आयुर्वेद उत्पादने ऑफर करणाऱ्या देशभरातील छोट्या उत्पादन कंपन्यांना जोडण्यासाठी भारताच्या वाणिज्य मंत्रालय आणि व्यापार संघटनेसोबत भागीदारी केली आहे. ग्राहकांना असा माल परदेशात पाठवणे सोपे आहे आणि आयात कराचा परिणाम होत नाही. 'वॉलमार्ट'ने २०२० मध्ये म्हटले होते की आपण २०२७ पर्यंत भारतातून १० अब्ज डॉलर्सपर्यंत पुरवठा वाढवू. दरम्यान, आर्थिक आघाडीवर महिलांच्या कामगिरीबाबत एक लक्षवेधी बातमी समोर आली आहे. स्टार्टअप्स आणि फिनटेकमध्ये महिला संचालकांची संख्या गेल्या दहा वर्षांमध्ये तिपटीने वाढली. अलिकडे अनेक स्टार्टअप्स सुरू होत आहेत. मोठी गोष्ट म्हणजे कंपन्या आणि स्टार्टअपमध्ये महिलांची उपस्थिती वाढत आहे. तामिळनाडूमध्ये ही संख्या चौपटीने वाढली आहे. अनेक शासकीय योजनांच्या माध्यमातून अनेक क्षेत्रात महिलांचा सहभागही वाढवला जात आहे. महिला सक्षमीकरणासंदर्भात अनेक योजना राबवल्या जात आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की कॉर्पोरेट जगतात महिलांचा सहभाग वाढत आहे. भारतातील १११ युनिकॉर्नपैकी १८ टक्के कंपन्यांमध्ये महिलांचे नेतृत्व आहे. 'फिक्की'च्या चेन्नई युनिटच्या एका कार्यक्रमात, अर्थमंत्र्यांनी सांगितले की २०१४ मध्ये महिला संचालकांची संख्या २.५८ लाख होती, ती ऑगस्ट २०२४ मध्ये ३.४ पटींनी वाढून ८.८३ लाख महिलांवर पोहोचली आहे. तामिळनाडूमध्ये २०१४ मध्ये कंपन्यांच्या संचालक मंडळावर महिलांची संख्या १५,५५० होती. ती २०२४ मध्ये ४.३ पटीने वाढली. आता तमिळनाडूमधील कंपन्यांच्या संचालक मंडळावर विराजमान असलेल्या महिलांची संख्या ६८ हजार झाली आहे. २०१३-१४ या वर्षात महिला कल्याण आणि सक्षमीकरणाशी संबंधित योजनांसाठी ९७,१३४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात ती ३.१० लाख कोटी रुपये झाली. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)



# ययाति: अहंकारव्याप वासना आणि मानव कल्याणासाठी ज्ञान ह्यातील द्वंद्व

**मराठी कादंबरी क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची समजली जाणारी कादंबरी म्हणजे वि.स. खांडेकर यांची ययाति ही कादंबरी होय. महाभारत हा भारतीय साहित्यातील हा एक महत्त्वाचा विषय जो अनेक भाषांमध्ये अनेक मान्यवर लेखकांनी आपापल्या पद्धतीने जीवन मूल्याचे सार सांगण्यासाठी आपल्या लिखाणात वापरला आहे. वि. स. खांडेकर यांचा जन्म ११ जानेवारी १८९८ मध्ये झाला. शिक्षकी पेशामध्ये असलेले खांडेकर आपल्या कथा, कादंबरी, रूपक, ललित, निबंध आणि कविता या विविध साहित्य प्रकारामध्ये लिखाण करत महाराष्ट्रीयन साहित्यात अजरामर ठसा उमटवून गेले. ययाति या कादंबरीला मराठी भाषेतच नव्हे तर जागतिक साहित्य क्षेत्रात एक विशिष्ट स्थान आहे. १९६० चा साहित्य अकादमी पुरस्कार आणि १९७४ चा सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार त्यांना ययाति या कादंबरीसाठी मिळाला यातच या कादंबरीचे महत्त्व अधोरेखित होते.**

साहित्य शिक्षण


किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

जीवन तत्व, अहंकार, दुराग्रह, मानवी संबंधातील हेवेदावे, मानवी संबंधातील हळव्या भावना, नात्यांमध्ये निर्माण होणारे क्लेश, स्त्री-पुरुषाचे कल्पनातीत संबंधाचे आविष्कार, नात्यांसाठी आणि मानवतेसाठी असीम त्यागाची भावना असे विविध पैलू या कादंबरीत आपल्याला वाचायला मिळतात. ययाति, देवयानी, शर्मिष्ठा, कच, शुक्राचार्य, यती, माधव, मंदार, अलका, कलिका अशा विविध पात्राच्या जीवनाशी आपण एकरूप होतो आणि कधी त्यांच्या विश्वात प्रवेश करून त्या पौराणिक काळाचा हिस्सा होतो हे आपल्याला कळत नाही हे खरे तर लेखक म्हणून वि.स. खांडेकर यांचे यश अन्यथा एखाद्या बोधकथेप्रमाणे महाभारतात सांगितलेल्या या कथेला ४०० पानाच्या महाकादंबरीत रूपांतरित करून कुठेही निरस आणि विरस होणार नाही इतक्या ताकदीने उभे करणे मोठे कठीण काम होते.

पौराणिक कथा तीही महाभारताच्या पूर्वीची असल्यामुळे राजेशाही जीवन, राजविलासी भोग, स्त्री पुरुषाचे शारीरिक पातळीवर एकमेकांना आकर्षित करून निर्माण होणारे संबंध, तत्कालीन वैराग्य भावना, देवदानवांचे युद्ध, स्त्रीद्वेष, निरपेक्ष प्रेम अशा अनेक बाबी या कादंबरीत आपल्याला वाचायला मिळतात. त्या अनुषंगाने या कादंबरीत शैक्षणिक संदर्भ फार अभावाने वाचायला मिळत असले तरी तत्कालीन जीवनावश्यक विद्या आणि या विद्या प्राप्तीसाठी असलेला संघर्ष हेच या कादंबरीच्या कथानकाचे मूळ तर नाही ना? असा प्रश्न पुन्हा नव्याने ही कादंबरी वाचत असताना मला पडला.

नहूष राजाचा मुलगा म्हणून जन्मलेला ययाति अगदी सुरुवातीला आपली कथा सांगण्याची सुरुवात करत असताना गुरु पत्नीच्या मोहामुळे कायमचा कलंक लावून घेणाऱ्या चंद्राचे उदाहरण देतो. त्यावेळी गुरुजी आणि गुरु पत्नीसोबत शिष्याने कोणत्या मर्यादित आणि नात्याने वागले पाहिजे. याची स्पष्टता लेखक करतात. त्याचप्रमाणे जग चुकते, त्या चुकीविषयी ऐकते पण शिकत नाही. मनुष्य शेवटी शहाणा होतो तो दुसऱ्यांना लागलेल्या ठेचानी नाही तर स्वतःला झालेल्या जखमांनी, असे सांगून लेखकाने मनुष्य स्वानुभवातून जास्त शिकतो असे सांगितले आहे. ययाति लहानपणी काव्यात्म भाषा बोलतो, त्यावरून तो कवी होणार असे लोक बोलतात तेव्हा आपल्या मुलाने कवी न होता पराक्रमी वीर झाले पाहिजे असे त्याचे वडील बोलतात, त्यावरून आपल्या देशात शैक्षणिक बाबतीत स्वाभाविक आणि उत्स्फूर्त गुण न पाहता आई-वडिलांच्या इच्छेप्रमाणे शिक्षण थोपवले जाते असे म्हणावे वाटते. ययाति धनुर्विद्येचे शिक्षण घेण्याचा उल्लेख त्यासह ते शिक्षण झाल्यावर आश्रमात वर्षभरासाठी इतर शिक्षण घेण्यासाठी जाणे इत्यादी बाबी राजपुत्राच्या तत्कालीन राजशिक्षणाच्या अनुषंगाने आलेल्या आहेत.

आपला मोठा भाऊ यती राजवैभव सोडून संन्यासी झाला आहे ही जाणीव राजपुत्राला अस्वस्थ करते आणि त्याचा बालपणाचा मुखवटा गळून जातो. ययातिच्या शिक्षणासाठी नहूष महाराज वेगवेगळ्या गुरूंची योजना करतात. हे सर्व गुरु मला माझे शत्रू वाटत असे ययाति म्हणतो. तेव्हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात साधारण हाच भाव आपल्या शिक्षकाबद्दल सुरुवातीच्या काळात असतो असे




आपल्या लक्षात येते. एखादी विद्या आपल्याला साध्य होणार नाही अशा विचाराने नाराज झालेल्या आपल्या शिष्याला धीर देत ते गुरु शिक्षणातून आणि सरावातून तुलाही विद्या येईलच असा धीर देतात. गुरू, मित्र आणि ग्रंथ यांनी आपल्या शरीराला आणि मनाला आकार दिला असे ययाति म्हणतो. हे भाषा आजच्या काळातही लागू पडते. आपला मुलगा कला आणि विद्या शिकला आता त्याच्या लग्न करायला हरकत नाही असे त्याची आई म्हणजे अशोक सुंदरी उद्गारते यावरून संसारात उतरण्यापूर्वी कला आणि इतर विद्या यांचे शिक्षण त्या काळातही महत्त्वाचे होते. सौंदर्य आणि सामर्थ्य यांची पूजा करायचे हे बहुतांश गुरुने ययातिला शिकवले मात्र आश्रमाच्या जीवनात हे दोन्ही नव्हते, देह दंड हा तिथला पाचवा वेद होता, अश्या वर्णनात्मक नोंदी मधून त्या काळातील शिक्षण व्यवस्था कशी होती? हे सांगण्याचा प्रयत्न वि. स. खांडेकर यांनी केलेला दिसून येतो. भविष्य विद्या, गणित, कोटी, खर्व निखर्व असे काही संबोधही या कादंबरीत वाचायला मिळतात. हे सर्व संबोध राज घराण्याची आणि ययातिच्या शैक्षणिक अनुषंगाने आलेले दिसतात.

कादंबरीच्या मूळ कथानाकाचे सूत्रबीज शिक्षण किंवा विद्या प्राप्ती आहे असे मला वाटते असे मी सुरुवातीला म्हणालो त्या मागचे कारण देवधर्माच्या महायुद्धाच्या वेळी हे युद्ध होऊ नये म्हणून अंगिरस ऋषीनी त्यांचा शिष्य कच याच्यामार्फत शांती यज्ञाचे आयोजन करणे. अशा संदर्भातून अंगिरसाचा कच हा शिष्य पुढे राक्षस गुरु शुक्राचार्य यांचा शिष्य होऊन संजीवनी विद्या शिकणे त्या ठिकाणी शुक्राचार्यांची कन्या देवयानी आणि राक्षस राजा वृषपर्वा याची कन्या शर्मिष्ठा यात मत्सर निर्माण होणे आणि त्यातून पुढील कथानक म्हणजे देवयानीचे ययातिशी लग्न, शर्मिष्ठेचा ययाति सोबत गांधर्व विवाह, त्या दोघीतील द्वेष वाढत जाणे, त्यात ययातिची मानसिक आणि शारीरिक कुचंबना अशा विविध गोष्टी घडत जातात. संजीवनी विद्या ही मेलेली माणसं जिवंत करण्यासाठी असलेली विद्या आहे. त्यामुळे ती शिकून देवांना मदत करण्यासाठी कच शुक्राचार्यांकडे जातो, देवयानीला तो गुरू बहीण मानतो. कच ही विद्या शिकण्यासाठी शुक्राचार्यांकडे गेल्यावर राक्षस त्याचा द्वेष करतात त्याला तीन वेळा ठार करतात. मात्र शिष्यावरील प्रेमामुळे शुक्राचार्य त्याला जिवंत करतात. नहूष महाराजांच्या मृत्यूनंतर ययाति अस्वस्थ झाल्यावर राजगुरू ऋग्वेदात असलेल्या अनेक ऋचा म्हणून दाखवतात. मात्र, त्याने राजपुत्राचे समाधान होत नसे. यावरून मानसिक अस्वस्थ असल्यास सर्व विद्या आणि कला निरर्थक ठरतात असे लक्षात येते. कचाला मारून त्याचे तुकडे करून लाडक्या पुढे टाकले तरी शुक्राचार्यांने त्याला जिवंत केले हे पाहून कचाला पुन्हा मारून त्याची राख शुक्राचार्यांच्या दारूत मिसळून ती शुक्राचार्याला प्यायला द्यायची ही योजना राक्षस आखतात. शुक्राचार्य सिद्ध गुरु असले तरी मदिरेच्या आधीन होते. मात्र, पुढे त्यांनी मदिरा कायमचे सोडून दिली, गुरु किंवा शिक्षक यांनी मदिराभक्ती करू नये असा संकेतच वि.स. खांडेकर यांनी आपल्या लिखाणातून दिला आहे.

कादंबरीच्या अनेक ठिकाणी देवयानी ही राक्षसांच्या गुरुची कन्या आहे याचा तिला प्रमाणापेक्षा जास्त अभिमान आहे असे दिसते. तसेच खुद्द शुक्राचार्याला सुद्धा आपण राक्षसांचे गुरु आहोत, सिद्ध योगी आहोत याचा अभिमान असल्याचे जाणवत राहते. उच्चविद्याविभूषण असले तरी गुरुकडे इतका अभिमान असणे योग्य नाही, देवयानीच्या गर्विष्ठ स्वभावाला शुक्राचार्यच कारणीभूत असल्याचे काही प्रसंगातून दिसून येते. त्याचवेळी कचाकडे प्रणयराधन करणाऱ्या देवयानीला कच गुरुबहिण म्हणून स्थान देतो असे प्रसंग खऱ्या अर्थाने उत्तम शिष्याची ओळख करून देणारे आहेत. शुक्राचार्य जेव्हा तपश्चर्या करून संजीवनी विद्या पेक्षा महत्त्वाची अशी प्राप्त करून येतात तेव्हा देवयानी यज्ञाचे नियोजन करते, त्यावेळी अंगिरस मात्र शुक्राचार्यांची तपश्चर्या सात्विक हेतूने झालेला आहे आणि तिचा विनियोग जगाच्या कल्याणासाठी होईल अशी खात्री झाल्याशिवाय मी यज्ञाला येऊ शकत नाही अशी भूमिका घेतात. प्रत्येक विद्येचे कारण हे जगाच्या कल्याणासाठी असले पाहिजे, ही संस्कृती भारताने सुरुवातीपासून स्वीकारली आहे.

सर्वसामान्य माणसाचे जाऊ द्या. मात्र, ज्ञान देणाऱ्या आणि विद्या प्राप्ती करणाऱ्या प्रत्येक गुरु शिष्याने सुरुवातीपासून अशी भूमिका घेतली तर जगाचे कल्याण निश्चित होईल असे या ठिकाणी सांगावे वाटते. अंगिरसाचा शिष्य असलेला कच सुद्धा तेवढीच निर्मळ भूमिका घेऊन या कादंबरीत आपल्याला सातत्याने भेटत राहतो. त्याच्या मनात देवाचा गुरु होण्याची हाव नाही. त्याचवेळी कचाचे दुसरे गुरु शुक्राचार्य मंत्र कचाने संजीवनी विद्या शिकल्यावर त्याहीपेक्षा मोठी विद्या आपण शिकली पाहिजे अशी भूमिका घेतात. या ठिकाणी गुरुपदी असले तरी माणसाचा अहंकार त्याला सोडता येत नाही असे दिसून येते. शुक्राचार्य, अंगिरस, कच, यती आणि प्रसंगी ययाति सर्व पात्रे कधी राजधर्म, कधी मानवता तर कधी स्वतःचा अहंकार यामुळे विद्या प्राप्तीसाठी झटताना दिसतात. (पान ६ वर)

पान १ वरून

## महासत्तेचा पथदर्शक!

देशपातळीवर विचार करता अनेक ऐतिहासिक निर्णय मोदी यांच्या काळात घडले.

अयोध्येत भव्य राम मंदिराची उभारणी, जम्मू-काश्मीरला विशेष अधिकार देणारे 'कलम ३७०' आणि '३५ अ' रद्द करण्याचा निर्णय, पुलवामा घटनेनंतर पाकिस्तानमध्ये घुसून शत्रूला धडा शिकविण्याची केलेली कृती पाकिस्तानला धडकी भरविणारी अशीच होती! नरेंद्र मोदी यांनी भारतास विकसित राष्ट्र करण्याचा संकल्प सोडला आहे. अमृतकालामध्ये त्या दिशेने मोदी सरकारची वाटचाल सुरु आहे. देशकल्याणाच्या अनेक योजना मोदी सरकारने राबविण्याचा संकल्प सोडला आहे.

केवळ देशहिताचाच विचार सदैव करणारी व्यक्ती अवघ्या दहा वर्षांमध्ये किती मोठे कार्य करू शकते, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवून दिले आहे. देशाला परमवैभवाप्रत नेण्याचा जो संकल्प त्यांनी सोडला आहे, त्याची लवकरात लवकर पूर्तता होवो, अशी पंतप्रधान मोदी यांना आज वाढदिवसानिमित्त सदिच्छा!

## व्रत राष्ट्रनिष्ठेचे

दुसरा विचार मूर्तिपूजा थोतांड आहे, पुरोहितवर्गाचा पोट भरण्याचा हा धंदा आहे, असा आहे. ध्यानधारणा आणि समाधी या मार्गानेच अंतिम सत्य जाणता येते, असे सांगणारा एक वर्ग आहे. दुसरा वर्ग सांगतो की, निष्काम कर्म करा, निष्काम भक्ती करा, अंतिम सत्य तुम्हाला गवसेल. विचारांची अशी प्रचंड स्वतंत्रता जगाच्या पाठीवरील कुठल्याही देशात नाही. राज्यघटनेने-कायद्याने हे मूल्य स्वीकारलेले आहे.

राष्ट्राला बांधून ठेवण्याचे काम राष्ट्राची संस्कृती करते. सांस्कृतिक ऐक्याबाबतीत भारताची बरोबरी करील असा कोणताही देश जगात नाही, असे बाबासाहेब म्हणाले होते. युरोपचे उदाहरण घेऊया... युरोपात अनेक छोटे छोटे देश आहेत, ते ख्रिश्चन धर्मीय देश आहेत. एका स्लाव्ह वंशाचे आहेत. प्रत्येकाच्या भाषा वेगवेगळ्या आहेत. राष्ट्र आणि राज्ये वेगळी आहेत. त्यांनी राष्ट्र आणि राज्ये एकच असली पाहिजेत, अशी मोहीम चालविली आणि ती यशस्वी केली. राज्ये ही राष्ट्राची सैनिकी शक्ती आणि आर्थिक शक्ती असते.

एक येशू, एक बायबल, एक मेरी, एक वंश असूनही युरोपातील देश कधीही युरोप म्हणून एक राष्ट्र झाले नाहीत. आपापसातील त्यांची युद्धे अतिशय विध्वंसक होती. आताही रशिया आणि युक्रेनचे युद्ध चालू आहे. जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरीसारख्या देशांना 'सैनिकी देश' असे म्हटले गेले, कारण या देशांतील 'प्रत्येक घर म्हणजे सैनिकांचा अड्डा' असे त्याचे स्वरूप झाले होते. सैनिक म्हटले की शस्त्रे आली आणि सैनिकी शक्ती आली, माणसे मारण्याचे कौशल्य आले.

भारत अशा अर्थाने राष्ट्र नाही. भारत सैनिकी राष्ट्र नाही, शस्त्रधारी राष्ट्र नाही, भारत शास्त्रधारी राष्ट्र आहे. आमचे शास्त्र मानवतेचे शास्त्र आहे. मानवविकासाचे शास्त्र आहे, मानवकल्याणाचे शास्त्र आहे. आम्ही तेव्हा शस्त्रोपासक होतो, जेव्हा शास्त्ररक्षणासाठी शस्त्राशिवाय पर्याय रहात नाही. जेव्हा श्रीकृष्ण सुदर्शन हातात घेतो, तेव्हा समजून सांगण्याचे सर्व उपाय संपून गेलेले असतात. सुदर्शनधारी श्रीकृष्ण आणि भगवद्गीता सांगणारा श्रीकृष्ण हे आपल्या राष्ट्राचे प्रतीक आहे. आपल्या संविधानाची निर्मिती होत असताना आपल्या संविधान निर्माणकर्त्या माता आणि पित्यांनी आपल्या या सनातन वारशाचे जागरण वेळोवेळी केले आहे. आम्हाला स्वातंत्र्य का पाहिजे आहे, तर जगातील पारतंत्र्यातील देशांना मुक्त करण्याची प्रेरणा आम्हाला द्यायची आहे. जागतिक राष्ट्रांच्या समूहात आम्हाला आमचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करायचे आहे, याची जाणीव संविधान सभेतील आपल्या थोर संविधान निर्माणकर्त्यांच्या भाषणातून व्यक्त झाली.

सशक्त राज्याची बांधणी करा आणि मूल्याधारित राष्ट्रजीवनाची उभारणी करा, हा आपल्या संविधानाचा मला समजलेला अर्थ आहे. दुसऱ्या भाषेत हा संविधानाचा आदेश आहे. संविधानाच्या या आदेशामागे कोणतीही पाशवी शक्ती नाही. ही शक्ती राज्य-राष्ट्र कल्याणशक्ती आहे. आपण तिचे वारस झाले पाहिजे. शेवटी,

**संविधान रक्षित, तर राज्य रक्षित**
**राज्य रक्षित, तर राष्ट्र वर्धित!**

## अनफ्रेंड

ज्यादिवशी तो तिला फेसबुकवर भेटला आणि तिने त्याची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारली त्या दिवशी गच्च काळे नभ भरून पावसाळी वारे वाहात होते. मग जशी संततधार सुरू राहावी तसे त्यांचे व्हॉटस्‌अ‍ॅपवर बोलणे सुरू झाले. ती आपली एक छोट्या गावातली चित्रकार मुलगी. तो तिच्या चित्रांवर आकर्षित झालेला एक बडा दिग्दर्शक. दोघांची व्हेवलेंथ अगदी सहज जुळलेली. ''हाय रानभुली काय करतेस?'' एक दिवस पहाटेच त्यांचा मॅसेज आला. ''रानभुली? हे काय नवीन आता?'' ''तुझे नवीन नाव, सतत रानावनात फिरत असतेस ना! म्हणून माझी रानभुली.'' ती नादावली. काही वेगळे घडत होते. असे बोलणे विक्रमला का नाही सुचत? तो आपला नेहमी कॉम्प्युटरमध्येच घुसलेला. विक्रमला सोडून आपण त्यांच्याकडे जरा जास्तच झेपावतोय का? मनात उठलेल्या प्रश्नाने ती सर्रकन् दचकली. घरात आजूबाजूला पाहिले. तिच्यासारखेच तिचे घर लग्नाळू झाले होते. आपण हे लग्न मोडावे का? चटकन तिच्या आत एक प्रश्न उमटला. परंतु आपणही त्यांच्याकडे झुकतोय, याची तिला ठळक जाणीव झाली. दुपारी पुन्हा त्यांचा मॅसेज आला. ती तासभर बोलत बसली. तिने गमतीने विचारलेही, ''मला पण कुठल्या चित्रपटाची नायिका कराल का?'' ''तुला विनापाश यावे लागेल, पण मुंबईला..., जमेल का?'' त्यांचे तडक उलट विचारणे. सिनेमाशी संबंधित प्रत्येकच माणूस वाईट थोडाच असतो. आज ना उद्या आईवडील समजून घेतीलच. हं, विक्रमला खूप वाईट वाटेल, पण सावरेल तोही. कसल्याही शंकाकुशंका न ठेवता सगळ्या बाबींवर विस्तृत बोलणे झाले. तिची खात्री पटल्यावरच फोन ठेवला. भयंकर अस्वस्थतेत ती झोपायला गेली. आयुष्याचा सगळा साचा ठरलेला असताना आता तिला एक नवीन निर्णय घ्यायचा होता. सकाळी फोन आल्यावर कुठलाही अभिनिवेश न बाळगता तिने फोन उचलला. तिचे उत्तर तयारच होते. ''मग काय ठरवलेस तू?'' त्यांचा आत्यंतिक अधीर स्वर. ''आपण समांतर चालूया...'' ती पुढे काही बोलणार तोच विलक्षण वेगात फोन कट झाला. आधार सुटल्यासारखी ती भिजलेल्या झाडा-पाना-फुलात हातपाय मारू लागली. समांतर राहणेही राहणेच आहे ना? त्यांच्याआधी तिच्या आयुष्यात विक्रम येऊन थांबल्याने सोबतीचा अट्टाहास धरण्याची वेळ निघून गेली होती. दुसऱ्या दिवशी न राहवून तिने व्हॉटस्‌अ‍ॅप उघडले. त्यांचा डीपी गायब होता. तिने त्यांना मॅसेज पाठवला, पण मॅसेज गेला नाही. त्यांनी तिला अनफ्रेंड, ब्लॉक केले होते. ती मलूल, दुःखी झाली

जयश्री दाणी

कथा

रश्मी वाघमारे

## परिणय सूत्र



मुंबईच्या अत्यंत आलिशान उच्चभ्रू वसाहतीतील १६ व्या मजल्यावर रोहिणी कॉफी घेत आपल्या अद्ययावत फ्लॅटमधील काचेच्या बाल्कनीत विस-ावा घेत होत्या. तिथून त्यांना महानगरीतील अखंड धावणारी मुंबई दिसत होती. आज रविवार. त्यामुळे रोहिणी गोखले, वय वर्षे ५८, उंच, गोऱ्यापान, देखण्या, एक सफल बिझनेस वूमन, जरा मोकळ्या मनाने सैलावल्या होत्या. त्यांनी शॉर्ट कुर्ता आणि कॅप्री घातला होता. काळे-पांढरे व्यवस्थित कापलेले केस आणि चेहऱ्याला साजेसा चष्मा त्यांच्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वात भर घालीत होता. त्यांची स्वतःची एक नामांकित आर्किटेक्चर आणि इंटिरिअर फर्म होती. त्यांच्या क्षेत्रात त्या नावाजलेल्या, वलयांकित असलेल्या, मात्र नितांत एकट्या होत्या.

हल्ली हा एकटेपणा भेडसावू लागला आहे, अशी जाणीव त्यांना लागली होती. तेवढ्यात त्यांच्या शेजारच्या अपार्टमेंटमध्ये थोडी हालचाल जाणवली. 'अरे वा! कुणीतरी आलंय वाटतं आपल्या बाजूला.' त्या मनोमन सुखावल्या. त्यांना जणू चाळाच लागला, त्या जोडप्याला सहज न्याहाळण्याचा! ती उंच, सडसडीत, शेलाट्या बांध्याची, सावळ्या वर्णाची, काळ्याभोर डोळ्यांची, ३० वर्षांची असावी. मानेवर रुळणारे दाट केस आणि चालण्यात आत्म विश्वास, जणू जिंकायला निघालेली. तिच्याकडे बघत राहावे असे तिचे व्यक्तिमत्त्व! तो उंच, धिप्पाड, गोरापान, कमावलेले शरीर, डोळ्यात किंचित बेफिकिरी आणि स्वतःविषयीचा अभिमान; तिच्यापेक्षा थोडासा मोठा असा-वा. ती सकाळी ९ च्या सुमारास तयार होऊन तिच्या गाडीतून निघायची. तोही थोड्या वेळाने आपल्या मोठ्या गाडीतून जायचा. संध्याकाळी कधीतरी बाल्कनीमध्ये ती कॉफीचा कप आणि क्वचित सिगारेट ओढताना दिसे आणि तो हातात ग्लास घेऊन शांतपणे धावणारी गर्दी बघत असे. रोजचे जेवण मात्र कुठल्या तरी ड्रायव्हरच्या हातून सकाळसंध्याकाळ येत असे. 'बहुतेक यांची नो किचन अशी व्यवस्था दिसतेय...' रोहिणी मनोमन पुटपुटली. 'अगं बाई, घरी काहीच करीत नाही वाटतं ही दोघं? अरे, मी तर खूपच गुंतत चालले की या जोडप्यात.' रोहिणी हलकेच हसत स्वतःशीच बोलली. एकाच मजल्यावर असल्यामुळे एक दिवस तिच्याशी सामना झाला. ती माफक हसली आणि मी तिला म्हटले, 'हॅलोऽ' तिने पण 'हॅलोऽ' म्हटले. ''मी इथेच राहते'' संभाषण वाढवीत मी बोलले. ''हो, दिसता ना मला तुम्ही मॅडम...'' ओळख करून देत म्हणाली, ''मी वरदा, आर्किटेक्ट आहे आणि तो वैभव.. माझी एक स्वतःची आर्किटेक्ट फर्म आहे आणि वैभवची इंजिनीअरिंग कंपनी आहे. आम्ही दोघेही स्वतंत्र व्यवसाय करतो.'' एक दिवस घरातून जोरजोरात वादविवाद नव्हे, चक्क भांडणाचे आवाज येऊ लागले.

एका उच्चभ्रू वसाहतीत, जिथे हसणे बोलणे सारेच कसे मोजून मापून, त्या ठिकाणी वादविवाद तेही जोरात? रोहिणीला आश्चर्य वाटले. काय झाले बरे आज? का बरे भांडत आहेत ही दोघे? दुसऱ्या दिवशी अगदी पडेल चेहऱ्याने तिचे सुजलेले डोळे तिची व्यथा नकळत सांगून गेले. आतापावेतो एकमेकांची थोडी ओळख झाली होती. थोडेसे हसणे, हवापाण्याच्या निरर्थक गप्पा इथपर्यंत आम्ही मजल मारली होती. तिने सांगितले, ''आम्ही लिव्ह-इनमध्ये आहोत गेली सहा वर्ष. मी मुंबईची आणि तो जयपूरचा! तो जयपूरला सारखा जात होता. त्याच्या इतक्यात जयपूरच्या चकरा जरा जास्तच वाढल्याने, आमच्यात कडाक्याचे भांडण झाले. माझा पूर्ण विश्वास आहे त्याच्यावर; पण हे मन कधी कधी साशंक होते, कधी असुरक्षितताही वाटते. ''नको काळजी करूस...'' मी तिचे हलकेसे सांत्वन केले.

जुलै महिना, दिवसभर पावसाने कहर केला होता. मुंबईचा पाऊस. तो रात्री ११ पर्यंत घरी पोचला नाही. तिचे इंटरनेट कनेक्शन गेलेले. फोनची बॅटरीही गेलेली. तिने खूप संकोचत हलकेच बेल वाजवली आणि मदत मागितली. तिच्या डोळ्यात काळजी दिसत होती. तेवढ्यातच तो आल्याची चाहूल लागली आणि ती धावतच गेली त्याच्याकडे. अत्यंत व्याकूळ झालेली. दोघेही घरात गेले आणि मीसुद्धा सुटकेचा निःश्वास सोडला. आता आमची बऱ्यापैकी मैत्री झाली होती. जेव्हा तिला कळले की, माझे आणि तिचे कार्यक्षेत्र एकच आहे तेव्हा तर तिला अतोनात आनंद झाला. ''मॅडम, मला तुमच्यासारखी प्रगती करायची आहे.'' ती म्हणायची. ''तुम्हाला किती मानसन्मान आहे या फील्डमध्ये.'' ''एक विचारू वरदा, पुढे काय? काही ठरवले काय?'' ''मॅडम, मी वाचले आहे तुमच्याविषयी. तुम्ही असा सल्ला द्यावा. तुम्ही तर कितीतरी वर्ष लिव्ह-इनमध्ये होता.'' ''वरदा आम्ही दोघांनी खूप प्रेम केले एकमेकांवर. मात्र बंधन नव्हते. आम्ही स्वतः मर्जीने हा मार्ग स्वीकारला होता. बरीच वर्षे राहिलो एकमेकांबरोबर. मी तेव्हा चाळिशीत होते, तोही. तो पंजाबी, मी मराठी अर्थात हे कधीही आमच्यामध्ये आले नाही.'' ''एकदा तो कामासाठी दिल्लीला गेला. तिथे त्याचे घर होते. त्याला कौटुंबिक जिव्हाळ्याची भुरळ पडली आणि मग त्याने वळूनही पाहिले नाही. कळले की, त्याने लग्न केले. आपल्या समाजात पुरुषाला शंभर गुन्हे माफ आहेत, पण बाईला काही बाबतीत अजूनही परीक्षा द्याव्या लागतात.'' ''मी हट्टाने एकटीच राहिले. आईवडील खूप सम जावयाचे. रोहिणी ऐक गं, कुणीतरी आपलं असं हवं हक्काचं. हल्ली खूप एकाकी वाटतं! लग्न म्हणजे परिणय सूत्र, बंधन नाही असे माझी आई सांगायची. केवळ तडजोड नाही, त्यात प्रेम, त्याग, समर्पण आहे. कधी एक दुसऱ्यांचा कंटाळा आला तर सामाजिक बंधन आहे. एखादे मूल असेल तर जीवनाला आशय आहे. तू विचार कर आणि ठरव.'' पुढचे काही दिवस खूप मंथन झाले आणि वरदा खूप आनंदी दिसू लागली. बहुतेक ती एका निर्णयाप्रत पोचली होती. ''मॅडम, या रविवारी जाऊ या का थोडे शॉपिंगला. छान छान साड्या घ्यायच्या आहेत आणि हो एक सुंदर, ठसठशीत असे मंगळसूत्रही घ्यायचे आहे. आम्ही रजिस्टर पद्धतीने लग्न करतोय.'' ''अगं हो, हो, वरदा... मलाही खूप तयारी करायची आहे माझ्या मानस कन्येच्या लग्नाची!'' मी तिला प्रेमाने जवळ घेतले आणि ती मला बिलगली. डोळ्यात आनंदाश्रू आले आणि मी ते तसेच वाहू दिले. कारण मला वरदामध्ये तरुण रोहिणी दिसत होती.

**रघुकुलतिलक श्रीरामाचे सकल मराठी संतांनी गुणसंकीर्तन केले असले तरी श्रीरामकथेवर मराठीत स्वतंत्र ग्रंथ लिहिणारे पहिले संत एकनाथ आहेत. त्यानंतर समर्थ रामदासस्वामी आणि तिसरे संतकवी श्रीधर (नाझरेकर) आहेत. संतकवी श्रीधर यांनी १७०३ साली श्रीक्षेत्र पंढरपूर येथे 'रामविजय' लिहिला. ४० अध्यायी ९१४७ ओव्यांचा 'रामविजय' महाराष्ट्राच्या ग्रामीण भाविकातील सर्वाधिक लोकप्रिय पारायण ग्रंथ आहे. 'रामविजय' एवढी अफाट स्वीकृती लोकप्रियता महाराष्ट्रात अन्य कोणत्याही ग्रंथास लाभलेली नाही. आजही गावांगावांमध्ये 'रामायण' पारायण सप्ताह सोहळ्याचे भव्य दिव्य वार्षिक आयोजन होते व सारा गाव रामभक्तीमय होतो. 'रामविजय' मधील रामाचे आपण सलग दोन लेखात शब्दावलोकन करूया...**

लेखांक ३८

# थोर संतकवी श्रीधर यांचा रामविजय (पूर्वार्ध)

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

पंडित जितेंद्र अभिषेकींच्या आवाजातील हे भक्ती **रामविजय' ग्रंथ सुंदर। भक्तिज्ञान वैराग्य भांडा।। ग्रंथनाम रामविजय। श्रवणे सदा पाविजे जय।**

**चिंतित मनोरथ सिद्ध होय। एक आवर्तन करिताचि।।**

श्री 'रामविजय' हा संतकवी श्रीधरस्वामींचा दुसरा ग्रंथ. हरिविजय नंतर केवळ ८ महिन्यांनी 'रामविजय' वाचकांना मिळाला. 'हरिविजय' शके १६२४ च्या मार्गशीर्ष महिन्यात पूर्ण झाला तर रामविजय शके १६२५ (इ.स.१७०३) मध्ये श्रावण महिन्यात भानुसप्तमीला पूर्ण झाला. **शके सोळाशे पंचवीस। सुभानुनाम संवत्सरा ।। भानुसप्तमी शुद्ध विशेष। श्रावण मास विख्यात पै।।** हा ग्रंथही श्रीधरांनी श्रीक्षेत्र पंढरपूर येथेच लिहिलेला आहे. त्याचाही स्पष्टपणे निर्देश श्रीधरांनी केलेला आहे.

**पंढरीक्षेत्री निश्चेसी। रामविजय संपविला ते दिवशी।।** - रामविजय ४०/२०६

त्यामुळे 'रामविजय' केव्हा व कोठे लिहिला याविषयी अभ्यासकात मतभेद नाहीत. नित्यनेमाची पूजाअर्चा, स्वाध्याय आणि प्रवचन, कीर्तन, पुराणाचे नैमित्तिक कार्यक्रम पार पाडत केवळ आठ महिन्यात श्रीधरांनी ४० अध्यायी, ९१४७ ओव्यांचा 'रामविजय' लिहून पूर्ण करावा ही गोष्ट श्रीधरांच्या प्रज्ञा व प्रतिभेचेच तसेच समर्पित भाव व ध्यास या श्रीधरगुणसंपदेचे दर्शन होते.

**अफाट लोकप्रिय संतकवी:-**

संतकवी 'श्रीधर' म्हणून सुविख्यात अशा या कवीचे पूर्ण नाव श्रीधर ब्रह्मानंद नाझरेकर असे असून इ.स.१६५८ ते १७३० असा त्यांचा कार्यकाळ आहे. श्रीक्षेत्र पंढरपूर येथे त्यांचे वास्तव्य होते. पंढरपुरातील चंद्रभागेच्या तिरावर कुंभारघाट येथे त्यांची समाधी आहे. 'हरिविजय', 'पांडवप्रताप' आणि महिलावर्गात अफाट लोकप्रिय 'शिवलीलामृत' या ग्रंथाचे लेखक असलेले संतकवी श्रीधर यांचा छ.शाहूमहाराज यांनी सातारा दरबारात सत्कार करून एक गाव इनाम दिला होता. 'महाराष्ट्र सारस्वत'कार वि. ल. भावे संतकवी श्रीधरांच्या गौरवपूर्ण योगदानाचा उल्लेख करून म्हणतात की-'श्रीधरांची अफाट लोकप्रियता सर्वांनाच थक्क करणारी आहे.'



भगवान श्रीराम आणि श्रीकृष्ण हे अवतारी महा-पुरुष भारतीयांचे पूजनीय मानबिंदू आहेत. भारतीय सांस्कृतिक राष्ट्रवादाचे व भारतीय एकात्मतेचे हे मुख्य स्तंभ आहेत. श्रीराम व श्रीकृष्ण यांच्या दिव्य कथांनी व या कथांनी दिलेल्या मूल्याच्या उभ्या आडव्या धाग्यांनी राष्ट्रीय महावस्त्र विणलेले आहे.

विठ्ठलोपासक वारकरी संप्रदायाचा मुख्य नाममंत्र 'राम कृष्ण हरि' या पूर्वापार भावसंस्काराचाच एक आविष्कार आहे. हा 'राम कृष्ण हरि' मंत्र वारकरी संप्रदायाचे उपासनेचे मुख्य अधिष्ठान आहे. या मंत्रापैकी श्रीकृष्णाच्या जीवन लीलांवर 'हरिविजय' लिहिल्यानंतर पुढे श्रीरामचंद्रांच्या कथांवर श्रीधरांकडून ग्रंथलेखन हे सहज स्वाभाविकच होते. श्रीकृष्णकथापर ग्रंथास 'हरिविजय' नाव दिल्यानंतर रामकथापर ग्रंथास 'रामविजय' हे नाव सुद्धा स्वाभाविक आहे. या ग्रंथनामाबद्दल श्रीधर म्हणतात- 'नित्य विजयी रघुनंदन।' अशा विजयी श्रीरामाचे गुणचिंतन- वाचन-पठण करण्याने श्रोते-वाचकही आपल्या जीवनात नित्य विजयी होतील असा विश्वास श्रीधरांनी केलेला आहे.

मराठी साहित्यात श्रीरामांविषयी स्वतंत्र-सविस्तर ग्रंथ लिहिण्याचे पहिले संत एकनाथ महाराजांना द्यावे लागेल. संत एकनाथांनी 'भावार्थ रामायण' लिहून श्रीरामाची शौर्यकथा सर्व प्रथम मराठीत आणली. 'भावार्थ रामायण' मध्ये एकूण २९७ अध्याय व सुमारे ४० हजार ओव्या आहेत. इ.स. १५९५ ते ९९ या पाच वर्षात ही रचना संत एकनाथांनी लिहून धर्मांध आक्रमकांच्या पाशवी राजवटीत पिचलेल्या हिंदू समाजात क्षात्र धर्माचे जागरण केले. संत एकनाथमहाराजांनंतर समर्थ रामदास स्वामी यांनी कोदंडधारी श्रीरामाच्या स्वरूपातील दैवत समाजापुढे ठेवून क्षात्रतेजाचे आवाहन केले. या दोन पूर्वसुरींबद्दल आदरभाव ठेवूनच श्रीधरांनी आपल्या शैलीनुसार रामकथांचे नव्याने रंजकपणे कथन केले.

वाल्मिकी ऋषींच्या मूळ रामायणाप्रमाणेच श्रीधरकृत 'रामविजय' ग्रंथातही सात कांडाची रचना आहे. त्याचा तपशिल- प्रथम कांडः बालकांड. यावर श्रीधरांनी ८ अध्याय लिहिले आहेत. द्वितीय- अयोध्या कांडावर ४ अध्याय; तृतीय- अरण्यकांड - ४ अध्याय ; चतुर्थ- किष्किंधा कांड - २ अध्याय. पंचम- सुंदरकांड - ५ अध्याय, तर सहाव्या- युद्ध कांडावर श्रीधरांनी चक्क १० अध्याय लिहिले असून सातव्या- उत्तरकांडावर ७ अध्याय रचले आहेत. अशा प्रकारे 'श्रीधरकृत' 'रामविजय' ग्रंथात एकूण ४० अध्याय आहेत व एकूण ओवी संख्या ९१४७ आहे. म्हणजे ज्ञानेश्वरीपेक्षा सुमारे एक हजार ओव्या अधिक आहेत.

श्रीधरांनी रामविजय लिहिण्यापूर्वी वाल्मिकी 'रामायण', 'हनुमान्नाटक' या शिवाय अन्य १९ रामायणांचा अभ्यास संदर्भ म्हणून केलेला आहे. त्या सर्व रामायणांची नावेही श्रीधरांनी दिलेली आहेत. ती अशी- १) वसिष्ठ रामायण २) शुक रामायण ३) मारुतीचे नाटक-रामायण ४) बिभिषण रामायण ५) ब्रह्म रामायण ६) शिव रामायण ७) अगस्ती रामायण ८) शेष रामायण ९) अध्यात्म रामायण १०) शैव रामायण ११) आगम रामायण १२) कूर्म रामायण १३) स्कंद रामायण १४) पौलस्ती रामायण १५) अरूण रामायण १६) पद्म रामायण १७) भरत रामायण १८) धर्म रामायण १९) आश्चर्य रामायण. श्रीधरांनी लेखनास मुख्य आधार वाल्मिकी रामायणच मानलेले आहे असे त्याने स्पष्टपणे कथन केले आहे.

**मूळापासून इतक्या कथा। कैशा वर्णवतील तत्त्वता।**

**त्यामाजी वाल्मिकी नाटक थोर ग्रंथा। रामविजया लागूनी कथू ।।**

'रामविजय' मधील प्रत्येक अध्यायाशेवटी 'समंत वाल्मिक नाटकाधार' असा स्पष्ट निर्देश श्रीधरांनी केलेला आहे. आपला 'रामविजय' ग्रंथ वाचक-श्रोत्यांना अधिक संतोष देणारा ठरावा म्हणून श्रीधरांनी अनेक रामायणातून काही रामकथांचा स्वीकार केला आहे. रामकथार्णवाचे मंथन करून श्रीधरांनी आकर्षक व रंजकपणे लिहिता येईल अशाच कथा वाचकांना डोळ्यापुढे ठेवन निवडल्या आहेत. त्या कथांतून अपेक्षित असा बोध करण्याचा दृष्टिकोनही श्रीधरांनी ठेवलेला दिसतो.

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग १५)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२



रवींद्रनाथांचे थोरले बंधू ज्योतिरिंद्रनाथ यांच्या पत्नी कादंबरीदेवी यांनी रवींद्रनाथांवर खूप माया केली. आईचे प्रेम त्यांना दिले. पण मुख्य म्हणजे त्यांना तिने लिहिण्याची प्रेरणा दिली. लिहिते केले. जे लिहिले त्याला उत्तेजन दिले आणि त्यांच्या लेखनात काही चुका असल्या तर त्याही हसत खेळत लक्षात आणून दिल्या. दुर्दैवाने त्यांची ही आईसमान प्रेम करणारी वहिनी काही कारणाने लवकर गेली. पण तिचे प्रेम रवींद्रनाथ कधीही विसरू शकले नाहीत. त्यांनी आपला 'शैशव कविता' हा काव्य संग्रह वहिनीला अर्पण केला.

सुरुवातीला रवींद्रनाथांनी त्या काळातील प्रख्यात कवींच्या कवितांच्या शैलीचे अनुकरण केले. त्यामध्ये बिहारीलाल चक्रवर्ती, भानू सिंह ठाकूर आदींच्या कवितेचा समावेश होता. पण लवकरच त्यांनी ही अनुकरण शैली सोडून स्वतःची शैली विकसित केली. त्यात ते लिहू लागले. अनुकरणातून मनुष्य फार प्रगती करू शकत नाही. रवींद्रनाथांना स्वतःची शैली गवसली, आपल्या आतील आवाज त्यांनी ऐकला. त्यांची हीच गोष्ट त्यांना महाकवी बनण्यासाठी उपयोगी पडली. आपल्या स्वतंत्र लेखन शैलीने ते एवढे मोठे झाले की आज त्या काळातील इतर साहित्यिकांची नावे वाचकांना फारशी आठवणार नाहीत पण प. बंगालमधील साहित्यिक म्हटले की रवींद्रनाथांचे नाव ठळकपणे नजरेसमोर येते.

रवींद्रनाथांनी वयाच्या २० व्यावर्षी लिहिलेले 'वाल्मिकी प्रतिभा' हे नाटक आजच्या परिस्थितीतही वास्तवदर्शी आहे हे आपण मागच्या भागात पाहिले. रवींद्रनाथ या काळात एक कवी आणि लेखक म्हणून प्रसिद्धीला आले होते. परंतु आपल्या सुरुवातीच्या काळातच त्यांना त्या काळातील प्रथितयश साहित्यिकांची टीका देखील सहन करावी लागली होती, असे आपल्याला आढळून येते. पण साहित्यिकांची ही टीका टिप्पणी रवींद्रनाथांनी अतिशय धीराने आणि शांतपणे सहन केले यात त्यांचे मोठेपण दिसून येते. त्या टीकाकारांमध्ये त्यांच्यातील लेखकाचे किंवा कवीचे असलेले मोठेपण मान्य करण्याइतका मनाचा मोठेपणा नव्हता. असेही म्हणता येईल. परंतु रवींद्रनाथांनी त्यांना कधीच कमी लेखले नाही आणि त्यांच्या टीकेची पर्वाही केली नाही किंवा त्यांच्यावर प्रतिहल्ला केला नाही. त्यांच्या टीकेला शांतपणे तोंड दिले एवढेच नाही तर त्यांनी अशा या साहित्यिकांना त्या बदल्यात उदार मनाने शुभेच्छाही दिल्या.

तत्कालीन साहित्यिकांनी त्यांच्यावर टीका करण्याचे एक कारण असेही सांगता येईल की रवींद्रनाथांची लेखनशैली ही पारंपारिक नव्हती. ते आपल्याला जे वाटेल ते मुक्तपणे आपल्या भाषेत आणि आपल्या लेखन शैलीचा वापर करून ते लिहीत होते. त्यामुळेच तत्कालीन वाचकांना आणि साहित्यिकांना त्यांची शैली अंगवळणी पडण्यास काही काळ जावा लागला. प्रसिद्ध कवी वर्ड्सवर्थ याला देखील आपल्या सुरुवातीच्या काळात अनेक टीकाकारांची टीका सहन करावी लागली होती. त्या काळातील प्रख्यात कवी ड्रायडन, पोप यांच्याप्रमाणे भडक आणि कृत्रिम लेखन शैलीचा अवलंब त्याने केला नव्हता. आणि वाचकांना त्यांच्याच लेखनशैलीची सवय झाली होती. परंतु पुढे काळाच्या ओघात वर्ड्सस्वर्थच्या लेखनातील सच्चेपणा, साधेपणा वाचकांना भावला. आणि तो एक प्रथितयश कवी म्हणून प्रसिद्धीला आला. पश्चिम बंगालमधील रवींद्रनाथांचे समकालीन असलेलेक एक प्रथितयश कवी द्विजेंद्रलाल हे रवींद्रनाथ यांच्या कविता आणि लेखनावर टीका करत असत आणि त्यांचा उपहास करीत असत. टागोरांचा 'गीतांजली' हा काव्यसंग्रह जेव्हा प्रकाशित झाला त्यावेळी द्विजेंद्रलाल यांच्या रवींद्रनथांवरील टीकेने कळस गाठला होता. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या 'आनंद बिदय' या नाटकात उमटले आहे. द्विजेंद्रलाल रवींद्रनाथांना नोबेल पारितोषिक मिळण्यापूर्वीच वारले. रवींद्रनाथ यांना नोबेल पारितोषिक प्राप्त होईपर्यंत ते जर जगले असते तर त्यांना रवींद्रनाथांच्या साहित्याचे मोल नक्कीच कळले असते. त्या काळातील आणखी एक काव्यविशारद असलेल्या कालीप्रसन्न यांनीसुद्धा रवींद्रनाथांच्या लेखनशैलीवर टीका केली होती. द्विजेंद्रलाल आणि कालीप्रसन्न या दोघांच्याही रवींद्रनाथांवरील टीका त्यांना रवींद्रनाथांचा साहित्यविषयक नवीन दृष्टिकोन न मानवल्यामुळे झाल्या. पण असेही अनेक साहित्यिक होते की ज्यांनी रवींद्रनाथ यांच्या साहित्याचे मोल जाणले होते या संदर्भात त्या काळातील प्रख्यात कवी आणि साहित्यिक बंकिमचंद्र चॅटर्जी यांचे नाव घ्यावेसे वाटते. बंकिमचंद्र यांनी रवींद्रनाथांची विलक्षण बुद्धिमत्ता आणि साहित्यिक गुण अचूक हेरले. त्यांच्या जीवनातील एक प्रसंग या ठिकाणी सांगण्यासारखा आहे. हा प्रसंग बंकिमचंद्र चॅटर्जी यांच्या मनाचा मोठेपणाही दर्शवतो.

रमेशचंद्र दत्त नावाच्या एका थोर साहित्यिकाच्या मुलीचे लग्न होते. या लग्नाचे आमंत्रण रवींद्रनाथ आणि बंकिमचद्र चॅटर्जी या दोघांनाही होते. योगायोग (पान ६ वर)

# 'चोरांचे संमेलन' आणि गुरुजींचे मार्गदर्शन

अमृतकुंभ
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२

कोल्हटकरांच्या चोरांच्या संमेलनाचा अध्यक्ष संभ्या रामोशीचा जन्म अट्टल दरोडेखोराच्या कुळात झाल्यामुळे त्याने आईच्या मांडीवर खेळतानाच आईच्या गळ्यातील दागिने लंपास केले. पाय फुटल्याबरोबर आपल्या घरातील वस्तू लपवून ठेवणे आणि इतरांच्या घरातील वस्तू चोरुन आणने हा नित्यक्रम त्याने अव्याहतपणे सुरु ठेवला. केवढी मोठी ती प्रगती. प्रगतीसाठी अध्यक्ष संभ्याने गा-वापासून परराज्यात आपल्या चोरीचे जाळे पसरविले होते. या व्यक्तीने त्याच्या उभ्या आयुष्यात चोरीशिवाय एकही रात्र वाया घालविली नाही.

साहित्य संमेलनाची रात्र पण वाया जायला नको याची काळजी घेणारा हा महान अध्यक्ष त्या संमेलनास मिळाला होता. त्यांच्या अशा महान कार्यामुळेच त्याला जन्मठेपेची शिक्षा झाल्यावर त्यातून सोडवणूक करण्यासाठी त्याने ५०००० हजाराची फी दिली. पण ती रक्कम पूर्वी त्याने त्याच वकिलाच्या घरातूनच चोरलेली होती, हे कोल्हटकर स्पष्ट करतात. अशा त्या महान दरोडेखोराची ओळख एका साध्या पॉकेटमाराने करुन देणे म्हणजे सूर्याची ओळख काजव्याने करुन दिल्यासारखेच असे सांगून चौर्य क्षेत्रातील आपले लघुत्व अध्यक्षांचा परीचय करुन देणारा छोटा चोर मान्य करतो. केवढा हा मनाचा मोठेपणा? असे सांगून प्रत्येक ठिकाणी गेल्यावर कुठून काय चोरता येईल? याचे कौशल्य प्राप्त करुन, मी हे सर्व काही आपणाकडूनच शिकलो. नसता पूर्वी फक्त एक भुरटा चोर होतो. आपल्या आशीर्वादाने आता आपल्या घरीसुद्धा सहजपणे दरोडा घालू शकतो आणि हे सर्व काही आपल्याच कृपेने मला प्राप्त झाले आहे, असे म्हणून आपल्या गुरूदेवाच्या पायावर नतमस्तक होऊन त्यांचे पाय ओढणारेच उद्याच्या चोर संमेलनाचे अध्यक्ष होण्यास पात्र ठरतात. अध्यक्षांचा परिचय करुन देणारा तो भुरटा चोर भविष्यातील ही अशीच तयारी निश्चितच करीत असावा. हल्लीच्या काळात अशा स्तुती पाठकांची संख्या खूप वाढली आहे. त्यामुळेच लोकशाहीत सत्तांतर होत असते. सत्तांतर हा लोकशाही जीवंत असल्याचा पुरावाच होय. तो भुरटा चोर लोकशाही जीवंत ठेवण्याचे महान कार्य करत होता.

चौर्यकर्माची उज्वल परंपरा जोपासण्यासाठी हत्यारांचे प्रदर्शन भरविण्याचा ठराव अध्यक्षांनी पारित केला होता. खरेच ती फार छोटी गोष्ट होती. आज चौर्यकर्मातून कमावलेल्या सर्व संपत्तीचे कायमस्वरूपी प्रदर्शन भरवून त्याचे उदात्तीकरण करण्यासाठी त्याला 'कमाई' असे गोंडस नाव देऊन सर्व काही स्वाहा:करणारेच समाजातील प्रतिष्ठीत उच्चपदस्थ झाले आहेत. त्यांच्या कमाईचे शुद्धीकरण करुन देण्यासाठी राजकीय क्षेत्रापासून अध्यात्म क्षेत्रातील सर्वधुरीन आज तत्पर झाले आहेत. प्लेगच्या साथीमुळे लोक घरदार सोडून जात आहेत. ही आपल्या व्यवसायाच्यादृष्टीने आनंदाची बाब आहे. असा ठराव चोरांच्या संमेलनात अध्यक्षांनी पारीत केला होता. त्यापासून प्रेरणा घेऊन आज चोर कोणत्या सणाला लोक जास्तीत जास्त प्रमाणात बाहेर जातात त्याची वाटच पाहून असतात. तो त्यांच्यासाठी दिवाळी, दसरा असतो. हे मागासलेल्या चोरांच्या बाबतीत झाले. ते बिचारे सरळमार्गी चोर आहेत. त्यांना कोणतेचं नवतंत्रज्ञान माहित नाही. अशा अज्ञानी चोर बांधवांपासून




कोणतेही मालमत्ताधारक सावध राहतात, ही बाब चोरांसाठी हानीकारक आहे. त्यामुळे आता चोरांनी आपल्या व्यवसायाचे जे आधुनिकीकरण केले ते डोळे दिपवून टाकणारे आहे. ते जगाच्या कोणत्याही कानाकोपर्यात असतील आणि ज्यांची लूट करायची असेल तर त्याचे हितचिंतक असल्याचा भास निर्माण करुन संबधीताच्या अधिकोष खात्यासंबधी थोडीसी माहिती मिळवून हे चोरमहाशय काही सेकंदात आपले भवितव्य उज्वल करु शकतात. याही पुढचे तंत्रज्ञान त्यांनी आत्मसात केले आहे आणि ते तंत्रज्ञान विकसित होत राहीलं. तसतसा त्यांच्या उज्वल भविष्याचा अंदाज बांधणे सुरक्षाव्यवस्थेतील तज्ञानांही कठीण होईल. चोरीदरम्यान काही घरमालक हत्यारांचा उपयोग करतात. त्यावर सरकारने बंदी आणावी. हा संमेलनातील ठराव तर तंतोतंत पाळला जातो. कोणताही घरमालक नियमानुसार शस्त्र ठेवू शकत नाही आणि चोरांना कोणतेही सरकार रोखू शकत नाही, त्यामुळे चोर्यकर्म भरभरुन वाढीस लागत आहे. चोरावर दगडफेक करुन त्यांच्या पवित्र कार्यात गावकरी अडथळा आणतात. त्यामुळे त्यांचा साहित्य संमेलनात धिक्कार करण्यात आला होता. त्याचा फारसा उपयोग न झाल्यामुळे चोरांनी मालमत्ताधारकाकडे पाहुणे बनून जावे किंवा प्रवास करतांना कोणीही फिरती संपत्ती घेऊन जात असेलं तर त्याला प्रसाद अथवा चॉकलेट देवून काही कालावधीसाठी बेशुद्ध करण्याचा मार्ग भविष्यात चोरांना स्विकारावा लागला. त्यामुळे फारसे तंत्रज्ञान माहित नसणार्या चोरांनाही चांगले दिवस आले आहेत. नगरपालीकेने आणि रेल्वे विभागाने बोगद्यात दिवे लावू नये. या ठरावाला संबंधित विभागाची गलथान व्यवस्था आजही शक्य होईल तेवढे सहकार्य करतेच, त्याबद्दल चोर संघटनेचे वर्तमानातील सर्व सदस्य त्यांचे ऋणी आहेत यात शंका नसावी. पंचागात अमावस्या दाखविल्याबद्दल चोर संघटनने पंचांग निर्मात्यांचे आभार व्यक्त केले हो-ते. अलिकडे मात्र वर्षाच्या पंचांगात एका महिन्यातून किमान चार अमावस्या दाखवा, अशी मागणी पंचांग निर्मात्यांच्या प्रत्यक्ष भेटीत करुत. ते त्यांनी मान्य न केल्यास त्यांच्या मानेला शस्र लावा. वेळप्रसंगी त्यापुढील कार्यवाही काय करायची हे सराईत चोरबांधवांना सांगण्याची गरज पडू नये, या शब्दात चोरांच्या अध्यक्षांनी अलिकडच्या कालावधीत समज देवून नवतंत्रज्ञानाची माहिती नसणा आपल्या बांधवांची योग्य व्यवस्था लावली. त्यावेळी त्या सर्वांना गहीवरुन आले. चोरी करतांना स्वदेशी हत्यारे वापरुन स्वदेशी वस्तूविषयीचे प्रेम सिद्ध करा आणि आपली देशभक्ती सिद्ध करायला विसरु नका. नशापाणी करून चोरी करणे निषिद्ध समजले गेल्यावर, काही बेवडे चोर आपली बुद्धी पिल्यावरच तर्र पळते. असे सांगू लागले. पवित्र कार्य करतांना गंगाजल प्राशन करणे हा आपला संस्कृतीधर्म (चोरांचा) आहे, असे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले.

त्यावेळी अलिकडच्या कालावधीतील अध्यक्ष काही कालावधीसाठी निशब्द झाले. त्यानंतर काही क्षणात त्या सर्वांना स्वानुभव सांगून तुमचे म्हणणे बरोबर आहे. याची त्यांनी कबुली दिली. प्रत्येकाच्या सवयी ह्या वेगवेगळ्या असतात. त्यामुळे आपल्या नियमात लवचिकता असावी. हे सर्वमान्य झाले. देशहित लक्षात घेवून पोलीस संख्या कमी करावी, हा ठराव तेव्हा पास करण्यात आला. स्वातंत्र्यानंतर पोलिस संख्या वाढविण्यात आली पण ती शक्ती बहुतांशी सत्ताधीशांनी निष्क्रिय ठेवण्यात धन्यता मानली. गृहखात्याचा हप्ता सुरक्षा विभागाला ठरवून देणारे गृहमंत्री अलिकडच्या कालावधीत आपण पाहिले. तेव्हा सुरक्षा विभागाला सक्रीय करुन हा धनलाभ करुन घेणे शक्य नव्हते. त्यामुळे चोरांच्या संमेलनातील ठरावं अलिकडे किती प्रभावी ठरतोय हे आपल्या लक्षात आलेच असेलं. संघटनेचे सभासद होण्यासाठी किमान दहा चोर्या केलेल्या असाव्यात. कार्यकारी मंडळाचे सभासद होण्यासाठी सरकारी तिजोरीवर दरोडा टाकलेला असावा. हा तेव्हा घेतलेला ठराव खूपच महत्वाचा होता, कारण त्या योग्यतेचे चौर्यकर्म आज सत्ताधीश बनण्यासाठी अत्यावश्यक समजले जाते. संमेलनाचे सूप वाजले तेव्हा आलिंगन देताना चोर्या झाल्या, असे कोल्हटकर लिहतात. आजही आलिंगन, मनोमिलन हे एकमेकांना लूटण्याचा समृद्धी मार्ग आहे. हे आपल्या लक्षात येते. आमच्या वेळेस शालेय अभ्यासक्रमात 'चोरांचे संमेलन' हा पाठ होता, पण शिकवणार्या गुरुजींना विनोद कळत नव्हता. त्यामुळे पाठ शिकवून झाल्यावर ते वर्गात म्हणाले होते. हे असे पाठ अभ्यासक्रमात का टाकत असतील देव जाणे? गुरुजींना असे म्हटल्यावर काही विद्यार्थी खो खो हसायला लागले. गुरुजींना राग आला आणि ते म्हणाले, हे नको तिथे दात काढणारे डांबरट भविष्यात बहुतेक राजकारणी होतील. गुरुजींचाच शाप तो, त्याची अनुभूती त्या सर्वांना आली. ते सर्व अशी राजकारणात मान्यवर नेते झाले आणि त्यांनी आपल्या आदरणीय गुरुजींचा सत्कार ठेवला. गुरुजी सत्काराला उत्तर देतांना म्हणाले, आता मला कळाले, 'चोरांचे संमेलन' हा पाठ अभ्यासक्रमात का ठेवला होता? तेव्हा सर्व नेते झालेले माजी विद्यार्थी खो.. खो..हसायला लागले आणि म्हणाले, गुरुजी आम्हाला तेव्हाच कळाले होते. त्यामुळे आम्ही नेते झालो. तुम्ही मात्र मास्तरच राहीले. त्यावर गुरुजी म्हणाले, बरे झाले मला उशीरा कळाले. तुमची खुर्ची तुम्हाला लखलाभ माझी खुर्ची मला शेवटपर्यंत प्रिय आहे. मी शेवटपर्यंत वेगवेगळे विद्यार्थी घडवेलं. तुम्हाला नेता होवून काय काय बिघडवायचे ते बिघडवा. तुमच्यासारख्या सत्ताधीशासमोर मी काय बोलणार? पण तुमच्या मधला चांगला माणूस सदैव जागा असावा, अशी एक माफक अपेक्षा तुमच्याकडून करतो. असा आपल्या मनोगताचा शेवट त्यांनी केला. तेव्हा खो..खो..हसणाऱ्या सर्व बालिश नेत्यांच्या डोळ्यातून पाणी आले.

# ग्रहसंकेत

**(रविवार, २२ सप्टेंबर ते शनिवार, २८ सप्टेंबर २०२४)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २२ सप्टेंबर-** पंचमी, षष्ठी श्राध्द, विषुव दिन, मातोश्री सरुताई पुण्यतिथी स्थोत्सव मायणी (ता. खटाव). ✻ **सोमवार, २३ सप्टेंबर-** भारतीय आश्विन मासारंभ, सप्तमी श्राध्द, श्री ज्ञानेश्वरी जयंती, महादेव यात्रा वाळकी (ता. चिकोडी), चंदन षष्ठी ✻ **मंगळवार, २४ सप्टेंबर-** कालाष्टमी, मध्याष्टमी श्राध्द, अष्टमी श्राध्द, चिद्दनस्वामी पुण्यतिथी (कवाड) ✻ **बुधवार, २५ सप्टेंबर-** अविधवा नवमी, गोविंद उपळेकर महाराज पुण्यतिथी फलटण, नवमी श्राध्द ✻ **गुरुवार, २६ सप्टेंबर-** गुरुपुष्यामृत रात्री ११.३४ नंतर, दशमी श्राध्द, हस्त रवि (वाहन मोर). कालगांवकरबुवा पुण्यतिथी पुणे ✻ **शुक्रवार, २७ सप्टेंबर-** गजगौरी व्रत, (हादगा- भोंदला), एकादशी श्राध्द, पर्यटन दिन, नारायण दशमी, पुंडलिकबाबा पुण्यतिथी मूर्तिजापूर, नाना महाराज साखरे पुण्यतिथी, श्री शुभराय महाराज पुण्यतिथी सोलापूर ✻ **शनिवार, २८ सप्टेंबर-** इंदिरा एकादशी, आप्पा महाराज पुण्यतिथी देवराष्टे

**मुहूर्तः-** ✻ या सप्ताहात पक्ष पंधरवाड्यामुळे साखरपुडा, डोहाळ जेवण आदि मुहूर्त नाहीत.

### मेष :- मनासाररख्या घटना

शरीरालाही हॉस्पिटल आहे पण मनासाठी मित्र- मैत्रिणींशिवाय पर्याय नाही. राशी स्वामी मंगळ पराक्रमस्थानी असल्याने कार्यक्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. नव्या संधींचा लाभ उठवावा. आर्थिक स्थितीत सुधारणा होणार आहे. सरकारी कामे मनासारखी होतील. कौटुंबिक सौख्य लाभेल. शुभ ता. २३, २६

### वृषभः- नव्या विचारांना चालना

लोकांची तोंडे बंद करण्यासाठी एकच गोष्ट महत्त्वाची असते ती म्हणजे कम बॅक. राशीत गुरू महाराज आहेत. त्यामुळे आपले मार्गक्रमण चांगलेच होत जाईल. नव्या विचारांना चालना मिळेल. अनावश्यक खर्च टाळायला हवेत. गृहनिर्माण, गृहसजावट, औषधे अशा व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित संधी लाभतील. शुभ ता. २५, २६

### मिथुनः- जागरूक रहावे

सुखासाठी कोणी काशी केली, कोणी पंढरपूर केले पण जगात तोच सुखी झाला. ज्याने आई- वडिल घरात ठेवले. राशीत मंगळ असल्याने उत्साह, धडाडीने विविध कामे मार्गी लावू शकाल. कार्यक्षेत्रात विशेष जागरूक रहावे. आर्थिक गुंतवणूक योग्य प्रकारे करावी. संतती संबंधात शुभ घटना घडतील. धार्मिक, सामजिक कार्यात पुढाकार घ्याल. यांत्रिक क्षेत्रात प्रगती होत जाईल. शुभ ता. २६, २८

### कर्कः- परिश्रम घ्यावे लागतील

प्रवाहासोबत वाहत जाणे चुकीचे नसते. पण प्रवाह कशाचा आहे, हे पाहणे महत्त्वाचे असते. अष्टमात शनि, व्ययात मंगळ त्यामुळे प्रतिकुलतेतून मार्गक्रमण करावे लागेल. आर्थिक नियोजन योग्य प्रकारे करावे. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहील. नवे विचार विचारपूर्वक स्विकारावेत. दगदग टाळावी. शुभ ता. २५, २६

### सिंहः- कला गुणांचा विकास

काही दिवस एकांतात घालवा, सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतील. लाभस्थानात मंगळ आहे. त्यामुळे वैद्यकिय, कृषि क्षेत्रात प्रगती साधता येईल. सरकारी कामे मनासारखी होतील. उपजत कलागुणांचा विकास होईल. नव्या संधीचे स्वागत करावे. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. नव्या कामांना गती येईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अनुकूलतेचा लाभ उठवावा. शुभ ता. २३, २८

### कन्याः- वादाचे प्रसंग टाळावेत

चिंता करू नका. तो पण रडेल, जो आपणास रडविणार आहे. राशीतच रवि-बुध असल्याने अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती साधता येईल. कार्यक्षेत्रात उत्साह वाढेल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. अपेक्षित संधी लाभतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या संधी साकार करता येतील. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. २५

### तुलाः- सुख स्वास्थ

आयुष्यभर साथ देणारी माणसे जोडा, तासभर साथ देणारी माणेस तर बसमध्ये पण भेटतात. राशी स्वामी शुक्र राशीतच आहे. त्यामुळे सुखस्वास्थ वाढविणार्या घडतील. राजकारण, कारखानदारी अशा क्षेत्रात चांगल्या संधी लाभणार आहेत. सरकारी कामांसाठी अधिक पाठपुरावा करावा लागेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. २३, २६

### वृश्चिकः- चिंता राहिल

फार गंभीर होऊन जगू नका, हे विश्व हजारो वर्षांपासून आहे. कित्येक आले, गेले. कुणावाचून कोणाचे काही अडत नाही. चौथा शनि, आठवा मंगळ त्यामुळे विनाकारण चिंता राहील. चिंता राहिल. नोकरी, व्यवसायात जागरूक रहावे. हितशत्रूंपासून त्रास संभवतो. पोटाच्या तक्रारींची दखल घ्यावी. शिक्षणात समस्या संभवतात. फार दगदग करू नका. शुभ ता. २५, २८

### धनुः- मनासारखी प्रगती

निःस्वार्थ प्रेमाचे नाते जगात सर्व नात्यांपेक्षा पवित्र व श्रेष्ठ आहे. कर्मस्थानी रवि-बुध असल्याने कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. नवे विचार साकार करता येतील. अपेक्षित संधी लाभणार आहेत. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. विनाकारण वितंडवाद वाढण्याची शक्यता आहे. स्थावर प्रश्न तूर्त मागेच ठेवावेत. अडचणी राहतील. शुभ ता. २६, २८

### मकरः- मनासारख्या संधी

सर्व वेळेचा खेळ आहे. कितीही प्लॅनिंग करा, शेवटी वेळ इच्छीते तेच होत असते. षष्ठातील मंगळ प्रगतीच्या घटना घडविणार आहे. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात कामांना गती मिळेल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. नवीन गुंतवणूक होईल. शुभ ता. २८

### कुंभः- अडचणींची चिंता नको

योजना जेवढी गुप्त राहिल, यश तेवढेच उच्च राहिल. राशी स्वामी शनि राशीतच आहे. त्यामुळे मार्गक्रमण विशेष लाभदायक ठरेल. हाती घेतलेली कामे मनासारखी होतील. अडचणींची चिंता नको. मार्ग निघत जाईल. स्थावर समस्या सामंजस्याने सोडवाव्यात. वैद्यकीय, कृषि, मेकॅनिकल क्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. शुभ ता. २५, २६

### मीनः- मनावर दडपण

अजिबात कोणाला विश्लेषण करीत बसायचे नाही. आपण बरोबर आहे हे आपणाला माहित आहे. मग विषय संपला. राशीतील राहू- नेपच्यूनमुळे मनावर थोडे दडपण संभवते. चौथा मंगळ विनाकारण धावपळ करायला लावेल. आर्थिक व्यवहार पूर्ण विचाराने करावेत. नव्या समस्या वाढणार नाहीत. याची काळजी घ्यावी. डोळ्यांच्या तक्रारी संभवतात. शुभ ता. २६

!! शुभ भवतु !!

---

**आजघडीला सामान्यजनांनी कोर्टाची पायरी चढली, तरी न्याय मिळण्याची खात्री नसते. दुसरे म्हणजे न्यायालयात गेल्यानंतर निकाल कधी लागेल, याची शाश्वती नसते. अलिकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या संदर्भात बोलताना भारताचे कायदे पुरेसे कडक आहेत; परंतु निकाल वेळेवर लागत नाही, असे म्हणत न्यायव्यवस्थेतील विलंबाकडे निर्देश केला. मात्र न्यायाच्या विलंबाचे खापर केवळ न्यायव्यवस्थेवर फोडून चालणार नाही.**



# न्यायिक सुधारणांची अवघड वाट

नोंद
शिवाजी कराळे

शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये, अशी आपल्याकडे एक सल्लावजा सूचना दिली जाते. त्यात दोन अर्थ अभिप्रेत असतात. एक म्हणजे कोर्टाची पायरी चढली, तरी न्याय मिळण्याची खात्री असेलच असे नाही. दुसरा अर्थ म्हणजे न्यायालयात गेल्यानंतर निकाल कधी लागेल, याची शाश्वती नसते. न्यायाला विलंब म्हणजे न्याय नाकारणे असेही एक वाक्य प्रचलित आहे. सर्वोच्च न्यायालयाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित समारंभावर कोलकाता, बदलापूरच्या घटनांचे सावट होते. या कार्यक्रमाप्रसंगी, कायदे पुरेसे कडक आहेत; परंतु निकाल वेळेवर लागत नाही, असा एक मुद्दा पुढे आला. त्याचा अंगुलीनिर्देश न्यायव्यवस्थेतील विलंबाकडे होता. मात्र न्यायाच्या विलंबाचे खापर केवळ न्यायव्यवस्थेवर फोडून चालणार नाही.

पिढ्या निघून जातात; पण निकालाची तारीख कधीच येत नाही. आरोपी मोकळे फिरतात आणि पीडित भीतीच्या वातावरणात जगतात. सरकार, वकील आणि न्यायाधीशांनी याचा विचार केला असेल; पण या दिशेने कोणतेही गंभीर प्रयत्न झाले नाहीत. ते केले असले, तरी सामान्य माणसांना दिसत नव्हते किंवा न्याय प्रक्रियेतही दिसून आले नाहीत. न्यायालयीन प्रक्रिया इतकी सोपी आणि सुलभ व्हायला हवी की सामान्य माणसाला कोर्टामध्ये जाण्याची भीती वाटू नये. 'कानून के हाथ लंबे होते है'ची प्रचिती आली पाहिजे. केवळ न्यायव्यवस्थेला दोष देऊन चालणार नाही. प्रलंबित खटल्यांची संख्या, न्यायाधीशांची संख्या, न्यायालयाची दालने आदी मूलभूत सुविधा पुरवण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळाची आहे. अशा या दोन्ही बाजू तपासणे आता कळीचे बनत आहे. मागे सर्वोच्च न्यायालयाने निदर्शनास आणल्याप्रमाणे हरकती आणि तारखा मागण्यात सरकारी यंत्रणा आघाडीवर असतात. वेळेवर म्हणणे मांडत नाहीत. तारखेनंतर तारखेची नकारात्मक संस्कृती न्यायव्यवस्था किती काळ पाळत राहणार, याचा विचार करायला हवा. न्यायाचे विकेंद्रीकरण आणि प्रादेशिक भाषांमध्ये न्यायदानाचा तपशील देण्याची संकल्पना त्या त्या राज्यांनी अंगीकारली, तरी बऱ्याच गोष्टी सोप्या होऊन जातील. परिणामांचा विचार करून जिल्हा न्यायालये जामिनासारख्या गोष्टींवर निकाल देत नाहीत. त्यामुळे ही प्रकरणे उच्च आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत जातात. पुराव्यांच्या आधारे जिल्हा न्यायालयांनी जामिनांची प्रकरणे तातडीने निकाली काढली, तरी दाव्यांची संख्या कमी होऊन जाईल. आरोपी तारखा वाढवत राहतात. आजही न्याय सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर आणि दूर आहे. जलद न्याय मिळाल्यास गुन्ह्यांना बऱ्याच अंशी आळा बसू शकतो. तसे झाल्यास कोलकाता, बदलापूरसारख्या घटनांमध्ये नक्कीच घट होईल.

न्याय किंवा निर्णयाला दिरंगाई झाल्यामुळे गुन्हेगारांमध्ये भीती नाही. गुन्हेगारांमध्ये भीती निर्माण करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे त्वरित न्याय. याशिवाय सध्या तरी दुसरा पर्याय नाही. गंभीर घटना घडल्यानंतर गुन्हेगारांना चौकात उभे करून शिक्षा करणे योग्य आहे असे काहींना वाटू शकते; परंतु ही व्यवस्था समर्थनीय नाही. नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा न्यायालयांच्या राष्ट्रीय परिषदेत राष्ट्रपती, पंतप्रधान, सरन्यायाधीश आणि केंद्रीय कायदा मंत्र्यांनी एकमताने हा प्रश्न सोडवण्यावर भर दिला आहे. त्यामुळे या समस्येकडे पुन्हा एकदा सर्वांचे लक्ष गेले आहे. देशातील ९० टक्के खटले कनिष्ठ न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत. तिथे खटल्यांचा मोठा ढीग आहे. देशातील न्यायालयांसमोर सुमारे साडेचार कोटी खटले प्रलंबित आहेत. त्यापैकी सुमारे एक लाख प्रकरणे गेली ३० वर्षे न्यायालयाच्या फायलींमध्ये पडून आहेत. प्रकरणे निकाली निघायला दशके लागतात. या वेगाने २०४० पर्यंत १५ कोटी खटले न्यायालयांसमोर असतील आणि जनतेच्या सहनशीलतेची परिसीमा गाठली जाईल, ही समाज आणि न्यायव्यवस्थेसाठी अत्यंत खेदाची बाब असेल.

आपल्या देशात न्यायालयांची मोठी कमतरता आहे. इतर आपत्कालीन सेवांप्रमाणेच न्यायालये सुरू करण्यासाठी न्यायाधीश आणि कर्मचाऱ्यांची संख्या किमान तिपटीने वाढवण्याची गरज आहे. न्यायाधीशांची कमतरता ही सर्वात मोठी समस्या आहे. सध्या देशातील न्यायालयांमध्ये न्यायाधीशांची अंदाजे १९ हजार मंजूर पदे आहेत. त्यापैकी १८ हजार पदे कनिष्ठ न्यायालयांसाठी आहेत. गेल्या दशकात दाखल झालेल्या खटल्यांची संख्या बारापटींनी वाढली आहे, तर या काळात न्यायाधीशांची संख्या जेमतेम तिपटीने वाढली आहे आणि त्यातील किमान पंधरा टक्के पदे नेहमीच रिक्त राहतात. भारतात न्यायाधीशांची मंजूर संख्या प्रत्येक दशलक्ष लोकसंख्येमागे २१ इतकी आहे. त्यापैकी जवळपास ३० टक्के पदे रिक्त आहेत तर अमेरिका, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन आणि न्यूझीलंडमध्ये ही संख्या ९० ते ११० पर्यंत आहे.

कायदा आयोगाने आपल्या १२० व्या अहवालात न्यायाधीशांची संख्या प्रति दशलक्ष लोकसंख्येमागे ५० पर्यंत वाढवण्याची सूचना केली होती. याशिवाय सर्वोच्च न्यायालयाने आपल्या ऑल इंडिया जजेस असोसिएशन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (२००२) या खटल्यात सरकारला न्यायालयांची संख्या प्रति दशलक्ष लोकसंख्येमागे किमान ५० पर्यंत वाढवण्याचे निर्देश दिले होते; परंतु गेल्या १२ वर्षांमध्ये त्यात कशी तरी २० पर्यंत वाढ झाली आहे. कायद्यांची वाढती संख्या, किरकोळ वाद मिटवण्याबाबत कार्यकारिणीची उदासीनता, न्यायालयीन प्रक्रियेचा गैरवापर करण्याची प्रवृत्ती, भ्रष्टाचार आणि इतर कारणांमुळे भारतात खटल्यांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. लोकसंख्या आणि न्यायालयांचे प्रमाण अत्यंत असंतुलित आहे. सेटलमेंट करारांसारख्या अनौपचारिक पद्धतींद्वारे प्रकरणांची संख्या लक्षणीयरीत्या कमी केली जाऊ शकते. यासाठी मध्यस्थी आणि सामंजस्य कायद्याची पुनर्रचना करण्यात आली आहे. दिवाणी आणि फौजदारी प्रक्रिया कायद्यात सुधारणा करून हे काम सोपे करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. लोकअदालतींनीही सर्वतोपरी प्रयत्न केले; परंतु खटल्यांच्या संख्येत फारसा फरक पडला नाही. अशा परिस्थितीत काही अपारंपारिक पद्धतींचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्याची गरज आहे. संसदेने २००८ मध्ये ग्राम न्यायालय कायदा मंजूर केला. भारतात ग्राम न्यायालयांची प्रदीर्घ परंपरा आहे; पण राजस्थान आणि मध्य प्रदेश यासारखी काही राज्ये सोडली तर ती कुठेही सुरू झालेली नाहीत. आता सर्व प्रकारचे पूर्वग्रह बाजूला ठेवून ही व्यवस्था लागू करण्याची वेळ आली आहे. सुरुवात केली की मार्गात येणारे अडथळे आपोआप नाहीसे होतात. जुलै २००६ मध्ये तत्कालीन सरन्यायाधीश सभरवाल यांनी न्यायालयांचे कामकाज दोन पाळ्यांमध्ये चालवण्याची सूचना केली होती. निवृत्त न्यायाधीश आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने हे साध्य करता येईल, असा त्यांचा विश्वास होता. गुजरातने या दिशेने पुढाकार घेतला आणि त्याचे चांगले परिणाम दिसून आले. अशा न्यायालयांना किरकोळ फौजदारी आणि दिवाणी खटल्यांचा निकाल देण्याचे अधिकार देऊन खटल्यांचे ओझे लक्षणीयरीत्या कमी केले जाऊ शकते. पायाभूत सुविधांसाठी मोठ्या भांडवलाची गरज भासणार नाही. भारत सरकारने तेविसाव्या कायदा आयोगाची स्थापना केली आहे. त्याला देशातील विविध कायद्यांचे परीक्षण करणे अनिवार्य आहे. हा नवीन आयोग भारतीय कायदेशीर चौकटीच्या सुधारणा आणि आधुनिकीकरणात, विशेषतः सामाजिक-आर्थिक न्याय, लैंगिक समानता आणि केंद्रीय कायद्याचे सरलीकरण या संदर्भात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. नव्याने स्थापन झालेल्या विधी आयोगाला विद्यमान कायद्यांचे पुनरावलोकन करणे आणि त्यात सुधारणा करण्याची शिफारस करणे यासह विविध उद्दिष्ट्ये आहेत. सध्याचे कालबाह्य झालेले कायदे रद्द करण्याची शिफारस आयोग करेल. तेविसाव्या विधी आयोगाने सरकारी संस्था, नागरी समाज संस्था आणि कायदेशीर व्यावसायिकांसह विविध क्षेत्रातील भागधारकांशी संवाद साधून लवकरच आपले काम सुरू करणे अपेक्षित आहे. भारतातील भविष्यातील कायदेशीर सुधारणांना आकार देण्यासाठी त्याच्या शिफारशी महत्त्वाच्या ठरतील.

---

▶ पान २ वरून

# हिंदी चित्रपटसृष्टीचे शॉ-शेक्सपिअर..!

१९७३ साली 'डेथ राईडस अ हॉर्स' (१९६७) या हॉलीवूडपटावर बेतलेल्या पण कथा-विकास कथा-प्रयोजन व कथा-लक्ष्य या सर्व बाबतीत सर्वस्वी वेगळ्या असलेल्या, भारतीय जीवनपद्धती व समाजजीवनात एकरूप झालेल्या दोन कचकचीत पटकथा सलीम-जावेद यांनी अनुक्रमे 'जंजीर' व 'यादों की बारात' चित्रपटाद्वारे रसिकांना प्रस्तुत केल्या. संतापाने धुमसणारा, सूडाने पेटलेला, एकलकोंडा, माणूसघाणा पोलिस निरीक्षक अमिताभ बच्चन यांना महानायक बनवता झाला. तर 'यादों की बारात' चित्रपट संगीतमय, कौटुंबिक सूडकथेची नवीन प्रतिमाने निर्माण करणारी पटकथा होती. याचवर्षी 'मजबूर' देखील आला होता. सलीम-जावेद यांना दंतकथा बनवणारे वर्ष होते ते १९७५. भारतीय चित्रपट इतिहासातील सर्वोत्कृष्ट पटकथा असे सार्थ बिरूद मिरवणारी 'दीवार' ही पटकथा व इतिहास निर्माण करणारी 'शोले' ही अजरामर पटकथा! भारतीय समाजजीवनास नेमकेपणाने मांडणाऱ्या, भारतीय मानसिकतेचा अचूक अदमास घेणाऱ्या, प्रथा, परंपरा व मान्यता यांचा प्रत्ययकारी परिपोष करणारे तडाखेबाज, गोळीबंद संवाद या पटकथांची खुमारी कैकपटीने वाढवणारे ठरले. बिल्ला नंबर ७८६, लंबी रेस का घोडा, तुम्हारा नाम क्या है बसंती हे संवाद समाज जीवनात आधुनिक वाक्प्रचार म्हणून प्रस्थापित झाले. १९७५ साली आलेला 'आखरी दांव', १९७७ साली आलेला 'इमान धरम' हे ठसठशीत अपवाद वगळता सलीमजावेद म्हणजे यशाची १०० टक्के हमी, हा विश्वास चित्रपटसृष्टीत ठामपणे रुजला होता. १९७८ साली आलेल्या 'त्रिशूल' व 'डॉन' या चित्रपटांनी हा समज अधिकच दृढ केला. १९७९ साली आलेला 'काला पत्थर', १९८० साली आलेला दोस्ताना, शान, १९८१ साली आलेला 'क्रांती' हे चित्रपट यशस्वी होते. परंतु त्यात सलीम-जावेद यांनी सृजनात्मकता फारशी नव्हतीच. १९८२ साली आलेला 'शक्ती' दिलीपकुमार व अमिताभ बच्चन यांच्या विस्मयचकित करणाऱ्या अभिनय दर्शनासाठी चिरंतन ठरला. काही संवादही चमकदार होते. पण वारंवार पुन:प्रत्ययाचे आभास होत होते. सलीम-जावेद यांच्यामधील व्यक्तिगत मतभेद याच सुमारास चव्हाट्यावर येऊ लागले. अहंभाव हे याचे प्रमुख कारण होते. जोडीच्या यशाचा खरा मानकरी कोण, हा वादाचा मुद्दा होता. तसेच संपूर्ण परंपरावादी सलीम खान व गंगा-जमनी तहजीबीस मानणारे जावेद अख्तर यांच्यामध्ये एक अदृश्य भिंत उभी राहिली. एकत्र असताना लिहिलेल्या पण चित्रपट बनण्यात विलंब झालेल्या 'जमाना' (१९८५) व 'मिस्टर इंडिया' (१९८७) या सलीम-जावेद यांच्या एकत्रित कार्याच्या अखेरच्या पाऊलखुणा..!

विभक्त झाल्यानंतर जावेद अख्तर यांनी चित्रपटसृष्टीत गीतकार म्हणून नावलौकिक प्राप्त केला. 'सिलसिला' (१९८१), 'साथ-साथ' या चित्रपटांच्या स्तरीय गीत लेखनाने ते अल्पावधीतच गीतकार म्हणून प्रस्थापित व प्रतिष्ठित झाले. त्यांना सर्वोत्कृष्ट गीतकार म्हणून 'साज', 'बॉर्डर', 'गॉडमदर', 'रेफ्युजी' व 'लगान' या चित्रपटांसाठी राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला. २०१३ साली 'लावा' काव्यसंग्रहासाठी त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. त्यांची परंपरा फरहान व झोया अख्तर समर्थपणे चालवत आहेत. सलीम खान यांनी विभक्त झाल्यानंतर नाम, अंगारे, कब्जा, तुफान, जुर्म, अकेला, मस्त कलंदर, पत्थर के फूल अशा सुमारे १० पटकथा लिहिल्या पण त्या फारशा लक्षणीय नव्हत्या. त्यांचे अभिनेते बनण्याचे अपुरे स्वप्न त्यांचे पुत्र सलमान खान, अरबाज खान व सोहेल खान यांनी पूर्णत्वास नेले. एकल कारकीर्दीत उत्कृष्ट असलेले व जोडीने सर्वोत्कृष्ट असलेले सलीम-जावेद..! (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

---

▶ पान ४ वरून

# ययातिः अहंकारव्याप वासना आणि...

त्याचवेळी मंदारसारख्या काही स्वार्थी लोकांनी आपले वेगळे गुरुकुल सुरू करून येणाऱ्या परिस्थितीचा फायदा घेत स्वतःचा लाभ करून घेण्याचा प्रयत्न केलेला ही दिसून येतो. कादंबरीच्या उत्तरार्धात पूरु हा शर्मिष्ठेचा मुलगा राज्य जिंकून त्याग भावनेला हे सर्व यदुला देण्यासाठी सोडून देतो, वडिलांचे वार्धक्य आनंदाने घेतो हे सर्व त्याला कोणी शिकवले? आणि या सर्व त्याग भावना आपल्याला लहानपणी कोणी शिकवले असते तर बरे झाले असते असे पश्चातापाने देवयानी म्हणते. त्यावेळी संस्कार हा उपजत असून असून त्याला योग्य गुरुजी साथ लाभली की ती विद्या मानव कल्याणासाठी उपयोगी ठरते. मात्र तुमच्या विद्या सोबत आणि ज्ञानासोबत त्याला अहंकाराचा वारा लागला की तुमची विद्या जगासोबत स्वतःच्या ऱ्हासालाही कारणीभूत ठरते. हा महत्त्वाचा विचार ययाति कादंबरीच्या मार्फत वि.स. खांडेकरांनी दिला आहे.

▶ पान ५ वरून

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

असा की हे दोघेही एकाच वेळी लग्न समारंभाच्या ठिकाणी पोहोचले बंकिमचंद्र थोडेसे पुढे होते. रमेशचंद्र दत्त यांनी बंकिमचंद्र यांचे स्वागत त्यांच्या गळ्यात पुष्पहार घालून केले.

या गोष्टीकडे त्यांच्या पाठीमागे उभ्या असलेल्या रवींद्रनाथांचेही लक्ष होतेच. तेवढ्यात बंकिमचंद्र चॅटर्जींनी आपल्या स्वतःच्या गळ्यातील हार काढला आणि तो रवींद्रनाथांच्या गळ्यात घातला आणि म्हणाले, खरंतर हा हार याच्याच गळ्यात घालायला हवा. रमेश, तू याचे 'संध्या संगीत' वाचले आहेस का? बंकिमचंद्र यांच्या या बोलण्यामुळे आणि कृतीमुळे रवींद्रनाथांचे आणि त्यांच्या साहित्याचे मोल उपस्थिततांना कळले. खरंतर रवींद्रनाथ यांच्या कविता या आशावादी आहेत. मानव जातीच्या कल्याणाचा उद्देश त्यातून व्यक्त होतो. परंतु त्यांच्या 'संध्यासंगीत' या काव्यसंग्रहातील कविता मात्र याला अपवाद आहेत कारण त्यातील बऱ्याच बऱ्याचश्या कविता दुःख, विषाद आणि निराशा व्यक्त करणाऱ्या आहेत. स्वतः रवींद्रनाथांना या गोष्टीची पुरेपूर जाणीव होती आणि आपल्यातील या एक प्रकारच्या या एक प्रकारच्या उणीवेची दुरुस्ती करण्याचे सामर्थ्यही त्यांच्यामध्ये होते.

कोलकत्यातील ज्योतिरिंद्रनाथांनी घेतलेल्या भाड्याच्या घरात रवींद्रनाथ देखील राहत होते. सदर स्ट्रीटवरच्या या घरातून बाहेरचे दृश्य मोठे छान दिसत होते. अशाच एका सकाळी जेव्हा ते घरातील बाल्कनीचा दरवाजा उघडून बाहेर आले तेव्हा त्यांना एक आश्चर्यकारक असा अनुभव आला. त्यावेळी सभोवताली सर्वत्र दाट धुके पसरले होते. परंतु त्या धुक्याचे पारदर्शक पटल दूर करून सूर्याची सोनेरी किरणे सभोवार पसरली. वृक्षाच्या पाठीमागून होणारी सूर्योदयाची तेजस्वी आणि सुंदर प्रभा त्यांनी पाहिली. त्या दिव्य प्रकाशाने त्यांच्या मनाचा गाभारा उजळून निघाला. सोनेरी सूर्यकिरणांबरोबरच त्यांच्या मनातील निराशेचे पटलही जणू दूर झाले. एका वेगळ्याच चैतन्याने आणि आनंदाने त्यांचे मन भरून गेले. एखाद्या बंदीवासातून मुक्त झालेल्या माणसासारखा आनंद त्यांच्या मनाला झाला आणि हा आनंद त्यांच्या 'निर्झरेर स्वप्नभंग' या कवितेतून व्यक्त झाला. ही कविता त्यांच्या 'प्रभात संगीत' या दुसऱ्या कवितेच्या पुस्तकात आली आहे.

पुढील कवितांमध्येही मग हा आनंद प्रतिबिंबित झालेला आपल्याला दिसतो. त्यांच्या या दिव्य अनुभूतीबद्दल ते स्वतःच या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हणतात, सरतेशेवटी कसे कुणास ठाऊक पण बंद दरवाजा उघडला जाऊन माझे हरवलेले मला गवसले. ते मला फक्त परत मिळाले एवढेच नाही तर, यार बंधमुक्तीमुळे माझी प्रतिमाही अधिक समृद्ध झाली. ह्यायोगेच प्रभात संगीताच्या रूपाने माझं बालपणीचं हरवलेलं जग अधिकांश रूपानं मला परत मिळालं. या ठिकाणी मला ज्ञानेश्वर माउलींनी ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायात लिहिलेल्या ओव्या आठवतात. ते म्हणतात,

**जैसे डोळ्या अंजन भेटे। ते वेळी दृष्टीसी फांटा फुटे। मग वास पाहिजे तेथ प्रगटे। महानिधी।। का चिंतामणी जालया हाती। सदा विजयवृत्ती मनोरथी। तैसा मी पूर्णकाम निवृत्ती। ज्ञानदेवो म्हणे।।**

# कर्तृत्वासमोरील आव्हानांसाठी सिद्धता

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

शिक्षणाने माणसाला रोजगाराची हमी द्यायला हवी. आयुष्याची अनेक महत्वपूर्ण वर्षे आपण शिक्षणासाठी शाळा-महाविद्यालयात घालवीत असतो. शिक्षण संपल्यावर साहजिकच पोटापाण्याच्या व्यवस्थेचा शोध सुरु होतो. या रोजच्या भाकरीच्या मागे हिंडताना कर्तृत्व, कारकीर्द असे शब्द विसरायला होतात. भारतातील सुशिक्षित बेकारांची आकडेवारी नुक्तीच वाचनात आली. आणि ती चिंताजनक आहे. अशा अवस्थेत उद्याची भ्रांत अधिक महत्वाची ठरते आणि नंतर भविष्यातील कर्तृत्व.

**बेरोजगारीची आकडेवारी-**

आयएलओ ने १५ ते २९ वयोगटातील भारतीय तरुणांची वेगवेगळ्या शैक्षणिक अर्हतेनुसार २०२४ साली प्रसिद्ध केलेली गटवारी असे सुचविते-

प्राथमिक शिक्षणही नसलेले- ३. २ %

प्राथमिक ते माध्यमिक शिक्षण -६.१ %

**माध्यमिक शिक्षण** -११. ५ %

**पदवी आणि पदव्युत्तर** - २८. ७ %

या पार्श्वभूमीवर स्वप्ने बघणारी आणि स्वप्ने भंगणारी तरुण पिढी यांचे पृथःकरण करायला हवे. कर्तृत्वाच्या आधीची पायरी ही अवस्था असते, जी मोडून टाकणारी असते. पण त्यांवर मात करत नव्याने बांधकाम करीत जीवनाच्या इमारतीला उद्दिष्टांच्या विटा, सिमेंट, वाळू यांनी देखणे करायचे असते.

**जीवनहेतूंबद्दल स्वतःला विचारण्याचा आणि शोध घेण्याचा एक अप्रतिम प्रश्न आहे-**

आपण नजरेसमोर ठेवलेले उद्दिष्ट्य दुसऱ्या कोणीतरी आधीच साध्य केले आहे कां? आणि केले असेल तर ते कसे केले असेल?

**हेतू साध्य करण्याची पहिली पायरी असते-**

हेतूवर विश्वास ठेवणे की तो साध्य करणे शक्य असते. या प्रश्नाची नोंद अशासाठी आवश्यक असते की आपली महत्वाकांक्षा सहजशक्य आहे वा नाही याचा अदमास घेणे आणि त्यावर आत्मविश्वासाच्या पायाची रचना करणे ज्याद्वारे व्यक्तिगत आव्हानांवर मात करून अपेक्षित फळ प्राप्त करता येईल.

**कर्तृत्वाचे नियोजन**

**नियोजनाचे आराखडे अनेक प्रकारे आखता येतात मात्र अट इतकीच-**

हा आरखडा स्वप्नांवर आधारित असावा आणि तो त्या व्यक्तीच्या भावी प्रवासाशी जोडलेला असावा म्हणजे त्या प्रवासाची मालकी सदर व्यक्ती घेऊ शकेल. कारण काही स्वप्नं वयावर नाही तर जिद्दीवर अवलंबून असतात.

सकारात्मकतेचे तत्वज्ञान २३४



**(१) आराखडा क्र एक-** विकासक्षेत्रे पुन्हा एकदा स्टार यांनी २०२१ साली विकसित केलेला हा आराखडा वापरून आपण स्वतःच्या विकासाची क्षेत्रे शोधू शकतो. ती जर साध्य करायची असतील तर त्यासाठी आवश्यक असणारी वर्तन आणि कृती यांची सांगड घालायला हवी.

**अ)** जी क्षमता, कौशल्य सुधारायचे आहे त्याची यादी करा.

**ब)** जीवनहेतूंची यादी करा आणि त्यांचे सुस्पष्ट वर्णन करा. उदा. - तणाव पातळी कमी करणे, जीवनशैली सुधारणे, आयुष्यातील तोल सांभाळणे

**क)** ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी लागणाऱ्या वर्तनाचे/वागण्याचे वर्णन करा. त्यामध्ये कदाचित परिस्थिती हाताळण्याची कौशल्ये विकसित करणे, दैनंदिनीचे कठोर पालन, भरणपोषणाच्या वेळापत्रकाचे पालन करणे असे आणि इतर वर्णन समाविष्ट करता येईल.

**ड) प्रगतीची नोंद ठेवणे-**

ठरवलेल्या, ठरलेल्या दिशेने वाटचाल होत आहे की नाही, याची नोंद ठेवावी म्हणजे स्वप्नांची पूर्तता होते आहे याचे भान येते. समजा अपेक्षित प्रगती होत नसेल /झाली नसेल तर कां झाली नाही याचा आढावा घेणे

**इ) समयबद्ध सूची-**

हेतू निव्वळ ठरवून, सोडून दिलेत तर त्यांची सिद्धता आपोआप होत नसते. त्यांना वेळेची मर्यादा, कुंपण गरजेचे असते. वेळेची शिस्त सर्वसाधारणतः नावडीची असली तरी कर्तृत्वाच्या इमल्यासाठी आवश्यक असणारे ठोस सिमेंट असते.

**(२) आराखडा क्र दोन-**

विकासाच्या संधी क्षेत्रे आणि संधी या संकल्पनांमध्ये मूलभूत फरक आहे. क्षेत्राचा विस्तार मोठा असतो आणि प्रत्येक क्षेत्रात असंख्य संधी असतात. त्यापैकी अनुरूप असलेली निवडून प्रगती करणे अभिप्रेत असते. जीवनहेतू ठरविताना स्वतःची बलस्थाने आणि कमकुवत कोपरे तपासून बघणे हे केवळ नैमित्तिक नसून अत्यावश्यक असते. फक्त ही चाचपणी निर्भेळ, निर्हेतुक आणि प्रामाणिक असावी.

**अ) उद्दिष्ट्ये-**

**अल्पकालीन** - (कालावधी कमाल तीन वर्षे)

**दीर्घकालीन** - (कालावधी कमाल पाच वर्षे)

**टीप-** सध्याच्या वेगवान जीवनात याहून अधिक काळासाठी नियोजन करणे संयुक्तिक नसते.

**ब)** स्व-मूल्यांकन-

बलस्थाने, कमकुवत जागा

**क)** विकासाच्या संधी-

ज्ञान संवर्धन

**कौशल्ये** - अर्जन/ अधिग्रहण, (उपजत असलेल्यांना) परजणे / तीक्ष्ण धार लावणे

**ड)** कृती योजना -

विशिष्ट कामे, समयबद्ध चौकट

**(३)** आराखडा क्र तीन-

स्वतःची आदर्श प्रतिमामनातील/नजरेसमोरील व्यक्त-अव्यक्त आदर्श आणि तेथपर्यंत पोहोचण्यासाठी टाकावी लागणारी पावले या आराखड्यात उमटायला हवीत.

**अ)** स्वप्न -

स्व-प्रतिमेच्या आदर्श रूपाचे वर्णन

**ब)** सद्य स्थिती-

त्या आदर्श रूपापासूनचे शारीरिक/मानसिक अंतर

**क)** भविष्यातील संभाव्य स्थिती-

कोठे जायचे आहे? - गंतव्य स्थानाची निश्चिती

**ड) उद्दिष्टांची आखणी -**

किमान तीन उद्दिष्ट्ये असावीत.

**इ)** वाटचालीचा / प्रगतीचा मागोवा - कधी आणि कसा माग काढणे ठरविले आहे?

**ई)** संसाधनांची जुळवाजुळव / बेगमी

व्हाईटमोर यांनी २००९ साली एक ग्रो नामक प्रारूप विकसित केले-

जी (गोल)- तुम्हांला कोठे जायचे आहे?

आर (रिऍलिटी) - या उद्दिष्टापासून आता तुम्ही किती दूर आहात?

**ओ (ऑप्शन्स)-** त्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचण्यासाठी कोणते पर्याय उपलब्ध आहेत?

**डब्लू (वे फॉरवर्ड)** - त्या दिशेने पहिले पाऊल काय असेल? ध्येय निश्चिती आपल्या प्रयत्नांना आवश्यक ती दिशा पुरविते आणि ठरविलेले साध्य करण्याची ऊर्जाही बहाल करते. फक्त काही पथ्ये पाळावी लागतात-

**(१)** उद्दिष्ट सुस्पष्ट असावे आणि त्याचे विविध अर्थ निघू नयेत.

**(२)** उद्दिष्ट थोडे अवघड असावे पण अशक्य असू नये अन्यथा आपण प्रयत्नही करीत नाही.

**(३)** अभिप्राय, वेळोवेळी उजळणी (पुनरावलोकन) गरजेचे असते.

**(४)** उद्दिष्टांचे छोटे छोटे घटक / खंड करून त्यांच्या सिद्धतेची तयारी करता येते.

कॉटरेल यांनी २०१५ साली एक कौशल्यांची यादीच प्रसिद्ध केली, जी आत्मसात केली किंवा जी एखाद्या व्यक्तीजवळ उपजत असतील तर स्व-विकासाला चालना मिळते-

**(१) माणसांना हाताळणे-**

आपण इतरांबरोबर काम करीत असताना त्यांचा आधार मिळाला की आत्मविश्वास वाढू लागतो. त्यामुळे हेतू साध्य होण्यास हातभार लागतो. यासाठी फक्त माणसांबरोबर सख्य बांधता आले पाहिजे, श्रवणशक्ती सुधारता आली पाहिजे, संघभावना विकसित करता आली पाहिजे, सकारात्मक दृष्टिकोन बाळगता आला पाहिजे, वाटाघाटींची क्षमता वाढविता आली पाहिजे, नेतृत्वगुण दिसले पाहिजे आणि विधायक टीका करता आली पाहजे.

**(२)** जबाबदाऱ्या हाताळणे, समस्या-निराकरण करता येणे -विकासाच्या वाटेवर अपरिहार्य आव्हाने असतातच. अशावेळी आपले काम, आपला वेळ सांभाळत समस्या सोडविणे हे महत्वाचे असते. यासाठी-

**(अ)** वेळ आणि जबाबदाऱ्या यांचे संतुलन

**(ब)** समस्या हाताळण्याच्या युक्त्या

**(क)** अवघड जबाबदाऱ्यांसाठी रणनीती /व्यूहरचना करणे

**(ड)** नियोजन करताना अग्रक्रम ठरविणे, सहजशक्य उद्दिष्ट्ये आखणे आणि व्यावहारिक उपाय शोधणे

**(इ)** प्रकल्प व्यवस्थापनाचे प्रासंगिक कौशल्ये अर्जित करणे

**(ई)** स्वतःच्या क्षमता वाढविण्यासाठी स्वयं-मूल्यांकन करणे गरजेचे.

**(३)** स्वतःच्या निर्मितिक्षमतांवर भरोसा ठेवणे- आपल्या कर्तृत्वाला ऊर्जाभारीत करण्यासाठी आत्मविश्वास नांवाचे इंधन लागते. नवनव्या कल्पना आणि त्यांची उत्तरे शोधण्यासाठी लागणारी प्रेरणा नवसर्जनातून मिळते. मात्र त्यासाठी मनाचे काम कसे चालते आणि विचारक्षमता वाढविण्याची तंत्रे माहिती असणे गरजेचे असते. आपल्या कामांमध्ये वैविध्य आणणे, सर्जनशीलता फक्त कलावंतांसाठी आवश्यक नसते तर समस्या सोडविण्यासाठी निर्णायक असते.

भरभराट आणि फायद्याचे भविष्य व्यक्तीच्या नीतिमूल्यांवर, चिकाटी, संयम, आणि बलस्थानांवर अवलंबून असते. याला आधार असतो मनःसामर्थ्याचा, क्षमतांचा आणि जीवनात काय साध्य करायचे आहे त्या उद्दिष्टांच्या सुस्पष्टतेचा. इतरांना मदत करणे, उन्नतीचा मार्ग दाखविणे नेहमीच आनंददायी आणि समाधानदायी असते. विशेषतः जेव्हा ठरविलेलं हाती गवसत नाही आणि निराश व्हायला होतं तेव्हा मिळतील तितक्या मार्गांनी कुमक प्राप्त करून घेणे एवढेच आपल्या हाती उरते. मनात रचलेले मनोरे जेव्हा प्रत्यक्षात येत नाहीत आणि सगळीकडे अंधारलंय याची काळोखी मनाला, शरीराला वेढून राहते तेव्हा त्यांतून सकारात्मकतेची किरणे शोधत कसे बाहेर पडायचे हे पुढील लेखात बघू या...

# आजीबाईच्या बटव्यात काय-काय असावे?



आजीचा बटवा
नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१

वनौषधींचे ज्ञान जनतेला देणे आणि त्यांच्यात आयुर्वेद औषधीबद्दल आत्मियता निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. आपली आयुर्विद्या आदान-प्रदान न करता गुप्त राखण्याच्या प्रवृत्तीमुळे मोठ्या प्रमाणात लोप पावत चालली आहे. गेल्या कित्येक वर्षात मानवाने अविचाराने स्वार्थासाठी मोठ्या प्रमाणात जंगलतोड केली, त्यामुळे जंगले मोठ्या प्रमाणात नामशेष झाली व वनौषधी मिळणेही दुरापास्त झाले. त्यामुळे वनौषधीचे जनतेत असलेले ज्ञानही कमी झाले. आयुर्वेदाच्या पुनरुज्जीवनासाठी 'वनौषधींची ओळख' सर्वप्रथम जनतेला करून देणे आवश्यक आहे. आपल्या परिसरात असलेल्या झाडांची व त्यांच्यात असलेल्या औषधी उपयोगाची माहिती जनतेस मिळाली तर 'आजीबाईचा बटवा' निश्चितच पुन्हा घरोघरी सुरू होऊ शकेल. आजच्या या महागाईच्या काळात विविध आजारावर स्वस्त असे घरगुती औषधोपचार केले तर निश्चितच मोलाचे ठरणार आहेत.

**वनौषधी उद्याने व्हावीत:-**

ताज्या वनौषधींचा गुण त्वरित दिसतो. वाळलेल्या वनौषधी ७५ टक्के गुण देतात. सहा महिन्याची जुनी काष्ठौषधी २५ टक्के गुण देतात आणि त्यापेक्षा जुनी वनौषधी असेल तर ती फक्त १० टक्केच गुण देते. त्यामुळे आयुर्वेदिक उपचार करताना निदान आपल्या भागात मिळणार्या वनौषधी तरी ताज्या घ्याव्यात. अशा वनौषधी सहजरित्या मिळाव्या यासाठी त्या सर्वत्र लावल्या जाव्यात व त्यांचे संरक्षण व संवर्धन करावे. सहजरित्या या वनौषधी मिळाल्या, रानावनात जाऊन हुडकत बसण्याची पाळी नाही आली तर निश्चितच जनतेच्या वापरात वनौषधींचा उपयोग होऊ शकेल.

मागे म्हटल्याप्रमाणे निदान प्रत्येक शहरात व गावात एक तरी 'वनौषधी उद्यान' होणे नितांत आवश्यक वाटते, तसेच प्रत्येक लहान-मोठ्या गावाच्या परिसरात ज्या वनौषधी आहेत, त्यांची ओळख त्या भागातील जनतेला जाणकारांनी करून दिली पाहिजे. आता वनौषधींचे जाणकार, बोटावर मोजण्याजोगे वृध्दावस्थेत आहेत. त्यांच्या ज्ञानाचा फायदा जर आपल्याला पाहिजे असेल तर वनौषधी परिचय करून देण्याचा कार्यक्रम सर्वत्र योजिला गेला पाहिजे. 'आजीबाईचा बटवा' सुरू होण्यासाठी त्याची आज नितांत आवश्यकता आहे.

**वनौषधी परिचय आवश्यक:-**

कोल्हापूर येथील मेहता ट्रस्टने आयोजित केलेल्या वनौषधी परिचय शिबिरामध्ये मी सहभागी झालो होतो. स्व. हरिचंद एस. मेहता, स्व. बाबा फाटक, डी. नाईक आदिनी कात्यायनी डोंगर, पन्हाळा किल्ला, तबक उद्यान महापालिकेच्या बागा आदिमध्ये नेऊन आम्हाला वनौषधी दाखविल्या होत्या व त्यांचे औषधी उपयोगही सांगितले होते. तसेच आपल्या भागात न होणाऱ्या वनौषधी रात्री 'स्लाईड शो' द्वारे दाखविल्या होत्या. ४०- ४५ वर्षापूर्वी त्यांनी आत्मियतेने करून दिलेला वनौषधी परिचय आमच्या मनावर कायमचा ठसला गेला. त्यामुळे वनौषधी परिचयाचे कार्य यथाशक्ती करू शकलो. प्रत्येक गावात किमान असे ४-५ कार्यकर्ते निर्माण झाले तर 'आजीबाईचा बटवा' खात्रीने सुरू होऊ शकेल.

**आरोग्याकडे दुर्लक्ष नको:-**

'शरीर आहे तिथे व्याधी आहे' हे पूर्णतः खरे नाही. आजची पिढी व यापूर्वीची पिढी यांचा विचार केला तर पूर्वीचे लोक आजच्या पिढीपेक्षा कितीतरी बाबतीत सरस ठरतात. वर्षनुवर्ष दवाखान्याची पायरीही न चढणारे, कडाक्याच्या थंडीच्या दिवसातही नित्यनियमाने थंड पाण्याने स्नान करूनही कधीही सर्दी, खोकला होत नसलेले व तसेच दिवसभर उत्साहाने कार्यरत असलेले वयोवृध्द 'आजोबा' (आणि आजीही) पहायला मिळतात.

आजच्या तरुणाने हेवा करावा, अशीच त्यांची शरीरप्रकृती व जीवनदृष्टी असते. आजकाल आहार-विहारावर 'कसलेच बंधन




नाही. शिवाय व्यसनेही जोडीला आहेत. त्यामुळे कोणती व्याधी कधी निर्माण होईल हे सांगता येत नाही. तसेच दूषित पाणी, दूषित हवा असमतोल आहार, निकृष्ट अन्नधान्ये, फळभाज्या, पालेभाज्या, पालेभाज्यावर फवारलेली कीटकनाशके यामुळे शरीरात व्याधी निर्माण होतात. अंगात प्रतिकारशक्ती असेपर्यंत त्याचे परिणाम जाणवत नाहीत. पण निष्काळजीपणा दाखविला की त्या प्रकर्षाने उग्र बनतात. लहान मुलांचेही तसेच आहे. म्हणावी अशी त्यांच्या आरोग्याची काळजी आपण घेत नाही. त्यामुळे या बाळराजांना विविध आजारांना तोंड द्यावे लागते व नाक-तोंड वाकडे करून रडतच औषधे त्यांना मिळावी लागतात. नेहमी अशी औषधे देत गेल्याने त्यांच्या प्रकृतीवर अनिष्टच परिणाम होतो. म्हणूनच सर्वच कुटुंबाचे आरोग्य नेहमीच चांगले राहील अशी दखल घेतली गेली पाहिजे. प्रत्येकाने आपले आरोग्य टिकविले तरी पुरे. कोणाची प्रकृती बिघडली तर त्यावर तात्काळ घरगुती उपचार करता यावेत म्हणून घरोघरी आयुर्वेदिक औषधे, वनौषधी असणे आवश्यक आहे.

'आजीबाईचा बटवा' फक्त आजीबाईनेच जवळ बाळगावा असे नाही, कुटुंबातील कोणाही एका व्यक्तीने हे आयुर्वेदिक औषधांचे ज्ञान मिळवावे व किरकोळ आजारावर त्यांचा उपयोग करावा. वेळीच उपचार केले तर व्याधी गंभीर होत नाहीत व आयुर्वेदिक उपचारांनी त्या पूर्णतः दूर तर होतातच. पण त्या उपचारांचे परिणाम, दुष्परिणामही शरीरावर होत नाहीत.

**आजीवाच्या बटव्यात काय असावे?**

अचानक उद्भवणार्या आजारावर योग्य प्रकारे उपचार करता यावेत यासाठी 'आजीबाईच्या बटव्यात' खालील उपयुक्त औषधे ठेवावीत. ऐनवेळी धावपळ करून मिळविण्याचा प्रसंग त्यामुळे येणार नाही.

**हळद :-** हळकुंड घरी आणून काहीची हळदपूड करून ठेवावी. हळद नेत्ररोग, त्वचारोग, मल-मूत्र शुध्द करणारी व पित्त, कफाचा नाश आहे. कापणे, ठेच लागणे आदिमुळे रक्तस्त्राव सुरू झाला तर त्यावर तर सर्दी, पडसे, कमी खोकला दूर होतो. मुका मार लागणे, रक्त साकाळणे यावरही हळदीचा उपयोग करता येतो. त्यांचा आपण पुढे सविस्तर विचार करणार आहोतच.

**काळे मिरे :-** मिरे ज्वरनाशक, खोकला, हिवताप आदिवर उपयोगी आहेत. सर्दी-पडशावर पाव तोळा मिरे पूड, पाव तोळा साखर, दूध मिसळून द्यावी. खोकल्यावर ४-५ मिरे कपभर दुधात घालून ते दूध उकळावे व गरम-गरम प्यावे.

**सुंठ :-** सुंठीला 'विश्वभेषज' म्हणजे सगळ्या जगाचे औषध असे नाव दिले आहे. आले व सुंठ नेहमी घरात असावेच. डोके दुखी, खोकला, अरूचि, आदिवर त्यांचा चांगला उपयोग होतो. डोके दुखू लागले तर सुंठ उगाळून कपाळावर लेप करा. त्वरित आराम मिळतो.

**हिरडा, बेहडा:-** 'नास्ति यस्य गृहे माता तस्य माता हरीतकी' ज्याचे घरी आई नाही त्याची आई हिरडा, असे आयुर्वेदात म्हटले आहे. हिरडा व बेहडा नेहमी घरी असावा. हिरडा व बेहड्यात पाच रस असल्याने ते फारच उपयोगी आहेत. मलशुध्दी, मुखरोग, अपचन, खोकला, आदिवर त्यांचा उपयोग करता येतो.

**हिंग :-** आपल्याकडे भाजीत हिंग वापरला जातोच. परंतु चांगल्या दर्जाचा हिंग 'आजीबाईच्या बटव्यात' नेहमी ठेवावा. हिंग कृमिनाशक, रूचि उत्पन्न करणारा आहे. दात अथवा जखमेतील कीड, थंडीने कानात दडी बसणे, अजीर्ण, अपचनावर त्याचा उपयोग होतो.

**मोहरी :-** मोहरी घरोघरी असतेच. सर्दी, संधिवात, डोकेदुखी, रांजणवाडी आदिंवर ती उपयोगी आहे.

**ओवा :-** ओवा पोटदुखीवर फारच गुणकारी आहे. तो दीपक, पाचक, कृमिनाशक व तोंडास रूचि आणणारा आहे. अजीर्ण, पोटफुगी व पोटदुखी, आतड्यातील कृमीवर त्याचा उपयोग होतो.

**लवंग :-** रूचिप्रद, दीपक, पाचक असून दातदुखी, अग्निमांद्य, अजीर्ण, मोडशी, मळमळणे, वांती यावर लवंगाचा उपयोग करता येतो.

**दालचिनी :-** दालचिनी दीपक, पाचक, ग्राही असून सर्व वात रोगावर उपयोगी आहे. सर्दी, पडश्याच्या डोकेदुखीवर, फ्ल्यू, पोटातील मुरडा, अरूचि यावर ती उपयुक्त आहे.

तसेच वेलदोडे, मीठ, सैधव, पादेलोण, कापूर, ज्येष्ठमध, लेंडपिपळी, इसबगोल, जायफळ, वेखंड, आवळकाठी वावडिंग, गुळवेल, गजगा, काडेचिराईत, सोनामुखी, बडीशेप, नागरमोथा, गुंज, आदि कितीतरी सुक्या वनौषधी आजीबाईच्या बटव्यात ठेवता येण्यासारख्या आहेत. त्या अत्यंत उपयोगी आहेत. तसेच घराचे परिसरात उपलब्ध होतील अशा आघाडा, तुळस, अडुळसा, देवकापूस, ब्राम्ही, गवती चहा, कोरांटी, गुलाब, जाई, जास्वंद, तरवड, पारिजातक, निर्गुडी, पुदिना, एरंड, उंबर, माका, वेल आदि वनौषधी असाव्यात. तसेच निलगिरी तेल, एरंड तेल, शुध्द तूप, मध, करंज तेल, आदि संग्रही ठेवावे. अमृतांजन, आयोडिन, आयोडेक्स, व्हिक्स आदि ठेवायलाही हरकत नाही.

**बटव्यात आवश्यक साधने:-**

'आजीबाईचा बटवा' परिपूर्ण व्हावा यासाठी १) कात्री (शक्यतो स्टीलची) २) सुरी ३) खलबत्ता ४) स्वच्छ कापूस ५) चिकटपट्टी ६) थर्मामीटर (तापनळी) ७) आय ड्रॉपर ८) शेकण्याच्या पिशव्या, ९) पिचकारी १०) जखम बांधण्यासाठी पट्टा आदि जे-जे शक्य होईल ते- ते संग्रही करून ठेवावे. हे फार खर्चाचे काम आहे, असे नाही. वेळप्रसंगी अशा किरकोळ वस्तु फारच उपयोगी पडतात. तसेच त्रिफळा चूर्ण, हिंगाष्टक चूर्ण, सीतोपलादी चूर्ण, चातुर्भद्र चूर्ण, रसायन चूर्ण, पंचगुण तेल, आदिही जमेल तसे ठेवावे. योग्य प्रकारे ठेवले तर ते लवकर खराब होत नाहीत.

आरोग्यावर विविध ग्रंथ आहेत, मासिके आहेत. त्यांचे वाचन करून, जाणकारांचा सल्ला घेऊन बरीच माहिती मिळविता येण्यासारखी आहे. विविध काढे, कल्फ कसे करावेत. त्याची तसेच विविध रोग, ते होण्याची कारणे, त्याची लक्षणे व त्यावर करता येणारे सुलभ आयुर्वेदिक उपचार याची माहिती घ्यावी.

एका दिवसात हे ज्ञान मिळणारे नाही, सातत्याने वाचन व अनुभवाद्वारेच हे शक्य होणार आहे. घरोघरी असा 'घरचा डॉक्टर' निर्माण झाला तर 'आजीबाईचा बटवा' पुन्हा निश्चितच होईल. सुरू त्याची आज नितांत गरज आहे.

## कुठे गंधाळला काटा...

गुलाबाच्या फुलांसोबत
जरीही वाढला काटा
सतत सोबत असून त्यांच्या
कुठे गंधाळला काटा
जुन्या वृक्षामध्ये नव्हता
खरोखर भेद कुठलाही
जशी सांभाळली सुमने
तसा सांभाळला काटा
जराशा पाकळ्या वेचायला
गेले सुखाच्या मी
सतत रस्त्यावरी त्याच्या
व्यथेचा बोचला काटा
कुरूप होते पुढे त्याचे
मनामधुनी निघत नाही
रुतून बसतो असा काही
कुण्या शब्दातला काटा
बरोबर पाळतो त्याचा
सहज गुणधर्म रुतण्याचा
असो ओला कधी थोडा
कुणाचा वाळला काटा

आरती पद्मावार



## श्रीगणेशा देवा..!!

ओल्या गहन मातीवरचा उकार तुझ्या रे पायी
तू ओंकार स्वरूप या जगाच्या ठायी ठायी.
ती भिजून गंधात येते आकार तुझा घडवता
त्या हातात वसतो सहज ती जाणीव भक्तीची वसता.
ती सुंदर निरामय ओळ मातीची संवेदना रे
रंगाचा जडतो साज देवत्व जाणते सख्या रे.
ही भक्ती चरणांवरची ही वाट गहिरी होता
सजलेल्या बाजारातून तुझी कळते रे मोहकता.
तू काठी तसाच तटस्थ वसतो
तरी मूर्तिरूपाचे बंध देव्हारी तत्त्व सजवतो.
आनंद आतुरता सारे तुझ्या तत्त्वाशी जुळते
अन् तेथून प्रवाही मोळी ती स्थिर जाणीव स्मरते
ती स्थिर जाणीव स्मरते... !
बाप्पा तुझ्यासाठी तुझे फूल तुलाच वाहिले
मनातल्या काठी सारं समाधान राहिले, समाधान रे राहिले..

श्रद्धा राऊत बुरल

## गणेश गीत

पाहुणा आला, आला गणपती।
भाद्रपद चतुर्थीच्या दिवशी ।।धृ।।
एकदंत हा वक्रसुंडी। पाशांकुश, मोदक हाती।
बैसला मूषक वाहनी। धूप, दीप द्या, ओवाळा आरती।।१।।
विद्या, बुद्धी देई सकलां। शांती-मती येई घराला।
मांडा आरासूनी मखरा। दहा दिवसांचा हा असे सोबती।।२।।

रेखा भिवगडे

**धार्मिक साखळीत जखडलेल्या पाकिस्तानमधील विविध प्रांतांमधील बंडखोरीची आग अधिक तीव्र होत आहे. बलुचिस्तानपासून सिंधपर्यंत पाकिस्तानच्या फाळणीची रूपरेषा ठरली आहे. स्वतंत्र बलुचिस्तानची मागणी करणाऱ्या आणि पाया रचणाऱ्या अकबर बुगतीच्या पुण्यतिथीला बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने पाकिस्तानला हादरा दिला. इथून पाकिस्तानच्या विविध भागांत रक्तरंजित युद्धाचा नवा अध्याय सुरू झाला.**

# फुटीच्या उंबरठ्यावर पाकिस्तान

विशेष
आरिफ शेख

म्यानमारमध्ये सुरू असलेले भयंकर गृहयुद्ध आणि बांगलादेशमधील राजकीय गोंधळाच्या पृष्ठभूमीवर भारताचे 'ॲक्ट ईस्ट' धोरण धोक्यात आले आहे. भारताच्या ईशान्य आणि आग्नेय आशियामधील आर्थिक आणि धोरणात्मक संबंध मजबूत करण्याच्या उद्देशाने हे धोरण सुरू करण्यात आले होते; परंतु आता म्यानमार आणि बांगलादेशमधील बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे त्यात अडथळे येत आहेत. म्यानमारमध्ये परिस्थिती बिघडत आहे. सत्ताधारी लष्करी जंटा (तत्माडॉ) आणि विविध जातीय बंडखोर गटांमध्ये सुरू असलेल्या संघर्षाने देशाला गृहयुद्धाच्या स्थितीत ढकलले आहे.

भारताच्या महत्त्वाकांक्षी कलादान मल्टी मोडल ट्रान्सपोर्ट (केएमटी) प्रकल्पाचा एक मोठा भाग असलेल्या राखीन (पूर्वीचे अराकान) प्रांतावर म्यानमारचे सैन्य नियंत्रण गमावत आहे. आता राखीन प्रांताचा मोठा भाग म्यानमार-बांगलादेश सीमेवर स्वतंत्र राज्य स्थापन करण्याच्या प्रयत्नात असलेल्या विघटनवादी अरकान आर्मीच्या ताब्यात आहे. राखीन प्रांताचे प्रशासकीय मुख्यालय असलेल्या सित्तवे (पूर्वीचे अक्कियाब) ताब्यात घेण्यासाठी अरकान लष्कराने मोठ्या प्रमाणावर तैनाती सुरू केली आहे. हे शहर बंडखोरांच्या हाती जाणे हा म्यानमारचा मोठा सामरिक पराभव ठरेल आणि भारतासाठीही गंभीर संकट निर्माण होईल. अरकान आर्मीची ताकद केवळ तिच्या यशापुरती मर्यादित नाही, तर इतर बंडखोर गटांशी युती करून आपली स्थिती आणखी मजबूत करत आहे. जुलैच्या उत्तरार्धात एमएनडीएए या कोकांग बंडखोर गटाने म्यानमारच्या सैन्याचा पराभव केला आणि चीनच्या सीमेवर असलेल्या उत्तर शान राज्यातील लशिओ शहर ताब्यात घेतले.

म्यानमारच्या सैन्यासाठी हा मोठा पराभव होता. कारण त्यांच्या उत्तर-पूर्व कमांडचे मुख्यालय लशिओ येथे होते. काचिन इंडिपेंडन्स आर्मी (केआयए) ने बर्मी सैन्याविरुद्ध महत्त्वपूर्ण विजय मिळवला. त्यांनी काचिन राज्यातील बर्मी लाईट इन्फन्ट्री बटालियन (एलआयबी) ४३७ चे मुख्यालय ताब्यात घेतले. या विजयांमुळे प्रेरित होऊन अरकान आर्मीने आता म्यानमारपासून औपचारिकपणे स्वातंत्र्य घोषित करण्यासाठी सिटवे ताब्यात घेण्याची योजना आखली आहे. भारतासाठी ही परिस्थिती आणखी गुंतागुंतीची आहे. भारताने राखीन राज्यातील 'कलादान मल्टी मोडल ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट'अंतर्गत सिटवे बंदराच्या आधुनिकीकरणासाठी ४८४ दशलक्ष डॉलरची गुंतवणूक केली आहे. भारतातील ईशान्येकडील राज्यांना म्यानमार आणि त्यापलीकडे दक्षिण-पूर्व आशियाशी जोडण्यासाठी हा प्रकल्प अतिशय महत्त्वाचा आहे; मात्र म्यानमारमधील बिघडलेल्या परिस्थितीमुळे हा प्रकल्प पूर्ण करण्यात अनेक अडथळे निर्माण होत आहेत. अरकान आर्मीने याआधी हा प्रकल्प उधळून लावला होता. भारतीय लष्कराने मिझोराम सीमेवर म्यानमारमधील त्यांच्या तळांवर ऑपरेशन सनशाईन सुरू केले होते. तथापि, गेल्या वर्षी अरकान आर्मीने सत्ताधारी लष्करी जंटाविरुद्धच्या मोहिमेदरम्यान राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी फायदेशीर ठरू शकणाऱ्या कनेक्टिव्हिटी प्रकल्पांना विरोध करणार नाही, असे सूचित केले.

अरकान आर्मीने म्यानमारपासून आपले स्वातंत्र्य घोषित केले आणि भारताने त्याला मान्यता दिली नाही तर हा प्रकल्प पूर्णपणे धोक्यात येऊ शकतो. चीनने राखीन प्रांतातील खोल समुद्र बंदर आणि तेल-गॅस पाईपलाईनसारख्या मोठ्या प्रकल्पांमध्येही गुंतवणूक केली आहे. चीन रागावू नये म्हणून अरकान आर्मी क्यूकफ्यू बंदरावर हल्ला करणे टाळत असले, तरी सिटवे ताब्यात घेण्याची त्यांची योजना चीनसाठी डोकेदुखी ठरू शकते. कोलकाता-बँकॉक महामार्ग हा भारताच्या 'ॲक्ट ईस्ट' धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. तो त्रिपक्षीय महामार्ग म्हणून ओळखला जातो. भारत, म्यानमार आणि थायलंडमधील संपर्क वाढवणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे; परंतु म्यानमारमधील बिघडलेल्या परिस्थितीमुळे तो पूर्ण आणि कार्यान्वित करणे आता कठीण होत आहे. शेख हसीना यांना बडतर्फ केल्यानंतर, बांगलादेशमधील विरोधी पक्ष भारतासोबत केलेल्या करारांच्या पुनरावलोकनाची मागणी करत आहेत. त्यामुळे भारताचे ॲक्ट ईस्ट धोरण आणखी अडचणीत येऊ शकते. म्यानमारमधील गृहयुद्ध आणि राखीन प्रांतातील अरकान आर्मींचा वाढता प्रभाव यामुळे भारताच्या कनेक्टिव्हिटी प्रकल्पांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परिणामी, येत्या काही महिन्यांमध्ये भारताला सुदूर पूर्व धोरणांतर्गत आपल्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी नवीन धोरणात्मक उपाय शोधावे लागतील. भारताचे 'ॲक्ट ईस्ट' धोरण हे दक्षिण-पूर्व आशियाई देशांना गुंतवून ठेवण्याच्या उद्देशाने धोरणात्मक चौकट आहे. म्यानमारमध्ये सुरू असलेल्या नागरी अशांततेमुळे व्यापार, सांस्कृतिक आणि जमीन मार्गांद्वारे होणारी देवाणघेवाण मागे पडली आहे. आग्नेय आशियाई देशांना व्यापार, वाणिज्य आणि बहुपक्षीय गुंतवणुकीद्वारे अधिक समंजसपणे जोडण्याचा भारताचा प्रयत्न आहे. प्रादेशिक खेळाडू बनण्याच्या भारताच्या महत्त्वाकांक्षेशी या धोरणाचे उद्दिष्ट सुसंगत आहे. या धोरणाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्याची भौगोलिक खोली. भारतीय पंतप्रधान आणि त्यांच्या राजनयिक सहभागामुळे या क्षेत्रामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. प्रारंभी म्यानमार, दक्षिण कोरिया आणि थायलंड हे पूर्व आशियाशी भारताच्या संलग्नतेची जाणीव करून देण्यासाठी महत्त्वाचे भागीदार मानले जात होते. मात्र त्यानंतर लक्षात आले की, या प्रदेशातील अधिक देशांशी आर्थिक संबंध हा या भागावरील वाढत्या प्रभावाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. पूर्वीचे 'एलईपी' फक्त आशियाई देशांशी केंद्रित होते तर पुनरुज्जीवित 'एईपी'ने आशिया पॅसिफिकचा समावेश करून आपली धोरणात्मक खोली वाढवली.




पूर्व आणि दक्षिण-पूर्व आशियाशी सागरी मार्गांद्वारे 'कनेक्टिव्हिटी' साधत भारताने प्रगती साधली आहे; परंतु जमिनीवरील मार्गदेखील महत्त्वाचे आहेत आणि ही कनेक्टिव्हिटी सुलभ करण्यात म्यानमारची भूमिका महत्त्वाची आहे. या धोरणात्मक चौकटीत ईशान्य भारताला प्राधान्य देण्यात आले आहे. 'ॲक्ट ईस्ट' धोरणाच्या कोणत्याही यशासाठी आणि पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेची खात्री करण्यासाठी 'नॉर्थ ईस्ट' हा महत्त्वाचा पाया आहे. या धोरणाचे यश, विशेषतः ईशान्येकडील भूमार्गांबाबत म्यानमारशी स्थिर आणि मैत्रीपूर्ण संबंधांवर अवलंबून आहे. फेब्रुवारी २०२१ मध्ये झालेल्या लष्करी बंडानंतर म्यानमारमध्ये अराजकता पसरली आहे. आंग सान स्यू की यांच्या सरकारने सुरू केलेली युद्धविराम प्रक्रिया कोलमडली आहे. त्यामुळे हिंसाचारात वाढ झाली असून नोव्हेंबर २०२३ पासून अनेक वांशिक बंडखोर गटांनी समांतर प्रशासनाची स्थापना केली आहे. या परिस्थितीमुळे म्यानमारचे तुकडे होण्याच्या मार्गावर आहे आणि जागतिक समुदायापासून ते अलिप्त झाले आहे. म्यानमारचे राजकीय भूदृश्य जटिलतेने भरले आहे. त्यात लष्करी जंटा आणि बहुजातीय राज्यांची नाजूकता यांचा समावेश आहे. त्यामुळे भारताने आणखी अस्थिरता आणि संघर्ष वाढण्याची शक्यता कमी लेखू नये. काही अंदाजांनुसार, राखीन राज्याचा ६० टक्के आणि शेजारील राज्याचा ३० टक्के भाग अरकान लष्कराच्या ताब्यात आहे. म्यानमारच्या अंतर्गत संकटात आजघडीला प्रभावीपणे हस्तक्षेप करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाच्या त्वरित कारवाईची आवश्यकता आहे. भारत प्रादेशिक प्रभाव आणि मुत्सद्दी कौशल्याद्वारे संकटाचे निराकरण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. भारताने अर्थपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याची हीच वेळ आहे. याच सुमारास म्यानमारसह १६४३ किलोमीटर सीमारेषेवर कुंपण घालण्याचा भारताचा अलिकडील निर्णय अधिक बचावात्मक भूमिकेकडे बदल दर्शवतो. हा निर्णय 'ॲक्ट ईस्ट' धोरणांतर्गत खुल्या प्रतिबद्धतेच्या तत्त्वांच्या विरोधात आहे. या प्रदेशात चीनचा वाढता प्रभाव आणि लष्करी जंटा आणि वांशिक गटांमधील चर्चेत त्याचा सहभाग यामुळे भारताला त्याचे 'ॲक्ट ईस्ट' वचन पूर्ण करण्यासाठी आव्हानात्मक स्थिती दिसते. परिस्थिती आणखी जटिल बनून 'केएमएमटी'सारख्या भारतअनुदानित पायाभूत सुविधा प्रकल्पांना विलंब होत आहे. म्यानमारशी संपर्क आणि व्यापार संबंध मजबूत करण्याच्या प्रयत्नांना आणखी अडथळा आणत आहेत. काही भागात सुरू असलेला संघर्षही हे प्रकल्प सुरू होण्यात अडथळा ठरत आहे. परिस्थिती भरून येण्यासारखी नसली, तरी भारताकडून निर्णायक कारवाईची गरज आहे. धोरणात्मक निष्क्रियता चुकीचे निर्णय घेण्याइतकीच हानिकारक असू शकते. त्यामुळे भारताने या आव्हानांवर मात करण्यासाठी निर्णायक कृती केली पाहिजे आणि 'ॲक्ट ईस्ट पॉलिसी'शी आपली वचनबद्धता कायम ठेवली पाहिजे.



# वाळवंटी, तांबड्या समुद्राकाठी डाव मांडला

विश्वसंचार
मल्हार कृष्ण गोखले

मध्यपूर्वेतल्या देशांमधली लोकप्रिय पर्यटन स्थळे कोणती, असा प्रश्न विचारला तर पहिल्यांदा नावे आठवतील ती म्हणजे मक्का, मदिना आणि जेरूसलेम. मक्का, मदिना ही धार्मिक दृष्टीने मुसलमानांसाठी सर्वोच्च पूज्य स्थाने, तर जेरूसलेम हे मुसलमानांसह ख्रिश्चन आणि ज्यू यांच्यासाठी देखील पवित्र शहर आहे. यानंतर क्रम लागतो तो इजिप्त, जॉर्डन, सीरिया, लेबेनॉन आणि इराक या देशांमधील अनेक ऐतिहासिक, परातत्त्वीय ठिकाणांचा.

इजिप्तमधले पिरॅमिड्स, जॉर्डनमधले पेट्रा हे प्राचीन शहर आणि मृत समुद्र, सीरिया मधली दमास्कस, अलेप्पो, ॲंटिओक ही प्राचीन शहरे, लेबेनॉनमधले बैरूत हे अत्यंत सुंदर आणि निसर्गरम्य शहर; इराकमधले बगदाद हे प्राचीन शहर आणि इमाम हुसेन यांच्या हौतात्म्यामुळे शिया मुसलमानांना पवित्र असणारे करबला शहर अशी सर्व ठिकाणे ही जगभरच्या प्रवाशांची आवडती ठिकाणे होती, आहेत. आता तुम्ही जर मध्यपूर्वेच्या नकाशावर नजर टाकलीत तर तुमच्या लक्षात येईल की, यातले एकही ठिकाण तांबड्या समुद्राच्या काठावर नाही. भारताच्या पश्चिमेला असणाऱ्या समुद्राला साधारणपणे पश्चिम समुद्र असे म्हटले जाते. याचे प्राचीन हिंदू विशेषनाम आहे रत्नाकर. परंतु आधुनिक युरोपीय दर्यावर्दींना या समुद्राची ओळख अरबांमुळे झाली. त्यामुळे त्यांनी याला नाव दिले अरबी समुद्र. आधुनिक नौकानयन क्षेत्रात तेच नाव प्रचलित आहे. तर या अरबी समुद्राचे दोन फाटे साधारण आग्नेयेकडून वायव्येला तिरके घुसले आहेत.

उत्तरेकडचा फाटा उमानचे आखात नि होर्मझची सामुद्रधुनी या मार्गाने आत शिरला आहे. त्याने पर्शियाचे किंवा इराणचे आखात बनवले आहे. वायव्येकडून या आखातात तैग्रिस आणि युफ्रेटिस या महानद्या येऊन विलीन होत आहेत. दक्षिणेकडचा फाटा एडनचे आखात आणि बाबअल्-मांदवची सामुद्रधुनी या मार्गे खूप खोलवर सुवेझपर्यंत आत घुसला आहे. या फाट्यालाच नाव आहे तांबडा समुद्र. वर इराणचे आखात आणि खाली तांबडा समुद्र यांनी एक खूप मोठा भूभाग वेगळा केला आहे. त्यालाच म्हणतात अरबस्तानचे द्वीपकल्प अरेबियन पेनिन्शूला. आधुनिक काळात या द्वीपकल्पात काळे सोने म्हणजे तेल सापडले. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या या संपूर्ण भूभागाला अतोनात महत्त्व आले. अनेक युरोपीय आणि अमेरिकन तेल उत्खनन कंपन्यांनी इथे मोठमोठे प्रकल्प सुरू केले. त्या प्रकल्पांवर काम करण्यासाठी जगभरातून कुशल कामगारांचा मोठा लोंढाच इकडे वाहू लागला. लेबेनॉन, सीरिया, जॉर्डन, इराक, कुवेत, सौदी अरेबिया, यमन, उमान, कतार, बहरिन आणि संयुक्त अरब अमिराती हे अरब वंशीय देश आशिया खंडातल्या अरबी द्वीपकल्पात मोडतात, तर तांबड्या समुद्राच्या पलीकडचे सुदान, इजिप्त, लिबिया, अल्जेरिया, मोरोक्को हे देश अरब असले तरी ते आफ्रिका खंडात मोडतात. ती अरबांची मूळ भूमी नाही. मूळ रहिवाशांचा संपूर्ण उच्छेद करून अरबांनी व्यापलेले असे ते देश आहेत. असो.

तर तांबड्या समुद्राच्या काठावरची जिद्दा आणि अलवाझ ही दोन बंदरे सोडली, तर त्या एवढ्या मोठ्या सुमारे २००० कि.मी. लांबीच्या किनारपट्टीवर एकही मोठे बंदर नाही. याचे एक कारण असेही आहे की ही किनारपट्टी समुद्रसपाटीपासून बरीच म्हणजे ५००० फूट उंच आहे. आणि हा संपूर्ण भाग वाळवंटी आहे. चारही दिशांना सर्वत्र फक्त वाळू आणि वाळूच. दिवसा भाजून काढणारी उष्णता आणि रात्री हाडांत शिरणारी थंडी. अशा कारणांमुळे एवढ्या लांबलचक तांबड्या समुद्रावर कोणतेही धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक ठिकाणच नाही. मक्का आणि मदिना ही दोन ठिकाणे समुद्रापासून बरीच आत आहेत. अर्थात त्या शहरांना धार्मिक महत्त्व असल्यामुळे तिथे वर्षभर सतत प्रवासी येतच असतात.

यंदाच्या २०२४ च्या वार्षिक हज यात्रेला १० लाख ८० हजार यात्रेकरूंनी भेट दिली. १४ जून ते १९ जून २०२४ या कालखंडातली यावर्षीची हज यात्रा कमालीच्या उष्णतेने गाजली. तशी दरवर्षीची हज यात्रा कोणत्या ना कोणत्या कारणाने गाजत असतेच. यंदाच्या यात्रेला ५१.८ सेंटिग्रेड इतक्या भयंकर उष्माघाताने तडाखा दिला. किमान १३०० ते १५०० यात्रेकरू उष्मघाताने मरण पावले. आपल्याकडे नेमके त्या कालखंडात नरेंद्र मोदींचे तिसरे सरकार नुकतेच सत्तारूढ झाले होते आणि ते लवकरच कोसळणार, अशी हवा निर्माण करण्यात आपल्याकडचा 'मेन स्ट्रीम मीडिया' किंवा 'चाय-बिस्कुट पत्रकार' दंग होते. त्यामुळे हज दुर्घटनेवरून त्यांनी फार उरबडवेपणा केला नाही. पण मक्का-मदिनेचे पर्यटन हे झाले धार्मिक पर्यटन. पाश्चिमात्यांची पर्यटनाची संकल्पना वेगळी आहे. त्यांच्या धर्मात दारू निषिद्ध नाही, उलट अनेक धार्मिक विधींमध्ये आवर्जून दारू वापरली जाते.

मांसाहारातही कुत्र्याचे मांस सोडून अन्य कुणाचेही मांस ते सहज लीलेने खातात. त्यामुळे पर्यटन स्थळ धार्मिक असलेच तरी सुद्धा त्यांना आरामशीर प्रवास, अटॅच्ड टॉयलेटस् असलेली सुखदायक निवास व्यवस्था, पोहण्याचे तलाव, त्यांच्या काठावर विविध प्रकारच्या दारबांनी (दारूचे अनेक वचन) सुसज्ज असे बार, उत्कृष्ट सामिष भोजन, पश्चिमी संगीत वाजवणारी नृत्यालये किंवा डिस्कोथेक, काहींना त्यापुढची सोय, असा सगळा साग्रसंगीत थाट हवा असतो. त्याकरिता खर्च करण्याची त्यांची तयारी असते. कारण डॉलर्सच्या चवडींनी त्यांची पाकिटे, चुकलो, वॉलेट्स् भक्कम फुगलेली असतात. आता तर वॉलेट्सही लागत नाहीत. शेकडो प्रकारची डेबिट-क्रेडिट कार्ड्स, पेमेंट ॲप्स आणि पेमेंट गेटवेज् उपलब्ध आहेत. हे सगळे सर्वप्रथम हेरले अरबांच्या दुबईने. संयुक्त अरब अमिराती हा जो देश आहे, तो दुबई, अबुधाबी, अजमान, फुजैरा, शारजा, उम्म-अल्-कैवान आणि रास-अल्-खैमा अशा सात छोट्या-छोट्या अरबी सल्तनतींनी किंवा संस्थानांनी एकत्र येऊन बनवलेला आहे. या संस्थानांपैकी दुबईमध्ये १९६६ साली तेल सापडले. दुबईचे त्यावेळचे शेख म्हणजे प्रमुख रशीद बिन सईद अल् मख्तुम हे मोठे दूरदर्शी होते. त्यांनी तेल उद्योगासाठी बाहेरून माणसे आणलीच, पण भावी काळात दुबई हे इजिप्तच्या कैरोप्रमाणे किंवा ते बेनॉनच्या बैकतप्रमाणे पाश्चिमात्य पर्यटकांचे आकर्षण बनले पाहिजे, असे उद्दिष्ट ठेवले. त्यासाठी सौदी अरेबियाप्रमाणे कर्मठ धार्मिक दृष्टिकोन न ठेवता मुक्त पश्चिमी दृष्टिकोन स्वीकारला. म्हणजे काय? म्हणजे असे की सौदी अरेबियात मक्कामदिनेची तीर्थयात्रा फक्त मुसलमानचं करू शकतात. अन्य कुणीही नाही. समजा व्यवसायानिमित्त गेलेच कुणी, तर त्यांना मक्केच्या काळ्यात किंवा मदिनेच्या पैगंबराचे दफनस्थळ असलेल्या दर्ग्यात प्रवेश करता येत नाही. जुगार आणि दारू यांना सौदीमध्ये कडक बंदी आहे. उलट दुबईने १९६९ सालापासून जी भरारी घ्यायला सुरुवात केली आहे. ती सतत वरवरच जाते आहे. बुर्ज-अल्-अरब हे गगनचुंबी पंचतारांकित हॉटेल कमी पडले म्हणून की काय, आता बुर्ज खलिफा हे त्याच्याहीपेक्षा उत्तुंग हॉटेल उभे राहिले आहे. पर्यटक म्हणतील ती वस्तू हात जोडून तयार आहे. शिवाय दुबई हे 'ड्युटी फ्री' शहर आहे. त्यामुळे विविध प्रकारच्या वस्तू स्वस्तात विकत घेण्यासाठीही पर्यटक झिम्मड गर्दी करतात. त्यांची सर्वाधिक पसंती असते ती इलेक्ट्रॉनिक वस्तूंना आणि निखळ सोन्याचे किंवा सोने आणि जडजवाहिर यांनी बनवलेल्या दागिन्यांना. दुबईतली ही प्रवासी गर्दी गेल्या दोन दशकांमध्ये अधिकच वाढली आहे. कारण मध्यपूर्वेतल्या जुन्या लोकप्रिय पर्यटन स्थळांना युद्धाची झळ जास्तच लागते आहे. सीरिया, जॉर्डन, इराक, इस्रायल, इजिप्त या देशांमध्ये सतत धुमश्चक्री चालू आहे. त्यातल्या त्यात इस्राइल आणि इजिप्तमधला पर्यटन व्यवसाय जरा स्थिर आहे. पण लेबेनॉनचे बैरूत हे निसर्गसुंदर शहर तर सततच्या घातपाती कारवायांनी पार उद्ध्वस्त झाले आहे.

सीरियामध्ये २०११ सालापासून आयतागायत यादवी युद्ध सुरू आहे. अशा स्थितीत, दमास्कसचे उत्तम पोलाद कसे बनवले जात असे, हे बघायला कोण जाणार तिथे? मध्यपूर्वेतल्या अशा एकंदर वातावरणात सौदी अरेबियाचे युवराज महंमद-बिन-सलमान यांनी एक मोठा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आखला आहे. सध्याचे राजे सलमान-बिन-अब्दुल अजीझ अल् सौद हे ८८ वर्षांचे आहेत.

महंमद-बिन-सलमान हे त्यांचे चिरंजीव आणि युवराज ३० वर्षांचे असून तेच भावी राजे असतील असे सध्या तरी दिसते आहे. आंतरराष्ट्रीय वर्तुळात त्यांना एम. बी. एस. या आद्याक्षरांनी ओळखले जाते. आतापर्यंत सौदी राजघराण्यातील राजपुरुषांची सार्वजनिक प्रतिमा जुगारी, रंगेल, चंगीभंगी अशीच होती. स्वतःच्या देशात दारू आणि नृत्यगृहांना बंदी करणारे हे राजेलोक कायम लास वेगासच्या जुगारी कॅसिनोंमध्ये किंवा लंडन-पॅरिसच्या कुंटणखान्यांमध्ये पडलेले असायचे. पण महंमद-बिन-सलमान वेगळा माणूस आहे. राजकारण, समाजकारण, आर्थिक धोरण, सैनिकी धोरण अशा सर्वच महत्त्वाच्या क्षेत्रांत या जेमतेम चाळिशीला पोचलेल्या तरुण राजपुत्राने जी चमक, जी समज दाखवली, त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर अणेक जाणकार लोक त्याला मानू लागले, त्याचे मित्र बनले, जाणते वार्ताहर त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवू लागले. महंमद-बिन-सलमानने अनेक जुनाट, सनातनी सामाजिक धोरणे रद्दबातल करून सौदी समाजाला खूपच प्रामाणिक बनवले आहे. सौदी अरेबियाच्या वायव्य कोपऱ्यात तबूक नावाचा प्रांत आहे. या प्रांताची उत्तर सीमा जॉर्डन आणि इस्रायल या आशियाई देशांना भिडली आहे. तिथून अकाबाचे आखात तांबड्या समुद्राला मिळते. ते ओलांडले की पलीकडे आफ्रिका खंडातल्या इजिप्त देशाचा सिनाई हा प्रांत लागतो. त्याच्या पलीकडे सुवेझचे आखात येते. व्यापारीदृष्ट्या अतिशय मोक्याच्या, महत्त्वाच्या अशा या तिठ्यावर 'न्योम' या नावाने नवीन बंदर वसावयाचे, अशी भव्य कल्पना महंमद-बिन-सलमान यांनी मांडली आहे, नव्हे, काम सुरूच केले आहे. तब्बल २६ हजार ५०० चौ. कि.मी. एवढ्या परिसरात दुबई प्रमाणेच अतिशय आधुनिक असे बंदर; त्या बंदराला सौदीमधल्या अन्य व्यापारी शहरांशी जोडणारे रस्ते, रेल्वे आणि विमानतळ, कारखाने आणि उद्योगधंदे यासाठी सर्व सुविधा, सर्व प्रकारच्या सुखसोयी असणारे पर्यटन स्थळ (सर्व सोईंमध्ये जुगार, दारू आणि पुढचे प्रकार आलेच); आणि यासाठी लागणाऱ्या मूलभूत सुविधा म्हणजे अखंड वीजपुरवठा, पिण्याचे पाणी नि सौदीच्या भीषण उष्णतेपासून संरक्षण देणारी शीतवायू यंत्रणा- ए.सी. प्लांट्स उभे करणे हे सोपे काम नाही. पण सौदी म्हणजे फक्त मक्का-मदिना नव्हे, तर आमच्याकडे अल् उला या प्राचीन कोरीव गुफांसह सर्व अत्याधुनिक सोयींचे दुबई सारखेच पर्यटन स्थळही आहे, हे महंमद-बिन-सलमानना सिद्ध करायचे आहे. आपण त्यांना शुभेच्छा देऊ या... (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)